म. ग्रं. सं. ठाणे
विषय
सं. क्र.
१९५६

# विनोबा भावे




REFBK-0008921

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रमांक ........ वि: ..............
क्रमांक ............ नों: दि: ..........
३५७७१
११.१२.
-२१।८।

# विनोबा भावे

मराठी ग्रंथ संग्रहालय ठाणे
दा. क्र. ८८२९
परि
१.००



लेखक
यदुनाथ थत्ते

REFBK-0008921

चित्रशाळा प्रकाशन

किंमत दीड रुपया

मुद्रक व प्रकाशक
दामोदर त्र्यंबक जोशी,
व्यवस्थापक, चित्रशाळा प्रेस,
१०२६ सदाशिव, पुणें २.

★

सुधारून वाढवलेली
दुसरी आवृत्ति
: मे : १९५६ :

★

या पुस्तकांतील सर्व चित्रें
चित्रकार ओके, मुंबई
यांनीं काढलेलीं आहेत.

★

भाषांतर, उतारे घेणें वगैरे
सर्व हक्क लेखकाधीन.

# अनुक्रमणिका

| | | |
|---|---|---|
| १ | शांतिसैनिकाची वाटचाल | ५ |
| २ | लोकहृदयांतील रामरायांना साद | ९ |
| ३ | समर्पणाची ओढ | १४ |
| ४ | गांधींचा मुलगा | २३ |
| ५ | गीताईचा जन्म | ३१ |
| ६ | राष्ट्रीय कर्मयोग | ३९ |
| ७ | कारागृहांतील साधना | ४७ |
| ८ | विधायक नेतृत्व | ५६ |
| ९ | साम्ययोगाचा ध्यास | ६५ |
| १० | भूदानाची गंगोत्री | ७५ |
| ११ | पुढचें पाऊल | ८१ |
| १२ | धर्मचक्र प्रवर्तन | ९० |
| १३ | क्रांतिकारी आंदोलन | ९७ |
| १४ | आरोहण | १०४ |
| १५ | नवसमाजाचा पाया | ११० |

★

पहिली मराठी आवृत्ति १९५३
पहिली गुजराथी आवृत्ति १९५३
पहिली हिंदी आवृत्ति १९५४
दुसरी मराठी आवृत्ति १९५६


## नि वे द न :

विनोबाजी आणि त्यांचें भूदान यज्ञ आंदोलन यांनीं आतां सर्वांचें लक्ष वेधून घेतलें आहे. आश्चर्यचकित वृत्तीनें या घटनेकडे लोक पहात आहेत. अशक्य वाटणारें कार्य दातृत्ववृत्ति जागवून विनोबाजी करून दाखवीत आहेत. ज्या प्रश्नापुढें सर्वांनीं हात टेकले तो भूमिहीन शेतमजुरांचा प्रश्न हातीं घेऊन विनोबाजींनीं अपूर्व असें यश मिळविलें आहे. भूदानाची कल्पना हा कांहीं अपघात नव्हे. विनोबांच्या जीवनांतील विविध घटनांतून निघालेलें हें सत्त्व आहे. भूदान यज्ञाचें आंदोलन समजून घेण्याच्या दृष्टीनें त्यांच्या जीवनांतील विविध घटना महत्त्वाच्या आहेत. विनोबांना समजून घेण्याच्या माझ्या नम्र प्रयत्नांतून निष्पन्न झालेलें हें फलित इतरांनाहि त्याचा उपयोग होईल या आशेनें प्रकाशित झालें.

आज पुस्तकाची दुसरी आवृत्ति काढण्याचा योग येत आहे. हा चरित्रनायकाच्या महान् तपस्येचा महिमा आहे.

१८ एप्रिल १९५६
भू दा न ज यं ती

यदुनाथ थत्ते



" गांधीजींच्या हयातींत आपण आपल्या छोट्या कार्यक्षेत्रांत अज्ञात वीराप्रमाणें गढलेले असूं. आज तें चालणार नाहीं. आज जगावर आणीबाणी आहे. जबाबदारी शिरावर घेतली पाहिजे. चालढकल चालणार नाहीं. काळ धांवत आहे. भूदान मागतांना आपण सर्वांना सांगू या कीं, केवळ जमिनीचा प्रश्न सोडविण्यासाठीं नव्हे, तर जागतिक शांततेसाठीं आम्ही फिरत आहों. भूदान हें एक प्रतीक आहे. "

—विनोबाजी

जगन्नाथपुरी येथील सर्वोदय समाजाच्या संमेलनापुढील भाषणांतून
मार्च १९५५

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम .................... वि: ....................
क्रमांक .................... नों: दि: ....................
दा. क्र.

# शांतिसैनिकाची वाटचाल

शंभर वर्षांच्या खडतर तपश्चर्येनंतर हिंदुस्थानला १९४७ सालीं स्वातंत्र्य मिळालें. ज्यांच्या राज्यावर सूर्य कधीं मावळत नाहीं अशी ख्याति, त्यांनीं आपल्या हातांनीं आपलें साम्राज्य मोडलें. युद्धारंभीं ब्रिटनचे मुख्य प्रधान चर्चिल घमेंडीनें म्हणाले होते : " मी आपल्या डोळ्यांदेखत साम्राज्य मोडलेलें पाहण्यासाठीं मुख्य प्रधान होत नाहीं. " चर्चिल यांच्या पुढाकारानें इंग्लंडनें व त्याच्या दोस्तांनीं युद्ध तर जिंकलें, पण लगेच त्यांना आपल्या गुलामींत असलेल्या आशियांतील वसाहतींना स्वातंत्र्य द्यावें लागलें. ‘ हिंदुस्थानचें स्वातंत्र्य ही इतर गुलाम देशांच्या स्वातंत्र्याची किल्ली आहे ’ असें गांधीजी १९४२ सालीं म्हणाले होते. त्यांची ती भविष्यवाणी खरी ठरली. हिंदुस्थानबरोबर ब्रह्मदेश व सीलोन हे त्याचे शेजारी स्वतंत्र झाले. अनंत काळ उराशीं बाळगलेलें भारतीय जनतेचें ध्येय पूर्ण झालें. पण कालपर्यंत जें साध्य असतें तें साध्य हातीं येतांच आज साधन बनतें व त्याच्या साहाय्यानें अधिक उज्ज्वल, भव्य असें नवें साध्य साधण्यासाठीं साधकाला निघावें लागतें. साधनामार्गावर अखेरचा मुक्काम कधींच नसतो, सतत पुढें पुढें जायचें असतें. राष्ट्राची साधना अखंडपणें चालविली पाहिजे. लोकांपुढें अधिकाधिक भव्य कार्यक्रम ठेवले गेले पाहिजेत. नाहींतर देशाची प्रगति थांबते. पुढारी यासाठीं सतत झटत असतात. हिंदुस्थान स्वतंत्र झाल्यावर आमच्या पुढाऱ्यांनीं सगळे मिळून चुकल्याचा आनंद मानला नाहीं, कालच्या साध्याचें आज साधन झालें; आतां अधिक उज्ज्वल, भव्य कांहीं तरी करून दाखवावें, या उमेदीनें त्यांनीं नवीं ध्येयें हातीं घेतलीं. स्वातंत्र्यानंतर दीड वर्षांतच आपल्याला यानंतर गांठावयाच्या मुक्कामाची स्पष्ट कल्पना राज्यघटना तयार करून जनतेपुढें मांडण्यांत आली. राजकीय, सामाजिक व आर्थिक क्षेत्रांत न्यायाची प्रस्थापना, विचार, प्रचार,

संघटना व धर्म या बाबतींत स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा व संधि यांच्या बाबतींत संपूर्ण समानता निर्माण करून व्यक्तीचा गौरव व राष्ट्रीय ऐक्य बळकट करणारा बंधुभाव सर्वत्र निर्माण करण्याचा कार्यक्रम जनतेपुढें ठेवण्यांत आला.

न्याय, स्वातंत्र्य, समता व बंधुभाव या चार गोष्टी कशा साध्य करावयाच्या ? आर्थिक व सामाजिक न्यायाची प्रस्थापना कशी करावयाची ? आर्थिक व सामाजिक अन्यायांचीं पाळेंमुळें देशांतून खणून काढावयाचीं तर त्यांची नक्की जागा समजली पाहिजे. गांधीजी म्हणत : "भारत देश शहरांतच सामावलेला नसून तो खेड्यांचा बनलेला आहे." त्यांचें म्हणणें खरें होतें. देशांतले जवळ जवळ ऐंशीपंचाऐंशी टक्के लोक खेड्यांतच राहातात. तेव्हां शहरांतच सामाजिक व आर्थिक न्याय निर्माण करून भागणार नाहीं, तर भारतीय बहुसंख्य जनता ज्या खेड्यांत राहाते त्या खेड्यांतील व्यवहारांत हीं तत्त्वें दाखल झालीं पाहिजेत. हीं तत्त्वें व्यवहारांत कशीं आणावीं, याचा विचार करण्यासाठीं सरकारनें एक नियोजन मंडळ नेमलें. भारताच्या नैसर्गिक साधनसंपत्तीची मोजदाद करून त्यावर येथील जनतेच्या सर्वांगीण विकासाची इमारत उभी करावयाची आहे. भारताच्या नैसर्गिक साधनसंपत्तींत पहिलें स्थान येथील जमिनीला द्यावें लागेल. येथील बहुसंख्य जनता आपला उदरनिर्वाह जमिनीवर चालविते. राष्ट्राच्या आर्थिक विकासाचा विचार करतांना साहजिकच शेतीसुधारणा व शेतीची नवी व्यवस्था यांना महत्त्व आलें आहे. भारताजवळ दुसरें महत्त्वाचें भांडवल म्हणजे मनुष्यबळ. हें बळहि खेडोपाडीं विखुरलेलें आहे. जमीन व खेडोपाडीं पसरलेली मनुष्यशक्ति यांचा कसा उपयोग केला जातो यावरच आपल्या देशाचें भवितव्य अवलंबून आहे.

भारताचें एकूण क्षेत्रफळ ८० कोटि एकर. त्यांपैकीं १९ कोटि एकर जमीन डोंगर, वाळवंटें व दुर्लंध्य जंगलें यांनीं व्यापली असून ३२ कोटि एकर जमीन आजहि कसण्यायोग्य आहे. भारतांतील सुमारें ३० कोटि जनता खेड्यांत पसरलेली आहे. ३० कोटि लोकांचे साठ कोटि हात व ३२ कोटि एकर जमीन यांच्यांत मेळ घालतां आला तरच येथें आर्थिक व सामाजिक न्याय निर्माण होईल. आर्थिक व सामाजिक न्यायाची घोषणा तर सरकारनें केली, पण हा न्याय आणायचा कसा ? भारतानें शांततेच्या मार्गानें इंग्रजी राज्य येथून घालविण्याचा प्रयत्न केला, स्वातंत्र्य मिळाल्यानंतर देशी सरकारच्या राजवटींत त्याच शांततेच्या मार्गानें आर्थिक शोषण नष्ट करतां येईल का ? संपूर्ण सामाजिक समता प्रस्थापित करतां येईल का ?

असा प्रयत्न करतांना अशांतता माजून समाजाची घडी विस्कटून जाईल असा समंजस विचार करून सत्तेवर असलेल्या आमच्या नेत्यांनीं सबूरीचा मार्ग पत्करला.

समाजाची घडी विस्कटली, शांतता नाहींशी झाली तरी बेहेत्तर; पण जनतेला चेतवून बहुजनसमाजाचें होणारें शोषण तावडतोब थांबविलेंच पाहिजे असा हेका कम्युनिस्टादींनीं चालविला.

मिळालेली लोकशाही कायम ठेवून, आर्थिक समतेसाठीं प्रयत्न करावा म्हणून देशांतील लोकशाहीवादी पक्ष निवडणुकींच्या पंचवार्षिक कार्यक्रमाकडे डोळे लावून बसले.

स्वतःच निर्माण केलेल्या मर्यादा उल्लंघण्याचें धैर्य सत्ताधाऱ्यांना होईना. कम्युनिस्टादींना जनतेची साथ मिळेना. इतर पुरोगामी लोकशाहीवादी पक्षांना निवडणुकींत यश येईना.

जनतेचे हाल मात्र वाढत होते. आर्थिक शोषण नष्ट होत नव्हतें. ज्या जमिनीच्या मालकीमुळें देशांतील कोट्यवधि शेतमजूर व अपुरी शेती असलेले शेतकरी पिळले जात होते. ती मालकी कशी नाहींशी करावी हें कोणाला सुचत नव्हतें.

शांतता टिकवायला जावें तर उघडया डोळ्यांनीं अन्याय पहात बसावें लागतें, वाटेल तीं साधनें वापरावीं तर ध्येयच हातून जातें; अशी परिस्थिति झाली होती.

जमीनदारी नष्ट करण्याचे कायदे करून हळूंहळूं ग्रामीण भागांतील आर्थिक शोषणाचा निरास करण्याचा दीर्घसूत्री प्रयत्न शासकांनीं आरंभिला. पण खेडोपाडीं पसरलेल्या कोट्यवधि शेतमजुरांचें काय ? शेतमजुरांच्या प्रश्नानें देशांतील बुद्धिमंतांची मति कुंठित झाली. ह्या अकुशल शेतमजुरांना शहरांत आणून रोजगार द्यायला तरी कुठें साधनें उपलब्ध आहेत ? आणि शहरांत काय कमी बेकारी आहे ?

देशाच्या विकासाचा सर्व बाजूंनीं विचार करण्यासाठीं जमलेल्या नियोजकांनाहि मार्ग सांपडेना. अशा बिकट अवस्थेंत अचानकपणें १८ एप्रिल १९५१ रोजीं, हैद्राबाद राज्यांतील नलगोंडा जिल्ह्यापैकीं पोचमपल्ली या गांवीं एक चमत्कार झाला. बिकट प्रश्नाचें सुलभ उत्तर सांपडलें.

• • •

१९५१ च्या एप्रिल महिन्यांत हैद्राबादजवळ शिवरामपल्ली या ठिकाणीं सर्वोदय विचार मानणारांचें संमेलन भरलें होतें. विनोबा वर्ध्यापासून पायीं चालत चालत तेथें गेले होते. तेलंगण भागांत कम्युनिस्टांनीं धुमाकूळ माजविला होता. लोक हवालदिल झाले होते. सगळीकडे भीतीचें साम्राज्य. विनोबा तेथील परिस्थिति आपल्या डोळ्यांनीं प्रत्यक्ष पहावी म्हणून संमेलन संपतांच तेलंगणांत जायला निघाले.

दुनियेंत अन्याय चालू असावा, अन्याय असह्य झाल्यामुळें बंडांचा झेंडा उभारून लोकांनीं लूटमार सुरू करावी आणि 'शांति शांति शांतिः' असा मंत्र जपत शांततेच्या उपासकांनीं आपल्या मठांत जनतेपासून फटकून बसून रहावें, असें घडत होतें. पण शांततेचा खरा उपासक 'शांततेसाठीं अन्याय सहन करा' असें कधींच सांगत नाहीं. कारण त्याला समाज निस्तेज करायचा नसतो. शांततेच्या मार्गानें अन्यायांचें खऱ्या अर्थानें निवारण करतां येईल असें तो दाखवितो आणि न्याय आणि वैभव एकाच वेळीं आणतो. अशांततेचा, हिंसेचा मार्ग घेतला तर अन्यायाला विरोध करण्यासाठीं कांहीं केल्याचें लटकें समाधान कांहीं काळ मिळतें; पण अन्याय मुळापासून नाहींसा होत नाहीं. जो सर्वांत जास्त हिंसा करील त्याच्या जुलमाला लोक बळी पडतात! एका अन्यायाच्या जागीं दुसरा अन्याय बोकांडी बसतो.

पण अखेर एकटा मनुष्य काय करणार आजच्या गुंतागुंतीच्या समाजव्यवस्थेतें, यंत्रांच्या साम्राज्यांत असें मनांत येतें खरें! 'आपण एखाद्या मोठ्या यंत्रांतलें एखादें चाक, एखादा बोलट आहोंत. जागींच पडेल तें काम बजावणें एवढेंच आपल्या हातीं' अशी असहायतेची भावना बहुसंख्य लोकांच्या मनांत वास करीत असते हेंहि खरें. पण एकादा निश्चयाचा महामेरू असला तर तो वाटेल तें करूं शकतो. निदान आपण हे सगळे अन्याय उघड्या डोळ्यांनीं पहात न बसतां त्यांना विरोध केला, एवढें समाधान तरी माणसाला लाभूं शकतें. सगळे सत्प्रयत्न नेहमीं यशस्वीच होतात असें नव्हे. पहिल्याच मोटेचें पाणी पिकाला पोंचत नाहीं, पहिल्याच घावांत दगड फुटत नाहीं. नवव्या मोटेचें पाणी शेतांत पोंचलें, पंधराव्या घावांत दगड फुटला; म्हणून ते मागचे कष्ट का वायां गेले? त्या मागच्या कष्टांतूनच तें शेवटचें यश निर्माण झालेलें असतें.

आणि खरा आनंद कांहीं यशांतच असतो असें नाहीं. पुष्कळ वेळां तर यश मिळाल्याचा आनंद क्षणभर टिकून नाहींसा होतो. उलट प्रयत्नांचा आनंद प्रयत्न चालू आहेत तोंवर मिळतच असतो.

केवळ यशाची, लौकर यश मिळावें अशी लालसा मनांत असली तर वाटेल तीं साधनें वापरून मनुष्य काम फत्ते करायला पहातो आणि मग तें यशहि अपयश बनतें.

शेवटीं विचार केला तर दिसतें कीं प्रयत्न करण्याची इच्छा मनांत उत्पन्न होऊन प्रयत्नांची योग्य वाट चालू लागणें हेंच खरें यश! शांति सैनिकानें याच दृष्टीनें आपली वाटचाल सुरू केली.

★ ★ ★

# लोकहृदयांतील रामरायांना साद

गांधीजींच्या विचारांचें हेंच वैशिष्ट्य आहे कीं, तो विचार माणसाला दुबळा मानीत नाहीं, अपार सामर्थ्यवान् मानतो. आपल्याला इष्ट असलेल्या गोष्टींसाठीं प्रयत्नांची शिकस्त करीत मरण्याची शक्ति ज्या माणसांत आहे तो दुबळा कसा ? इवल्याशा अणूमध्यें सारें जग हादरवण्याची शक्ति आहे मग ज्या आत्म्याच्या बळावर ही अणूची कुपी माणसानें उघडली, त्याच्यांत किती सामर्थ्य असेल ? या आत्मशक्तीच्या जोरावर सत्यासाठीं मनुष्य एकाकी लढूं शकतो. आत्म्याची शक्ति ओळखणाऱ्या शांति-सैनिकाला सतत युद्ध करतां येतें.

विनोबा तेलंगणांत निघाले होते ते एक शांतिसैनिक म्हणून. द्वेषाचा वडवानल जेथें भडकला होता तेथें प्रत्यक्ष जाऊन त्यांना तो वडवानल काबूंत आणावयाचा होता. बाजारगप्पा आणि सरकारी बातम्या यांच्यावर विसंबून न राहतां आपल्या डोळ्यांनीं त्यांना सगळी परिस्थिति पहायची होती. लोकांचीं हृदयें त्यांना चापसून तपासायचीं होतीं. म्हणूनच त्यांनीं आगगाडी, मोटार, विमान यांचा आश्रय घेतला नाहीं. पायीं निघाले.

वाटेनें ते स्त्रियामुलें, म्हातारेकोतारे, तरणेताठे, गरीबश्रीमंत सर्वांच्या गांठी घेत. त्यांच्याशीं मनमोकळेपणानें बोलत. कोणाच्या हृदयांत कोठें काय सलतें आहे तें पहात ते निघाले. हरिजनांच्या वस्तींत तर ते न चुकतां जात, त्यांची विचारपूस करीत.

मजल दरमजल करीत ते तेलंगणाच्या नलगोंडा जिल्ह्यांत शिरले. १८ एप्रिल १९५१ चा दिवस. पोचमपल्ली या गांवांत विनोबा आले होते. गांवकरी मंडळींचीं हृदय-कवाडें कशीं उघडणार ? किल्ली गवसली तर क्षणांत कुलूप उघडतें. जर किल्ली न सांपडली


तर सारी धडपड, खटपट यशस्वी होणें काठिण जातें. विनोबांना ही किल्ली गवसली होती. खेडेगांवांतील बंधुभगिनींच्या हृदयांत शिरायचें तर रामनाम हा खुणेचा, परवलीचा शब्द असतो. विनोबा हा मंत्र उच्चारीतच गांवांत शिरत. त्यामुळें सगळें गांव त्यांचें मनमोकळे-पणानें स्वागत करायला सामोरें येई.

त्या दिवशीं विनोबांना भेटायला गांवांतले कांहीं हरिजन बंधु आले होते. त्यांनीं आपलें रडगाणें गायिलें. म्हणाले : " आम्हांला शेती करायला जमीन नाहीं कीं, पोट भरायला दुसरा कुठला रोजगार ? आम्ही भूमिहिन, साधनहीन लोक उपासमारीनें तडफडत आहोंत. आम्हांला थोडीफार जमीन मिळाली तरच आमची उपासमार थांबेल. " विनोबाजींनीं त्यांच्या सर्व अडचणींची अत्यंत सहानुभूतिपूर्वक विचारपूस केली. त्यांची परिस्थिति खरोखरच फार बिकट होती. जमीन मिळाल्यानें त्यांची स्थिति हमखास थोडीफार सुधारली असती, जीवन थोडें सुसह्य झालें असतें.

पण जमीन देणार कुठून ? विनोबांच्या क्षणभर मनांत आलें. हैद्राबादच्या काँग्रेस मंत्र्यांकडून थोडीफार जमीन देववावी. पण सरकारच्या दप्तरदिरंगाईत किती वेळ लागतो कोणाला ठाऊक ! टेकीस आलेल्या इसमाला वर्ष सहा महिन्यांनंतर पदरांत पडणारें आश्वासन देणें म्हणजे स्वर्गांत गेल्यावर दुधामधाच्या नद्यांत डुंबतां येईल असें सांगण्यासारखेंच असतें. आणि नुसती जमीन मिळून त्यांचे सर्व प्रश्न मिटणार होते असेंहि नाहीं. जमीन मिळाली तर नंतर नांगरवखर पाहिजे, बींबियाणें पाहिजे, एक ना दोन हजार त्यांच्या गरजा. ह्या गरजा सगळ्या सरकार कधीं भागवणार ?

स्वातंत्र्य मिळण्यापूर्वीं सरकारकडे अर्जविनंत्या करून मागण्या करण्यांत कमीपणा वाटे. काँग्रेसच्या बालपणांत हा अर्जविनंत्यांचा मार्ग चोखाळला जात होता. पण टिळक-गांधींनीं तो मार्ग टाकला आणि लोकांची शक्ति निर्माण करण्याचें काम आरंभलें. स्वातंत्र्य-पूर्व काळांत जर स्वावलंबनाची कांस आपण धरीत होतों तर मग स्वातंत्र्यानंतर परावलंबनाची गुलामी सुरू करायची कीं काय ? सरकारच्या तोंडाकडे पहात बसण्यापेक्षां जनतेलाच कौल कां लावूं नये ?

हिंसाशक्तीवर तर विनोबांचा काडीभरहि विश्वास नव्हता. हिंसेच्या साधनानें खऱ्या अर्थानें जगांतला एकहि प्रश्न आज सुटूं शकत नाहीं. एक प्रश्न हिंसेनें सोडवायला जावें तर दुसरे अनंत प्रश्न पुढें उभे राहातात. लोकशाही कारभारांत दंडशक्तीवर आधारलेलें सरकार कांहीं प्रमाणांत न्यायाची प्रस्थापना करूं शकतें. पण लोकमत जोंवर बदललें नाहीं व



प्रभावी झालें नाहीं तोंवर सरकारेंहि एका मर्यादेपलीकडे कार्य करूं शकत नाहींत. शेवटीं लोकशाही राजवटींत सर्वसत्ताधीश जनताच असते, सरकार तिचें ताबेदार असतें.

हिंसाशक्ति आणि दंडशक्ति यांच्यावरील मर्यादा लक्षांत घेतल्या म्हणजे खऱ्या क्रांतिकारकाला एकच मार्ग मोकळा राहतो आणि तो म्हणजे लोकांच्या मनांत जीं कालविसंगत मूल्यें रुजलीं असतील तीं उपटून टाकून नवीं मूल्यें तेथें रुजवायचीं. रामराज्यांत वैर आणि विषमता राहूं शकत नाहीं, असें तुलसीदासानें सांगून ठेवलें आहे. विषमता मिटली कीं वैरहि शमतें. विनोबा शक्य तितक्या लौकर समाजांतली आर्थिक विषमता नाहींशी करूं इच्छित होते, पण उतावळेपणानें चुकीचें पाऊल पडूं नये, ह्याची दक्षताहि ते बाळगीत होते.

त्या दिवशीं प्रार्थनेनंतर लोकांच्या हृदयांतील रामरायांना साद घालायचें त्यांनीं ठरविलें. हरिजनांच्या अडचणींचा पाढा विनोबांनीं लोकांपुढें वाचला. आपल्या गांवांतील सर्वांना रोटी आणि रोजगार देण्याची जबाबदारी आपली आहे असें जर गांवकरी मानतील तर पुन्हां सर्वत्र वैभव येईल, वैरभाव शमेल. आपल्या गांवांत कोणी व्यवसायहीन असणें, कोणाची उपासमार होणें, हें गांवाला लांछन आहे. जवळपास भुकेनें व्याकुळ झालेले लोक असतांना जो अन्नाचीं कोठारें भरून ठेवतो, तो अन्न सांठवीत नाहीं, आपला

मृत्युच सांठवितो, आपल्या गांवांतलि हरिजनांची कणव येऊन नाहीं का कोणी त्यांना जमीन देणार ?

श्री. रामचंद्र रेड्डी नांवाचे पोचमपल्लीचे एक सद्‌गृहस्थ. त्यांच्या हृदयांतल्या रामरायांनीं साद ऐकली. ते उभे राहिले. हरिजनांनीं किमान ऐंशी एकर जमिनीची मागणी केली होती. रामचंद्र रेड्डींनीं शंभर एकर जमीन त्या दीनदलित व शोषित हरिजनांना देण्याचें आश्वासन दिलें. भूदानाची गंगोत्री वाहूं लागली.

● ● ●

दान मिळालें. विनोबाजी त्यावर विचार करूं लागले. त्यांच्या हृदयस्थ परमेश्वरानें हुंकार दिला. तो ईश्वराचा इषारा होता. नव्या मार्गाचें तें सूचन होतें. गणिताच्या भाषेंत अशक्य वाटणारी घटना ह्यांतून घडूं शकेल अशी श्रद्धा त्या रात्रीं त्यांना वाटूं लागली.

आज शतसहस्र प्रवाहांनीं जनतेच्या आशा कुसुमित करीत ही भूदानाची गंगा वहात आहे. साऱ्या जगांतलि विचारवंतांच्या नजरा या चळवळीनें वेधून घेतल्या आहेत. " भूदानाचा कार्यक्रम देशापुढें ठेवून विनोबांनीं देशांत जणुं नवें चैतन्य आणलें " असें जयप्रकाश नारायण म्हणाले. राष्ट्रपति बाबू राजेंद्रप्रसाद म्हणाले : " भूदान नव्हतें तोंवर आम्ही गांधींचे अनुयायी अंधारांत चांचपडत होतों. पण भूदानानें आम्हांला प्रकाशकिरण लाभला. " पं. जवाहरलाल नेहरू व लोकसभेचे अन्य सदस्य, त्यांनींहि या अभिनव मार्गाची प्रशंसा केली.

स्वतंत्र भारताची जी पहिली पंचवार्षिक योजना तिच्या आराखड्यांत कोणाहि व्यक्तीचा उल्लेख नाहीं, अपवाद फक्त विनोबांचा. त्या आराखड्यांत दोन ठिकाणीं विनोबा आणि भूदान–आंदोलन यांचा उल्लेख आला आहे.

" कायद्याच्या मार्गानें भूमिहीन शेतमजुरांना फार कमी फायदा मिळूं शकेल. मोठमोठ्या जमीनदारांकडून अतिरिक्त जमीन काढून घेतली तरी ती प्रथम कुळांनाच वांटावी लागणार. शेतमजुरांना जमीन मिळवून देण्याच्या बाबतींत कायदा फारशी मदत करूं शकत नाहीं. अशा परिस्थितींत शेतमजुरांना जमीन मिळवून देणारे आचार्य विनोबा भावे यांचें भूदान–आंदोलन खास महत्त्वाचें ठरतें ही गोष्ट लोकांच्या ध्यानांत येईल, कारण सामान्यतः शेतमजुरांना जी संधि मिळण्याचा संभव नव्हता ती संधि विनोबाजींच्या या चळवळीमुळें मिळूं शकेल.

[ प्रकरण १२, परिच्छेद २५ ]

दानाच्या रूपानें जमीन मिळवून तिचें वांटप करणारें भूदान-आंदोलन चालू आहे. ह्या चळवळीला सर्व प्रकारें मदत केली पाहिजे. नैतिक दृष्टीनें ही चळवळ फार महत्त्वाची आहे. या चळवळीला मदत केल्यानें देशांतील गुंतागुंतीचा जमिनीचा प्रश्न सुटण्याला निश्चित साह्य होईल. प्रत्येक राज्यानें आपल्या ग्रामविकासाच्या कार्यक्रमांत भूदानाचा अंतर्भाव करावा.

[ प्रकरण १३, परिच्छेद १२ ]

विनोबाजींचें नांव आज देशाच्या कानाकोपऱ्यापर्यंत निनादत आहे. पण १९४०च्या व्यक्तिगत सत्याग्रहापर्यंत त्यांना फार थोडे लोक ओळखत होते. गांधीजींनीं पहिला सत्याग्रही म्हणून त्यांची निवड केली तेव्हां त्यांचें नांव पहिल्यांदा जगासमोर आलें. परंतु व्यक्तिगत सत्याग्रहानंतर पुन्हां ते विधायक कार्यक्रमांत रमून गेले. भूदानाच्या कामामुळें आतां पुन्हां त्यांचें नांव सर्वतोमुखीं झालें आहे.

विनोबांना हा अभिनव मार्ग कसा सांपडला? हा का एकादा अपघात, चमत्कार आहे? पण हा अपघात नाहीं. चमत्कार नाहीं. एक दिवस आंब्याचें झाड मोहोरानें बहरून आलेलें दिसतें. सगळीकडे सुगंध दरवळतो. आम्ही आश्चर्यानें तोंडांत बोटें घालतों. 'काल यांतलें कांहीं नव्हतें, आणि आज हें इतकें सगळें कोठून आलें?' असें आपण उद्गारतों. पण झाडाच्या साधनेला फुटलेलें तें मांगल्य असतें. विनोबांना भूदान सुचलें तो कांहीं एकाएकीं घडलेला चमत्कार नव्हे. त्यांच्या जीवनसाधनेला लागलेलें तें मंगल मधुर फळ आहे. अडीच तपें त्यांनीं जें तप केलें त्यांचें तें फल आहे. भूदानाचीं बीजें त्यांच्या पूर्वजीवनांत दडलेलीं आपल्याला सांपडूं शकतील.

शास्त्रज्ञाला नवा शोध लागतो. तेव्हां इतरांना तो अपघात, चमत्कार वाटतो. पण शास्त्रज्ञाच्या संवेदनशील मनानें घेतलेला तो कानोसा असतो. एकादी संवादी लकेर आल्यावर लावलेल्या तंबोऱ्याच्या तारा ती पकडून घेतात तसेंच हें घडतें. वर्षानुवर्षांच्या तपश्चर्येनंतर हृतंत्रींतून मंगल संगीत निघावें तसें हें घडलें आहे. विनोबांच्या जीवनाची त्यासाठीं अधिक माहिती आपण घेतली पाहिजे.

★ ★ ★


मराठा ग्रंथ संग्रहालय, ठाणे
अनुक्रम ........ वि: ........
........ नों. दि. ........

# समर्पणाची ओढ

विनोबांचें पूर्ण नांव विनायक नरहर भावे. विनोबा हें नांव प्रथम गांधीजींनीं त्यांच्या वडिलांना पत्र पाठवितांना वापरलें. तुकारामांचे तुकोबा व ज्ञानेश्वरांचे ज्ञानोबा असे संक्षेप वारकरीबंधु करतात. त्यावरूनच गांधीजींनीं विनायकाचें विनोबा केलें व अभावितपणें त्यांना ज्ञानेश्वर–तुकारामांच्या मालिकेंत बसविलें. भागवत धर्माचा पाया ज्ञानोबांनीं घातला, तुकोबा कळस झाले. या दोहोंत सारी भागवत धर्माची संत–परंपरा आली आणि त्यांतच विनोबांचाहि गांधीजींनीं अभावितपणें केलेला समावेश आज यथार्थ ठरला आहे.

विनोबांचा जन्म, कुलाबा जिल्ह्यांतल्या पेण तालुक्यांतील गागोदें या गांवीं ११ सप्टेंबर १८९५ रोजीं झाला. त्यांचे आजोबा शंभुराव ईश्वराचे परम भक्त होते. आपल्या मुला-नातवंडांना त्यांनीं आध्यात्मिक संपदा आईच्या दुधासोबतच जणुं दिली होती. त्यांचीं नाना व्रतेंवैकल्यें चालत. चांद्रायण व्रतांत तिथीइतके घास रोज चंद्र उगवल्यावर घ्यावयाचे असतात. हें व्रत ते करीत. चंद्र उगवल्यावर आरती होई. त्यावेळीं घरांतल्या मुलांनाहि उठवीत व देवापुढें नमस्कार घालायला लावीत. विनोबांच्या जीवनांत जी अपार ईश्वरश्रद्धा दिसते तिचीं बीजें त्या वेळीं रुजलीं. आजोबांची ही आठवण झाली कीं अजूनहि विनोबा सद्‌गदित होतात.

भाव्यांनीं वाईला कोटेश्वराचें मंदिर बांधलेलें आहे. आजोबा कोटेश्वराच्या उत्सवाच्या दिवशीं हरिजनादींसुद्धां सर्वांना मुक्तद्वार ठेवीत. मंदिरांत ते हरिजनांनाहि जेवायला घालीत. एक मुसलमान गवई त्यांनीं देवासमोर गाण्यासाठीं ठेवला होता. देवासमोर कसले भेदाभेद ?' असें ते म्हणत. ही त्यांची जातिधर्मभेदातीत भक्ति



[illegible] णांत दिसून येते. ते म्हणतात : “एका धर्माचा दुसऱ्या धर्माशीं झगडा कसा असूं शकेल ? धर्माचा झगडा धर्माशीं नाहीं, अधर्माशीं तो असतो. सर्व धर्मांनीं मिळून अधर्माशीं झुंज घ्यायची आहे. ज्या त्या भूभागाच्या गरजेप्रमाणें त्या त्या ठिकाणच्या भाषेंत आपला संदेश देणारा प्रेषित ईश्वर पाठवीत असतो. त्यांच्यांत उंचनींच ठरविणें हा मूढपणा आहे.”

आजोबा मुलांना ईश्वरभक्ति शिकवीत तशीच त्यागवृत्तिहि बाणवीत. घरच्या झाडांचे पहिले आंबे आले कीं बहुधा लोक स्वतः खातात, फार तर उरलेसुरले मुखीं लागावे म्हणून इतरांना देतात. परंतु विनोबांच्या आजोबांचा पायंडा वेगळा. घरच्या झाडावरचे आंबे उतरले कीं प्रथम गांवांत घरोघर मुलांच्या हस्तें ते वांटून देत व नंतर घरांत खायला आणीत. पहिला वांटा समाजाचा, असें जणुं बाळकडू त्यांनीं घरांतल्या मुलांना पाजलें.

त्यांचे आजोबा भजनपूजनापुरता धर्म पाळणारे नव्हते. जीवनाच्या सर्व अंगांना व्यापून धर्म राहिला पाहिजे यासाठीं त्यांची धडपड असे. विनोबाजी याच दृष्टीनें म्हणतात :

" घरांत हवेची म्हणून कांहीं वेगळी खोली असत नाहीं. दरेक खोलींत हवा असणें आवश्यक असतें. त्याचप्रमाणें धर्म कांहीं जीवनांतल्या एकाद्याच भागासाठीं म्हणून नसतो. तो सर्व जीवन व्यापून राहिला पाहिजे. " विनोबांचे आजोबा हे अशा धर्मवृत्तीचे आदर्श उदाहरण होतें.

● ● ●

विनोबाजींची आजी कर्तबगार आणि करारी. वयाच्या पंचावन्नाव्या वर्षीं ती लिहावाचायला शिकली. विनोबाजींचें बाळपण बरेंचसें आजोबा आणि आजी यांच्या छायेंत गागोदें आणि वाई येथें गेलें. विनोबांचे वडील नरहरपंत बडोद्याला असत, आई रुक्मिणी जाऊन येऊन असत.

विनोबांच्या जीवनांत बालपणापासून उत्कट श्रद्धा बाणली. बाळपणींच ब्रह्मचर्याचा प्रचार करण्याचें कार्य आपल्याला परमेश्वरानें निर्देशिलें आहे, अशी प्रेरणा त्यांना झाली आणि त्यांनीं वयाच्या दहाव्या वर्षीं आजन्म ब्रह्मचारी राहाण्याची प्रतिज्ञा घेतली.

विनोबांचें प्राथमिक शिक्षण महाराष्ट्रांत झालें. नंतर वडील बडोद्याला नोकरीला होते म्हणून त्यांना तिकडे जावें लागलें. इंग्रजी तिसरीपर्यंतचें त्यांचें तेथील शिक्षण घरींच झालें. फक्त चित्रकला शिकायला ते शाळेंत जात. आई संतांचीं भजनें गात असे, त्यामुळें विनोबांना संतसज्जनांचा सहवास लाभला. साध्या साध्या प्रसंगांच्या अनुरोधानें आई संस्कार करीत असे.

सामान्यतः आपल्याकडील माता सुनमुख पाहायला उत्सुक असतात. घरांत मुलांवर सांसारिकतेचे संस्कार सहजपणें होतात. पण ही माउली वेगळी होती. तिचें साधें बोलणें म्हणजे जणुं सुभाषितें. भोगापेक्षां त्यागांतलें वैभव काय असतें तें तिनें मुलांना दाखविलें : ' विन्या, देतो तो देव, राखतो तो राक्षस ' असें ती शिकवायची. ' उत्तम गृहस्थाश्रम केला तर पितृऋण फिटतें, उत्तम ब्रह्मचर्य साधलें तर चाळीस पिढ्यांचा उद्धार होतो ' असें ती विनोबांना सांगे. विनोबाहि आईला घरकामांत कधीं मदत करीत. तिला ' केसरी ' वाचून दाखवीत.

विनोबा कधीं कधीं आपल्या आईच्या आठवणी बोलून जातात. शेजारच्या घरीं कांहीं अडचण असली, कोणी आजारीपाजारी असलें कीं विनोबांची आई त्यांच्या घरचा स्वयंपाक करून द्यायची. आपल्या घरची रसोई आटोपून मग ती दुसऱ्यांकडे जायची. विनोबांचें आपल्या मातेवर मोठें विचित्र प्रेम होतें ! एक दिवस ते आईला म्हणाले : " आई, तूं मोठी स्वार्थी आहेस. आधीं घरची रसोई करून नंतर तूं दुसऱ्याकडे जातेस. "

त्यावर त्यांची आई हंसून म्हणाली: " विन्या, अगदीं गांवढळ कसा तूं? हें पहा मी आधीं त्यांच्या घरीं स्वयंपाकाला गेलें तर जेवायच्या वेळेपर्यंत सगळे पदार्थ थंड होऊन जातील आणि त्या बिचाऱ्यांना सगळें गार खावें लागेल. मी त्यांच्याकडे मागून जातें म्हणून त्यांना गरमागरम जेवण तरी मिळतें. "

विनोबाजींना त्या दिवशीं धडा मिळाला कीं, दुसऱ्याच्या कामाची किंमत ठरवण्या-पूर्वीं त्यानेंहि कांहींतरी हितबुद्धीनेंच तें काम केलें असेल असें मानून त्याची भूमिकाहि समजून घेण्याचा प्रयत्न केला पाहिजे. ही सहिष्णुता हा धर्माचा आत्मा आहे. विनोबांच्या मातेजवळ अशी धर्मबुद्धि होती. त्यामुळेंच तिच्यावर आसपासच्या सर्व लोकांचें प्रेम असे. आणि तिच्या सूचना सारें निमूटवाणीनें पाळीत. सेवेंतून तिनें हा अधिकार मिळविला होता.

शंकराचार्य, ज्ञानेश्वर आणि रामदासस्वामी यांच्या वैराग्यवृत्तीचा लहान वयांतच विनोबांवर फार परिणाम झाला. घरांत एका वाकळीवर विनोबा झोंपत. कोणी कधीं त्यांच्यासाठीं गादी घातली तर ती गुंडाळून ठेवून कांबळ्यावर ते झोंपत. चार दोन वेळां विनोबांची ही वागणूक आईनें पाहिली तेव्हां तिनें त्यांना विचारलें. विनोबांनीं ब्रह्मचर्याच्या नियमांचा हवाला दिला.

मुलाच्या ह्या भावनेनें आईला अपार आनंद व्हायचा. ती म्हणायची: " विन्या, मला स्त्रीचा जन्म मिळाला म्हणून, पण जर पुरुषाचा जन्म मिळता तर तुझ्यापेक्षां मी एखादें पाऊलतरी पुढेंच राहिलें असतें. " विनोबा म्हणतात: " ती तशी वागली असती यांत मला तिळमात्र शंका नाहीं. "

लहानपणापासून विनोबांच्या जीवनावर ज्या पुस्तकांचा खोल ठसा उमटला व त्यांत इसापनीति हेंहि पुस्तक आहे. इसापच्या गोष्टींतले पशुपक्षी, प्राणि माणसांसारखें बोलतात. मुलांचा त्यावर विश्वासहि बसतो. विनोबाजी आपल्या वाचनावाबत लिहितात: " एकदां मला कुणीसें विचारलें, ' तुमचीं आवडतीं पुस्तकें कोणतीं? ' तेव्हां मी गीता, इसापनीति आणि युक्लिडची भूमिति, हीं तीन नांवें सांगितलीं होतीं. ' थोड्यांत गोडी ' असें एक सूत्र आईनें आम्हांला शिकविलें होतें. तें ह्या तीनहि पुस्तकांना तंतोतंत लागूं पडतें. पण त्यांतहि नंबर लावायचा तर युक्लिडचा पहिला लागेल. कारण क्वचित् कोठें एखाद्या रंगेल गवयाप्रमाणें गीतेंत एखाद दुसरी तान जास्त कमी मारलेली सांपडते.

इसापनीतींतहि कांहीं गोष्टी फुकट लांबल्या आहेत. युक्लिडमध्यें या गोष्टींना अजिबात वाव नाहीं. " अर्थात् इसापनीतींतील तात्पर्याचा भाग विनोबा अजिबात वाचत नसत. विनोबांच्या या उद्गारांवरून त्यांच्या बालपणाच्या वाचनाची कल्पना येते. उगीच फांफट वाचण्याचा त्यांना कंटाळा. अर्थज्ञानानें परिपूर्ण असलेलें अल्पाक्षर साहित्य त्यांना आवडे.

• • •

त्यांचे वडील मोठे तापट व करारी होते. आपल्या मुलांनीं केवळ पुस्तकी पंडित न बनतां उद्योगी व कलावान् व्हावें असें त्यांना वाटे. ते स्वतः नाना प्रयोग करीत. मुलांना त्यांचा धाक असे. मोकळेपणानें मुलें त्यांच्याशीं कधीं बोलत नसत. ते अत्यंत शिस्तप्रिय होते. व्यवस्थितपणाचा त्यांना हव्यास असे. मुलें धाकांत राहिलीं कीं चांगलीं बनतील, असें त्यांना वाटे. मुलांवर त्यांची सक्त नजर असे. मुलांना मारीतहि कधीं रागवले म्हणजे. पण त्यांचें मारणेंहि मोठें शास्त्रशुद्ध असे. मुलांना हात बांधून खालीं पाडून मारीत. मुलेंहि वडिलांप्रमाणेंच हट्टी; मार खात पण आपला हेका सोडीत नसत.

इंग्रजी चौथीपासून विनोबा नियमित शाळेंत जाऊं लागले. शाळेंत हुषार विद्यार्थ्यांत त्यांची गणना होऊं लागली. त्यांच्या हुषारीमुळें जसे ते प्रसिद्ध होत तसे आपल्या विक्षिप्तपणामुळेंहि सर्वांना ठाऊक झाले होते. शिक्षकांचा त्यांच्या विक्षिप्त वागणुकीमुळें त्यांच्यावर राग असे. विनोबाजी औपचारिक शिष्टाचार कधीं पाळत नसत. विद्यार्थ्यांत मात्र ते प्रिय होते. वर्गांतील विद्यार्थ्यांचे ते म्होरके असत. त्यांना भटकण्याचा विलक्षण छंद. बालपणीं गागोद्याच्या आसपासच्या डोंगरावर ते फिरत. बडोद्याला ते मित्रांना घेऊन विश्वामित्रीच्या वाळवंटांतूनहि ऐनउन्हांत वणवण हिंडत. पांच सात मैलांचें फिरणें त्यांच्या खिजगणतींत नसे. उन्हाळ्यांत अंगांतला सदरा काढून तो खांद्यावर टाकून ते फिरत.

या मित्रांत देशाच्या स्वातंत्र्याबद्दल चर्चा चालत. सरकारी रोष ओढवून घेतलेलीं, जप्त झालेलीं वर्तमानपत्रें व पुस्तकें प्रयत्नानें मिळवून हीं मित्रमंडळी वाचीत. विनोबा वाचनाच्या बाबतींतहि मोठें छांदिष्ट होते. एखाद्या पुस्तकांतला एखादा भाग आवडला कीं तोच सारखा वाचीत. राजकीय साहित्याबरोबरच संतसाहित्यावरहि त्यांचा भर असे. इंग्रजी सहावीच्या परीक्षेंत मराठीच्या पेपरमध्यें सर्वांत जास्त गुण मिळाल्यामुळें त्यांना बक्षीस मिळालें. त्या रकमेंतून त्यांनीं संतवाङ्मय खरेदी केलें. सावरकरांनीं लिहिलेलें मॅझिनीचरित्र विनोबांना फार आवडत असे.

वडिलांच्या सूचनेवरून विनोबांनीं फ्रेंच विषय शाळेंत घेतला होता. फ्रेंच भाषा संशोधनाच्या दृष्टीनें उपयुक्त, असें वडिलांना वाटे. मुलानें संस्कृतच्याऐवजीं फ्रेंच घेतलेलें आईला आवडलें नाहीं. आई म्हणे: "विन्या, संस्कृत आपल्या धर्माची भाषा, ती नको का तुला यायला ?" विनोबा म्हणत: "आई, त्याची तूं चिंता करूं नकोस. संस्कृत यायला हवी असेल तर आल्याशिवाय राहील का ? दरेक गोष्ट शाळेंतच शिकायला पाहिजे असें थोडेंच आहे ?" विनोबाजींच्या आईला संस्कृत समजत नसे. आपल्या धर्माचा ग्रंथ गीता. तो समजावा असें तिला वाटे. विनोबांना ती 'मराठींत गीता नाहीं का ?' म्हणून विचारी. गीतेचें प्रेम त्यांच्या आईनेंच त्यांना दिलें. विनोबा म्हणतात कीं गीतेच्या मांडीवर मला सोडून नंतरच माझी आई गेली.

● ● ●

त्या काळांत लोकमान्य टिळक आणि ॲनी बेझंट यांनीं तरुणांचीं मनें जिंकून घेतलीं होतीं. 'केसरी' न वाचणारा मराठी तरुण मिळणें त्या काळांत अत्यंत दुरापास्त होतें. लोकमान्यांचा शब्द न् शब्द टिपून घेण्यासाठीं तरुण टपलेले असत. त्याच सुमारास वर्तमानपत्रांत प्रसिद्ध झालें कीं लोकमान्य मंडालेच्या तुरुंगांत गीतेवर एक विशाल भाष्य लिहीत आहेत आणि ते तुरुंगांतून सुटतांच तें भाष्य प्रसिद्ध होईल. विनोबांच्या मनांत आलें, जर मूळ गीताच आपल्याला समजली नसेल तर कदाचित् लोकमान्यांचें गीतेवरचें भाष्यहि आपल्याला समजणार नाहीं.

बस ! लगेच गीतेचा अभ्यास करण्याचा त्यांनीं निश्चय केला आणि गीतेचीं पारायणें सुरू केलीं. रिकामा वेळ थोडाहि मिळाला कीं लगेच गीता काढून ते बसत. शाळेंत मधल्या सुटींतहि त्यांच्या हातांत गीता असायची.

या असल्या इतर वाचनामुळें त्यांचें शालेय अभ्यासावरील लक्ष हळूंहळूं कमी झालें. किंबहुना पास होण्यापुरताच शाळेचा अभ्यास करावयाचा व बाकीची सर्व शक्ति इतर वाचनांत लावावयाची असा त्यांचा खाक्या सुरू झाला. पहिल्या बांकावर चमकणारें त्यांचें टोळकें मागल्या बांकावर बसूं लागलें. वर्गांत वरचा क्रमांक पटकावण्यासाठीं लागणारी बुद्धिमत्ता जणुं लोपली.

त्यावेळीं देशभक्तीच्या कल्पना अगदीं प्राथमिक अवस्थेंत होत्या. इंग्रजांचें राज्य नष्ट झालें पाहिजे असें तरुणांना तीव्रतेनें वाटे. निदान एका युरोपियनाचा तरी प्राण घेतल्यावांचून मेलों तर आपण पुरुषार्थशून्य ठरूं असें तरुण मानीत.

जनतेमधील स्वातंत्र्यभावना प्रज्वलित करण्यासाठीं लो. टिळकांनीं गणेशोत्सव व शिवाजीउत्सव असे दोन उत्सव सुरू केले होते. एके वर्षी विनोबाजी व त्यांचे मित्र सर्वांनीं मिळून शिवजयंति करायचें ठरविलें. शाळेच्या चार भिंतीआड शिवाजीसारख्या युगप्रवर्तक पुरुषाची जयंति साजरी करण्याला विनोबांचा विरोध होता. त्यांनीं सुचविलें कीं गांवाबाहेर जाऊन उत्सव साजरा करावा.

झालें, सगळे मित्र शाळा सोडून गांवाबाहेर गेले आणि त्यांनीं तेथें उत्सव साजरा केला. दुसऱ्या दिवशीं शिक्षकांनीं त्यांना त्याबाबत विचारलें. सर्वांनीं एकच उत्तर दिलें: 'स्वातंत्र्यवीराची जयंति शाळेच्या तुरुंगांत साजरी होऊं शकत नाहीं!' एवढेंच नव्हे तर शाळेच्या नियमाप्रमाणें सर्वांनीं गैरहजेरीबद्दल चार चार आणे दंडहि शिक्षकांच्या हवालीं केला! विनोबांच्या जीवनांतला कदाचित् हा पहिला सामुदायिक सत्याग्रह असेल.

लोकमान्य टिळक हें तरुणांचें दैवत होतें. टिळक-आगरकरांच्याप्रमाणें तलवारीसारखी धारदार लेखणी चालवावी असें त्यांना वाटे. विनोबा व त्यांचे मित्र एक हस्तलिखित मासिक चालवीत.

विनोबा व त्यांच्या मित्रांनीं विद्यार्थ्यांत नवचैतन्य आणण्यासाठीं एक विद्यार्थिमंडळ काढलें होतें. त्यांचें एक वाचनालय होतें. त्यासाठीं जागा घेतली तर काम वाढवितां येईल, असें मित्रांना वाटलें. पण भाड्याला पैसे कोठून आणायचे? विनोबा म्हणत: "पालकांच्याकडून पैसे मागणें बरें नव्हे. आपण लोकांची भाजी आणून देत जाऊं, भांडीं घासूं, कपडे धुवून देऊं, दळण-कांडण करूं व त्यांतून जे पैसे मिळतील त्यांचा भाडें भरायला उपयोग करूं." पण ही कल्पना त्यावेळीं प्रत्यक्षांत आणतां आली नाहीं. मित्रांनीं मॅट्रिकच्या विद्यार्थ्यांसाठीं गणिताचा वर्ग चालवायचें ठरविलें. विनोबांना विद्या शिकविण्याचे पैसे घेणें पसंत नव्हतें; परंतु त्यांनीं तडजोड काढली. म्हणाले: "चार आणे फी ठेवीत असाल तर मी शिकवीन." गणित विषय विनोबांचा अत्यंत आवडता. परमेश्वराच्या खालोखाल त्यांना गणित प्रिय. शेवटीं त्यांचे मित्र कबूल झाले. नुकतेच मॅट्रिक पास झालेले हे विद्यार्थी, पण त्यांच्या वर्गाला विद्यार्थी येऊं लागले. चारच आणे फी असल्यानें नित्य नवे विद्यार्थी यायचे! परंतु ह्या पैशांतून विद्यार्थि-मंडळाच्या वाचनालयासाठीं जागा भाड्यानें घेतां आली व जमायला एक हक्काची जागा झाली.

कॉलेजांतहि विनोबांचे सहाध्यायी आपल्याला अवघड वाटणारीं गणितें त्यांना विचारायला येत. आपापल्या अडचणी कागदाच्या एका तुकड्यावर ते लिहून आणीत.

विनोबा हे प्रश्न एका खिशांत ठेवीत आणि ते सोडवून झाले कीं दुसऱ्या खिशांत टाकीत. त्यांचे खिसे खाऊच्या ऐवजीं गणितांनीं भरलेले असत ! गणिती बुद्धि हें विनोबांचें एक खास वैशिष्ट्य आहे. त्यांच्या विचारपद्धतींतहि त्यामुळें एक प्रकारचा रेखीवपणा आला आहे. प्रत्येक युक्तिवाद मांडतांना ही बुद्धि वापरीत असल्यानें त्यांचें बोलणें मोठें समर्पक होतें आणि त्यांच्याशीं हुज्जत घालणें कोणाला शक्य होत नाहीं.

कॉलेजांत विनोबांचा रिवाज असा होता कीं, परीक्षेच्या वेळीं प्रश्नपत्रिका हातीं आली कीं सोपें, अवघड अशी निवड करीत न बसतां सरळ क्रमानें गणितें सोडवायचीं, एवढेंच नव्हे तर पर्याय म्हणून दिलेलीं उदाहरणेंहि सोडवून ठेवायचीं. ‘ कोणतींहि तपासा ’ असें वर लिहायचें आणि तरीहि भरपूर मार्क मिळवायचे. पण एकदां पहिलाच प्रश्न अत्यंत बिकट आला. पण विनोबा कसचे घाबरतात ! अवघड प्रश्नामुळें त्यांच्यांत आणखीच उत्साह निर्माण झाला. पण त्या प्रश्नाला फार वेळ लागला आणि इतर सोपे प्रश्न तसेंच राहून गेले ! परीक्षेच्या निकालपत्रांत असें दिसलें कीं विनोबा जेमतेम कांठावर मार्क मिळून उत्तीर्ण झाले आहेत आणि त्यांच्याजवळ गणित शिकणाऱ्या मित्रांना मात्र भरपूर मार्क मिळाले आहेत !

विनोबा म्हणतात : “ तेहेतीस टक्क्यांच्या पासाला कांहीं अर्थ नाहीं. माझ्याजवळ शंभर टक्के पास वा शंभर टक्के नापास असे दोनच पर्याय आहेत. इमारत बांधतांना नव्वद अंशांचा कोन करून भिंत बांधायची त्याऐवजीं चार दोन अंश इकडे तिकडे झाले तर चालेल का ? ”

कॉलेजच्या पहिल्या वर्षांत असतांना मोरोपंतांच्या केकावलीनें त्यांचें मन मोहून टाकलें. मोरोपंतांच्या केका ते मोठ्यानें म्हणत. सारी गल्ली गर्जून जात असे. ‘ मोरोपंतांच्या केकावलीनें माझा संस्कृतचा मार्ग सुलभ केला ’ असें विनोबाजी म्हणतात. याच काळांत लोकमान्यांचें गीतारहस्य प्रसिद्ध झालें. विद्यार्थिमंडळाला प्रत मिळाली नाहीं. पण बडोद्यांत एक प्रत आलेली होती. ह्या मित्रांनीं ती प्रत मिळविली व वाचन सुरू केलें. विनोबांना त्यांतील भक्तिविवेचन इतकें आवडलें कीं ते सारखा त्याचाच पाठ करीत बसत.

बडोद्याचें विद्यार्थिजीवन हें असें चाललें होतें. आपलें आयुष्य देशसेवेला समर्पण करावयाचें असें मानणारे तरुण विनोबांच्या भोंवतीं जमले होते. स्फूर्तिदायक पुस्तकांचें एक वाचनालय ह्या विद्यार्थिमंडळानें चालविलें होतें. विनोबांचें वाचनलेखन चालू होतें;


तर ते आपल्याला शोधून आणतील व आपण पुन्हां घरांत डांबलें जाऊं, अशी विनोबांना भीति वाटत असावी. दूर निघून जाण्याला अवधि मिळावा म्हणूनच त्यांनीं ही युक्ति योजली होती. सुरतेहून ते भुसावळ मार्गानें उत्तरेकडे गेले. काशीला जाऊन ते गंगाकिनारीं राहिले. तेथील अन्नछत्रांत राहून त्यांनीं संस्कृतचा अभ्यास केला. अनेक विषयांचें तेथें निरुपाधिक चिंतन केलें. भावविभोर अवस्थेंत ते तेथें असत. आपलें चिंतन सुस्पष्ट व्हावें म्हणून त्यांनीं गद्यपद्यांत तें लेखबद्ध करून ठेवलें होतें. त्यावेळची त्यांची वृत्ति प्रकट करणाऱ्या त्यांच्या कविता आजहि क्वचित् कधीं आठवल्यावर ते सांगतात.

घेउनि वामनरूप भृंग तो
येतसे लुटाया मजला धाउनी
परि हृदयाचें बलिदान देउनी
जिंकिला कोंडिला केला गुंग तो
मी समर्पणाचें गीत गातसें
गा गा रे सखया, तूंहि गा तसें ॥

समर्पणाची त्यांना किती तीव्रतेनें ओढ लागली होती, तें यावरून दिसून येतें. पण विनोबांनीं ह्या वेळचें आपलें सर्व लिखाण गंगार्पण केलें. जीवनांची त्यांनीं ही युक्तीच ठरविली आहे. कोणत्याहि गोष्टीचा मोह वाटूं लागला कीं ती गोष्ट सोडून द्यावी असें त्यांचें तत्त्व आहे.

त्रिगुणातीत बनण्याची युक्ति समर्पणांत सांपडते. समर्पण म्हणजे राजविद्या, राजगुह्य. विनोबांनीं समर्पणालाच आपलें आधारभूत जीवनतत्त्व बनविलें आहे. याचें विवेचन करतांना त्यांनीं लिहिलें आहे: "कर्मयोगाचा अर्थ आहे कर्म करा, पण फळाचा लोभ राखूं नका. कर्म अशा खुबीनें करा कीं फळवासनेचा चित्ताला स्पर्श होऊं नये. भावपूर्वक ईश्वराशीं जोडलें जाणें म्हणजे भक्तियोग. राजयोगांत कर्मयोग आणि भक्तियोग यांचा समन्वय आहे.

"राजयोग म्हणजे कर्मफळ देवाला अर्पण करणें. हें ईश्वराला अर्पण करावयाचें ..., अशा भावनेनें कोणतेंहि मामुली काम जरी हातीं घेतलें तरी त्यांत दिव्य पवित्रता येईल. कोणी मोठा मनुष्य आमच्या घरीं येणार असला तर आम्ही किती स्वच्छता



करतों, जेवण कसें उत्तम बनवितों. मग तो येणारा परमेश्वर आहे अशी भावना झाली तर त्यांत किती बरें फरक पडेल ! ही भावना एकदां जीवनांत आली कीं जीवन किती निर्मळ होईल ! अंधाराचा हळूंहळूं प्रकाश बनत नाहीं, एकदम प्रकाश बनतो. त्याप्रमाणें जीवनांतील प्रत्येक क्रिया ईश्वराशीं जोडली म्हणजे जीवनांत एकदम अद्‌भुत सामर्थ्याचा संचार होतो. ''

याच समर्पणवृत्तीचा आविष्कार विनोबांच्या जीवनांत वेगवेगळ्या रूपांनीं झालेला आपल्याला दिसतो.

• • •

विनोबांचें हें जीवन सुरू असतांनाच गांधीजी हिंदुस्थानच्या राजकीय क्षेत्रांत वावरूं लागले होते. ना. गोखल्यांना त्यांनीं गुरु मानलें होतें व त्यांच्या आज्ञेवरूनच ते हिंदुस्थानची यात्रा डोळे व कान उघडे ठेवून व तोंड मिटून करीत होते. त्याच सुमारास बनारस विद्यापीठाचा पदवीदान-समारंभ होणार होता. ॲनी बेझंट दीक्षान्त भाषण देणार

होत्या. मालवीयजींनीं गांधींनाहि आमंत्रण दिलें होतें. विनोबा काशीलाच होते. काशीला ते वाचनालयांत नियमितपणें जात. गांधीजींचें तेथें खळबळजनक भाषण झालें. इंग्रजी बोलण्याची सुशिक्षितांची फॅशन सोडून ते रानवट हिंदींत बोलले ! विद्यामंदिरांत आपल्या वैभवाचा तोरा मिरवणाऱ्यांची त्यांनीं हजेरी घेतली. विनोबांना तें प्रांजळ बोलणें आवडलें; गांधीजींची तळमळ प्रतीत झाली. त्यांच्या मनाची पकड त्या भाषणानें घेतली. त्यांनीं गांधीजींशीं पत्रव्यवहार केला व अहमदाबादला ते आश्रमांत येऊन दाखल झाले.

आश्रमांत त्यांनीं सर्व प्रकारचीं कामें निष्ठेनें केलीं; भाजी चिरणें, स्वयंपाक करणें, मुलांना शिकविणें, साफसफाई करणें. कोणतेंहि काम हलकें असें त्यांनीं मानलें नाहीं. गांधीजी आफ्रिकेंतून आले त्यापूर्वीं रस्किनच्या 'अनटु धिस लास्ट' या पुस्तकाचा फार खोल ठसा त्यांच्यावर उमटला होता.

—सर्वांच्या भल्यांत आपलें भलें आहे.

—वकील व न्हावी या दोघांच्याहि कामाची किंमत समान असावी.

—साधें किसान व मजुराचें जीवन हेंच खरें जीवन आहे.

या सिद्धान्त-त्रयीची साधना आश्रमांत चालत असे व विनोबा अत्यंत निष्ठेनें या सिद्धान्तांचें पालन करीत. एक प्रकारें हें मानसाशिक्षणच होतें. बौद्धिक रीतीनें व तर्कानें एकादें तत्त्व पटलें तरी रूढिग्रस्त मनाला त्याची अंमलबजावणी करतांना प्रथमतः वेदना होतात. आपली बौद्धिक निष्ठा कसोटीला लावून मन तयार करण्याचें काम साधकाला करावें लागतें. गांधीजींच्या आश्रमांत विनोबा व इतर मंडळी हीच साधना करीत होती. उच्च तत्त्वें व्यवहारांत उतरविण्याचा प्रयत्न आश्रमांत होत होता. विनोबांसारख्याला हें काम सहज मानवण्यासारखें होतें. आश्रमीय जीवनांतील आचार, आश्रमांतील तरुणांना शिक्षण देण्याचें काम, चिंतनाला अनुकूल वातावरण व गांधीजींच्या सारखा दक्ष व विकासपरायण मार्गदर्शक यामुळें विनोबा तेथें रमले.

विनोबा आश्रमांत जडभरतासारखे निरलसपणें काम करीत. फाटक्या शरीराचा हा किरकोळ मनुष्य इतकें काम कसें करतो याचें सर्वांना आश्चर्य वाटे. विनाबांच्या जीवन-चर्येकडे गांधीजींचें बारकाईनें लक्ष असे. एक दिवस फिरायला जातांना विनोबांना गांधीजींनीं आपल्याबरोबर घेतलें. म्हणाले: "माझें तुझ्याकडे लक्ष नाहीं असें समजूं नकोस. तुझें शरीर असें दुबळें, मग कामाची एवढी शक्ति कोठून येते ?"

"शक्ति शरीराची नाहीं, शक्ति आत्म्याची आहे" विनोबा म्हणाले.

विनोबांच्या ह्या उत्तरानें गांधीजींच्या मनाचा ठाव घेतला. नंतर त्या उभयतांत खूप चर्चा झाली. 'आपण ज्या भूमिकेवर जाण्यासाठीं धडपडत आहोंत तेथून याची वाटचाल सुरू आहे' असें गांधीजींना वाटलें व त्यांच्यांत आणि विनोबांत अधिक जवळीक निर्माण झाली.

● ● ●

संस्कृतचा अभ्यास करण्याची इच्छा विनोबांना होती. शरीरप्रकृति मनाला पुरेपूर साथ देत नव्हती. तिचाहि एकदां बंदोबस्त करावा अशा हेतूनें विनोबाजींनीं आश्रमांतून एक वर्षाची रजा गांधीजींच्याकडून मागितली. ते वाईला आले. तेथें केवलानंद सरस्वतींच्या प्राज्ञपाठशाळेंतील मुलांना ते शिकवीत व स्वतःहि शिकत. त्यावेळच्या विनोबांच्या कामाचा अहवाल १९१८ सालीं त्यांनीं गांधीजींना लिहिलेल्या एका पत्रांत मिळतो.

परमपूज्य बापूजी,

वर्षापूर्वीं प्रकृति सुधारण्यासाठीं मी आश्रमांतून बाहेर आलों. वर्ष होत आलें पण माझा कांहीं ठावठिकाणा नाहीं! आश्रम सोडून मी निवून गेलों कीं काय अशी कोणाला शंका आली तर त्याचाहि दोष माझ्यावरच आहे, कारण पत्र न लिहिण्याची माझी खोड आहे. परंतु एवढें मात्र लिहून ठेवतों कीं आश्रमाला माझ्या हृदयांत एक खास स्थान मिळालें आहे, एवढेंच नव्हे तर माझा जन्मच आश्रमासाठीं आहे अशी माझी श्रद्धा आहे.

मी दहा वर्षांचा होतों तेव्हांच ब्रह्मचर्यव्रताचें पालन करीत देशसेवा करण्याची मी प्रतिज्ञा केली. हायस्कूलमध्यें असतांना मला गीतेचें वेड लागलें. वडिलांच्या आग्रहाखातर दुसरी भाषा म्हणून मी फ्रेंच घेतलें तरी पण माझें गीतेवरचें प्रेम कमी झालें नाहीं. घरच्या घरीं मी स्वतः संस्कृतचा अभ्यास सुरू केला. वेदान्त व तत्त्वज्ञान यांचा अभ्यास करण्याचाहि माझा निश्चय होता. आश्रमांत आलों त्याच वेळीं वाईच्या नारायणशास्त्री मराठे यांच्याकडे अभ्यास करण्याची संधि माझ्यापुढें होती. उपनिषदांचा अभ्यास करण्याच्या लोभानें मी आश्रमांतून निघालों. या लोभानें वाईंत मी अधिक काळ राहिलों. तो लोभ आणि त्याचें कार्य यासंबंधीं खालीं लिहीत आहे.

उपनिषद्, गीता, ब्रह्मसूत्र व शांकरभाष्य, मनुस्मृति व पातंजल योगदर्शन या ग्रंथांचा मी अभ्यास केला. याशिवाय न्यायसूत्र, वैशेषिक सूत्र, याज्ञवल्क्य स्मृति हे ग्रंथ वाचले. आतां अधिक शिक्षणाचा मोह मला नाहीं. आतां हवें तें स्वतः वाचीन.

माझा दुसरा उद्देश होता प्रकृति सुधारणें. त्यासंबंधीं आतां लिहितोंः प्रकृति सुधारण्यासाठीं प्रथम मी रोज दहा बारा मैल फिरणें सुरूं केलें. त्यानंतर ६ ते ८ शेर धान्य दळण्याला सुरुवात केली. आज ३०० सूर्यनमस्कार व फिरणें हा माझा व्यायाम आहे. यामुळें माझी प्रकृति चांगली झाली आहे.

आतां आहारासंबंधीं : पहिले सहा महिने मी मीठ खाल्लें. नंतर तें सोडून दिलें. मसाले वगैरे बिलकूल खाल्ले नाहींत व आजन्म मीठमसाले न खाण्याचें व्रत घेतलें. दूध सुरूं केलें. अनेक प्रयोग केल्यानंतर असें सिद्ध झालें कीं दुधाशिवाय चालूं शकत नाहीं. पण तरीहि सोडतां येणें शक्य असेल तर तें सोडण्याची माझी इच्छा आहे. एक महिना केवळ केळीं, दूध व लिंबू यांवर काढला. यामुळें ताकत थोडी कमी झाली. चर्बीसाठीं कोठलाहि पदार्थ खाण्याची इच्छाच होत नाहीं. तरीहि माझा आहार अमीरी आहे असें मला वाटतें. रोज सव्वा आण्याचें ६० तोळे दूध, अर्धा आण्याच्या २० तोळे ज्वारीच्या दोन भाकरी व एक आण्याचीं चारपाच केळीं व लिंबू असा रोज पावणेतीन आण्यांचा आहार मी घेतों.

कार्य : ( १ ) गीतेचा वर्ग चालविला. सहा विद्यार्थ्यांना कोठल्याहि प्रकारचा मोबदला न घेतां अर्थासह सर्व गीता शिकविली. ( २ ) ज्ञानेश्वरीचे सहा अध्याय चार विद्यार्थ्यांना शिकविले. ( ३ ) नऊ उपनिषदें दोन विद्यार्थ्यांना शिकविलीं. ( ४ ) मला जरी उत्तम हिंदी येत नसलें तरी विद्यार्थ्यांसाठीं हिंदी वर्तमानपत्रें वाचण्याचा उपक्रम चालूं आहे. ( ५ ) दोन विद्यार्थ्यांना इंग्रजी भाषा शिकविली. ( ६ ) रायगड, सिंहगड, तोरणा वगैरे ऐतिहासिक स्थळांची चारशें मैल पायीं सफर केली व प्रसिद्ध किल्ले पाहिले. ( ७ ) प्रवासांत गीतेवर प्रवचनें करीत असे. आजवर अशीं सुमारें ५० प्रवचनें मी दिलीं असतील.आतां येथून आश्रमांत येतांना मुंबईपर्यंत मी पायीं येईन व तेथून रेल्वेनें आश्रमांत येईन. ( ८ ) वाईंत ' विद्यार्थिमंडळ ' नांवाच्या एका संस्थेची मी स्थापना केली. त्यातर्फे एक वाचनालय उघडलें व मदतीसाठीं दळणारांचा एक वर्ग सुरूं केला. त्यांत मी आणि इतर १५ विद्यार्थी दळीत असूं. जे लोक चक्कीवर दळायला नेत त्यांचें काम आम्ही पैशाला दोन शेर या भावानें करून देत असूं व हे पैसे वाचनालयाला देत असूं. पैसेवाल्यांचीं मुलेंहि या वर्गांत सामील झालीं होतीं. वाई म्हणजे जुन्या विचारांच्या लोकांचें स्थान. या वर्गांत मुलें सर्व हायस्कूलमधील असल्यानें सगळें आम्हांला वेडगळ समजत ! असें असूनहि हा वर्ग दोन महिने चालला. वाचनालयांत ४०० पुस्तकें जमा झालीं.

( ९ ) सत्याग्रहाश्रमाच्या तत्त्वांचा प्रचार करण्याचा मी बराच प्रयत्न केला. ( १० ) बडोद्याला लोकसेवा करण्याची इच्छा असलेले १०–१५ मित्र आहेत. मातृभाषेची सेवा करण्यासाठीं तीन वर्षांपूर्वीं त्यांनीं एक संस्था काढली आहे. या संस्थेच्या वार्षिक उत्सवासाठीं गेलों होतों. उत्सव म्हणजे संस्थेच्या सभासदांनीं एकत्र येऊन आतांपर्यंत काय केलें व पुढें काय करावयाचें याचा विचार केला. हिंदीचा प्रचार करण्याची कल्पना मी त्यांच्यापुढें मांडली आहे.

सत्याग्रहाश्रमांतील एक रहिवासी या दृष्टीनें आचरण कसें होतें तें शेवटीं सांगणें आवश्यक आहे.

अस्वाद—या व्रताबाबत वर आहाराबद्दल लिहितांना उल्लेख केलाच आहे.

अपरिग्रह—लाकडाची थाळी व वाटी, आश्रमांतला एक लोटा, धोतर, घोंगडी, पुस्तकें एवढाच परिग्रह ठेवला आहे. बंडी, कोट, टोपी वगैरे न वापरण्याचें व्रत घेतलें आहे. यामुळें शरीरावरहि धोतरच पांघरून घेतों. कपडा हातमागावरचाच वापरतों.

स्वदेशी—परदेशीचा संबंधच माझ्याशीं नाहीं.

सत्य–अहिंसा–ब्रह्मचर्य या व्रतांचें पालन माझ्या समजुतीप्रमाणें मी योग्य रीतीनें केलें आहे असा विश्वास मला वाटतो.

अधिक काय लिहूं ? जेव्हां स्वप्नें पडतात तेव्हां एकच विचार मनांत येतो. देव माझ्याकडून कांहीं सेवा घेईल का ? मी श्रद्धापूर्वक सांगूं शकतों कीं, आश्रमाच्या नियमांचें एक सोडून–मी कांटेकोरपणें पालन करतों. म्हणजे आश्रमाचाच मी आहें. आश्रम हेंच साध्य आहे. ज्या गोष्टींतल्या कमीपणाचा मी उल्लेख केला ती म्हणजे आपलें जेवण–म्हणजे भाकरी स्वतः बनविणें. मी त्याचाहि प्रयत्न केला; पण प्रवासांत ही गोष्ट साधली नाहीं.

सत्याग्रहाचा किंवा तसलाच दुसरा कोणता प्रश्न निर्माण झाला तर मी ताबडतोब येईन, नाहींतर पाडव्याला नक्कीच येईन.

आश्रमांत अलीकडे काय फेरफार झाले आहेत ? किती विद्यार्थी आहेत ? राष्ट्रीय शिक्षणाची काय व्यवस्था आहे ? आपल्या आहारांत काय बदल मी केला पाहिजे ? हें सर्व कळावें अशी तीव्र इच्छा आहे.

आपण स्वतः मला पत्र लिहावें असा विनोबाचा—आपणांस पितृतुल्य समजणाऱ्या ह्या आपल्या पुत्राचा–आग्रह आहे. —विनोबाचे प्रणाम

हें पत्र वाचून गांधीजी उद्‌गारले : " गोरखनें मच्छिंद्रनाथाला हरवलें ! भीम आहे भीम ! " नंतर गांधीजींनीं उत्तर पाठविलें. लिहिलें : " तुझ्यासाठीं कोणतें विशेषण वापरावें तें मला सुचत नाहीं. तुझें प्रेम आणि तुझें चरित्र मला मोहांत बुडवून टाकतें. तुझी परीक्षा करायला मी असमर्थ आहें. तूं जी स्वतःची पारख केली आहेस ती मान्य करतों व तुझ्यासाठीं पित्याचें पद ग्रहण करतों. माझी कामना जवळजवळ तूं पूर्ण केलीस. मला वाटतें कीं खरा बाप आपल्यापेक्षां अधिक चारित्र्यवान् मुलगा निर्माण करतो. खरा पुत्र आपल्या वडिलांनीं जें केलें असेल तें वाढवितो. पिता सत्यवादी, दृढ व दयामय असेल तर मुलानें हे गुण विशेषत्वानें अंगीं आणावे. हें तूं केलेंस असें दिसतें. अर्थात् तूं हें माझ्या प्रयत्नांमुळें केलेंस असें मात्र मला वाटत नाहीं. यामुळें तूं मला जें पितृपद दिलें आहेस तें मी तुझी प्रेमाची भेट म्हणून स्वीकारतों. त्या पदाला योग्य बनण्याचा मी प्रयत्न करीन. पण जर मी हिरण्यकश्यपु ठरूं लागलों तर भक्त प्रल्हाद बनून माझा सादर निरादर तूं करावास.

बाहेर राहूनहि आश्रमाच्या नियमांचें पालन केल्याचें तूं लिहिलेलें बरोबर आहे. तुझ्या आश्रमांत येण्याच्या बाबतींत मला शंका नव्हतीच........परमेश्वर तुला दीर्घायु करो आणि तुझा उपयोग भारताच्या उन्नतीसाठीं होवो, हीच माझी इच्छा आहे.

विशेष प्रत्यक्ष भेटीअंतीं. सगळें तुला भेटायला उत्सुक आहेत.

—बापूचे आशीर्वाद.

विनोबांनीं गांधींना आपलें पितृपद दिलें व गांधींनीं त्याचा स्वीकार केला. गांधींच्या ह्या मुलाच्या हातून गांधीविचाराची अत्यंत भरीव अशी सेवा होत आहे. पसतीस वर्षांनीं गांधींची भविष्यवाणी व विनोबांची आकांक्षा साकार होतांना आज प्रत्यक्ष दिसत आहे. ' परमेश्वर तुला दीर्घायु करो आणि तुझा उपयोग भारताच्या उन्नतीसाठीं होवो, ही गांधीजींची इच्छा आज अनेक भारतवासीयांच्या हृदयांतून प्रार्थना बनून प्रकट होत आहे. पण केवळ शाब्दिक प्रार्थनेनें काय होणार ? त्या शब्दांच्या मागें कार्याचें, त्यागाचें बळ उभें केलें पाहिजे, तरच ती प्रार्थना प्रभावी होणार.

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थलप्रत.
अनुक्रम .................. विः ..................
क्रमांक .................. नोंः दिः ..................

# गीताईचा जन्म

वाईला नारायणशास्त्री मराठे ऊर्फ स्वामी केवलानंद यांच्या जवळ अध्ययनासाठीं विनोबा आले होते. उत्तम विद्यार्थी सहा महिन्यांत तयार होतो असें योगशास्त्रांत म्हटलें आहे. सहा महिन्यांतच शांकर प्रस्थानत्रयीवर विनोबांना उत्कृष्ट अधिकार प्राप्त झाला. प्लेगमुळें त्या काळांत पाठशाळा कृष्णातीरावर गांवाबाहेर झोपड्यांत भरे. विनोबा गांवांत रहात व भाष्याचा पाठ घेण्यापुरते गांवाबाहेर येत. प्रातःकाळीं पाठ सुरू होत. एकाचा पाठ संपेपर्यंत दुसरे बाहेर आपापले पाठ करीत. एक दिवस लक्ष्मणशास्त्री जोशी स्वामीजींकडे पाठ घेत होते आणि झोपडीच्या बाहेर आंब्यांच्या रांगेखालीं विनोबा आपल्या पाठाचें पूर्वावलोकन करीत होते. येरझारा घालीत ते भाष्याचें पठण आणि मनन करीत होते. भाष्याच्या गद्यपंक्ति विनोबा पद्याच्या लयींत, मध्यम स्वरांत, तालबद्ध रीतीनें अस्खलित म्हणत होते. विनोबांच्या वाचनाचे सूर गुरुवर्यांच्या झोपडींत शिरत होते. ते ऐकून गुरुवर्य मध्येंच थांबले आणि लक्ष्मणशास्त्रींना म्हणाले: " गीर्वाणवाणीचें इतकें सुंदर उच्चारण ऐकलें म्हणजे ही देववाणी आहे असें प्रत्ययास येतें. आद्य शंकराचार्यांचीच ही वाणी आहे अशी ओळख पटते. विनोबांसारखें पठण करतां आलें पाहिजे. विनोबांची वाक्शक्ति अलौकिक आहे. "

विनोबा वाईला आले तेव्हां थंडीतापांतून नुकतेच उठले होते. पण तरीहि त्यांची व्रतसाधना निष्ठेनें चालू होती. शीतोष्णावर विजय मिळविण्याचा ते प्रयत्न करीत. गंगापुरींतील पंचायतनाच्या देवळांतील उघड्या फरशीवर ते येरझाऱ्या घालीत. त्याच फरशीवर खालीं कांहीं न घालतां ते झोपत. चाळीस बेचाळीस अंशांइतकें तापमान उतरलें

तरी त्यांचा हा क्रम कायम असे. विशेष म्हणजे त्या तसल्या गारठ्यांतहि त्यांना नीट झोप लागत असे. विनोबांची साधना अशी खडतरपणें चालू होती.

बरोबर वर्षभरानें विनोबा आश्रमांत दाखल झाले. वाईच्या प्राज्ञपाठशाळेंत गांधींच्या शरीरश्रमाच्या तत्त्वाचा त्यांनीं प्रभावीपणें प्रचार केला. तेथून प्रथम ते बडोद्याला आपल्या मित्रांच्या मेळाव्यांत आले. मित्रांनीं विनोबांचें गीतेवर एक जाहीर प्रवचन ठेवलें. विनोबाजींची भाषा तेव्हां अति प्रखर असे. बोलतहि अत्यंत आवेशानें टेबलावर हात आपटून. 'बोंचत नाहीं ती भाषाच कसली?' असें ते म्हणायचे. बडोद्याचें त्यांचें तें प्रवचन अप्रतिम वठलें. ऐकणारांचे कान समाधान पावले. 'पळून गेल्याचें सार्थक केलें' असें जो तो म्हणूं लागला. आपल्या मित्रांना कार्यशील बनविण्याच्या दृष्टीनें प्रयत्न करून विनोबा आश्रमांत येऊन कामाला लागले. मनन, चिंतन, शारीरिक श्रमाचीं सर्व प्रकारचीं कामें व शिक्षण देणें हीं कामें त्यांचीं चालू झालीं.

● ● ●

पहिलें महायुद्ध संपलें होतें. महायुद्धाचा प्रसाद देशोदेशीं मिळूं लागला होता. हिंदुस्थानांत भयंकर मानमोडीची सांथ आली. गांवोगांव लोक पटापट मरूं लागले. स्मशानांत प्रेतें जाळायला जागा मिळेना. प्रेतें वाहून न्यायला माणसें नसत. विनोबांच्या विद्यार्थिमंडळाच्या लोकांनीं स्वयंसेवकांचें पथक उभें करून काम सुरू केलें. घरोघर जाऊन ते चौकशी करून येत. एक दिवस विनोबाजींच्या राहत्या घरीं जातात तों घरांत वडील, आई आणि भाऊ दत्तू असे तिघे आजारी. मित्रानें आश्रमांत विनोबांना पत्रानें कळविलें. गांधींना विनोबांची आई आजारी असल्याचें कळलें. त्यांनीं विनोबांना बोलावून घेतलें. म्हणाले : "आपण आश्रमवासी. अमूक एका माणसाविषयीं आपल्याला कांहीं विशेष प्रीति असें नाहीं. पण येथें तुमच्यावर सध्यां खास अशी जबाबदारीहि नाहीं आणि सहजप्राप्तांची सेवा करणें जरूरहि आहे. तरी तुम्ही घरीं जाऊन घरांतल्या आजाऱ्यांची शुश्रूषा करा." गांधींनीं विनोबांना समजावल्यावर विनोबा बडोद्याला आले. घरांत सेवाशुश्रूषा करूं लागले.

त्यांचा धाकटा भाऊ दत्तू. त्याची प्रकृति चिंताजनक होती. तो वारला. मित्रांनीं त्याची व्यवस्था केली. त्यानंतर विनोबाजींची आई वारली. विनोबांचें तिच्यावर अत्यंत प्रेम होतें. त्यांनीं मन आवरलें. वडिलांना प्रेताची व्यवस्था कशी करावी हें विचारण्यांत आलें. हिंदु विधीनें प्रेतसंस्कार करावे असें त्यांचें मत. विनोबांना हें पसंत नव्हतें. हे प्रेतपूजेचे प्रकार



नकोत असें त्यांचें म्हणणें. शेवटीं वडिलांच्या सल्ल्याप्रमाणें विधि करावयाचें ठरलें. विनोबांनीं साश्रु नयनांनीं मातेला अखेरचें वंदन केलें व ते गीतापाठ करीत दुसरीकडे बसले. आईच्या स्मरणानें विनोबांचे डोळे आजहि पाणावतात. "मला गीतेचा अर्थ थोडाफार समजूं लागल्यानंतर थोड्या दिवसांनीं माझी आई वारली, म्हणजे मला गीतेच्या ओटींत घालून ती गेली. आई गीते, तुझ्याच दुधावर आतांपर्यंत मी पोसलों आहें आणि ह्यापुढेंहि तुझाच आधार आहे" असें विनोबाजी म्हणत असतात. आईचें पार्थिव शरीर गेलें. पण अपार्थिव अशा गीतामाउलीच्या ओटींत घालून आई गेली या भावनेनें विनोबाजी शांत राहिले.

• • •

आईच्या मृत्यूनंतर विनोबा आश्रमांत परतले. गांधीजी हिंदुस्थानांत आले तेव्हां त्यांनीं आपल्या गावीं आश्रम काढावा असा अनेकांचा आग्रह होता. पण गांधींनीं अहमदाबादची निवड केली. तेथें आश्रमांत त्यांनीं विणकाम सुरू केलें होतें. विनोबा

विणकाम शिकले. त्या वेळीं मिलचें सूत हातमागावर विणलें जात असे. सूतहि हाताचेंच असावें अशी गांधीजींची इच्छा होती. पूर्वी भारतांतून अप्रतिम कलाकुसर असलेलीं तलम वस्त्रें परदेशीं जात. ह्या कलेचें पुनरुज्जीवन करावें, कापडाच्या निमित्तानें परदेशीं जाणारा पैसा थांबवावा व स्वदेशीची कल्पना अधिकाधिक विकसित करावी, अशी गांधीजींची इच्छा होती. देशी गिरण्यांचें सूत खपविणारे एजंट त्यांना बनावयाचें नव्हतें.

गांधींनीं सूत कांतण्याची कला कोठें जिवंत आहे कीं काय याचा शोध सुरू केला. चरखा हातीं आला. त्यावर मगनलाल गांधी यांनीं प्रयोग चालविले. त्यांच्या मृत्यूनंतर विनोबाजींनीं या कलेंत विशेष लक्ष घातलें. खादीचें संपूर्ण शास्त्र रचण्यांत त्यांचा फार मोठा भाग आहे. चरखा व तकली या दोन साधनांची गति वाढविण्याचे प्रयत्न जारीनें सुरू झाले. विनोबाजींच्या गणिती बुद्धीनें याबाबत चांगली करामत दाखविली.

इकडे कांतणें व विणणें या शास्त्रांत संशोधन चाललें होतें तर तिकडे देशांतील वातावरण तापत चाललें होतें. विनोबाजी मात्र या शास्त्राचा विकास करण्यांत गढून गेले होते. राष्ट्रांतील नवी पिढी नव्या निष्ठेची व नव्या उमेदीची तयार केली, निष्काम सेवकांचा संघ निर्माण केला तरच देशाला स्वातंत्र्य व सुबत्ता लाभेल असें त्यांचें मत होतें. नजीकच्या भविष्यकाळचा विचार थोडा दूर सारून दूरवर्ती पण यशपरिणामी मार्ग आंखला पाहिजे, हें ओळखून विनोबा संथपणें काम करीत होते. एक नवी पिढी तयार करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होते.

पण एवढ्यांत जमनालालजी बजाज यांच्या मनांत आपल्या वर्ध्यालाहि एक आश्रम असावा असें आलें. त्यांनीं गांधीजींच्याकडे आश्रमाचें संचालन करण्यासाठीं माणूस मागितला. विनोबांनीं जावें असें ठरलें. १९२१ सालीं वर्षप्रतिपदेच्या दिवशीं विनोबांनीं वर्ध्यांत प्रवेश केला. आश्रम सुरू झाला. तरुण मंडळी विनोबांच्या भोंवतीं जमूं लागली. व्रतोपासना चालू झाली. दळणकांडण, स्वयंपाकपाणी, साफसफाई, कांतणें–विणणें, पिंजाई असे उद्योग सुरू झाले. शेतीचें कामहि चालू झालें. शिक्षण होतच होतें. पूर्वींचें जणुं तें गुरुकुल बनलें. विद्यार्थ्यांची शारीरिक, मानासिक, बौद्धिक शक्ति लक्षांत घेऊन व त्याचा स्वभाव व संवयी यांचा विचार करून सहज पाहतांऐकतां विद्यार्थी शिकेल अशी विनोबाजींची शिक्षणयोजना होती. विद्यार्थ्यांच्या स्वाभिमानाला व स्वातंत्र्याला ते फार जपत. विद्यार्थ्याला आपल्या खांद्यावर बसवून उंच आकाशांत विहार करून आणण्यापेक्षां

त्याचे चिमुकले पंख सबळ होऊन आपल्याच बळावर तो उड्डाणें घ्यायला लागावा असा विनोबांचा प्रयत्न असे. प्रखर, तेजस्वी व प्रेमळ व्यक्तिमत्त्वामुळें त्यांच्या अंवतींभोंवतीं तरुण जमत होते.

● ● ●

एवढ्यांत अचानक नागपूरला झेंडा सत्याग्रह उभा राहिला. राष्ट्रध्वजाला देशाच्या एखाद्या भागांत परकी सरकारनें बंदी घालणें कोण सहन करील? सत्याग्रहाला आरंभ झाला. विनोबाजीहि त्या सत्याग्रहांत सामील झाले. पुढें देशाला भूषणभूत ठरण्याचीं बीजें असलेल्या ह्या माणसाला व्हॅगबॉंड—उडाणटप्पू ठरवून सजा देण्यांत आली होती. मॅकस्विनी म्हणे : ' दास्यांत गुण अवगुण ठरतात, अवगुणांना गुणांचा साज चढतो व चारित्र्यहीनता बोकाळते. म्हणून दास्य नको. '

अशा चळवळी म्हणजे लोकसंपर्काची पर्वणीच म्हटली पाहिजे. मध्यप्रदेशांतील व इतर ठिकाणच्याहि कार्यकर्त्यांशीं विनोबांचा यावेळीं घनिष्ठ संबंध आला. सत्याग्रहानंतर पुन्हां आश्रमीय साधना सुरू झाली. १९२४ सालीं गांधीजींनीं हिंदु—मुस्लिम ऐक्यासाठीं उपवास केला. त्या वेळीं सर्व धर्म परिषदेसाठीं विनोबा दिल्लीला गेले होते. तेथें त्यांचें कठोपनिषदावर सुंदर प्रवचन झालें.

वर्ध्याहून ' महाराष्ट्र धर्म ' नांवाचें मासिक व साप्ताहिक चालविण्याचा प्रयत्न झाला. त्यांत विनोबांचे उपनिषदांवर अभ्यासपूर्ण लेख येत. तुकारामाच्या अभंगांचें रसग्रहण ते करीत. इतर संतांचीं समानार्थी वचनें जोडीला देत असत. त्यांच्या त्या नियतकालिकांतील लिखाणाचीं आतां पुस्तकें तयार झालीं आहेत. उपनिषदांचा अभ्यास, मधुकर, संतांचा प्रसाद हीं तीं पुस्तकें. त्या वेळचें विनोबांचें लिखाण मोजकें, सूत्रबद्ध व विद्वत्ताप्रचुर असे. शब्दांच्या निवडींतहि बराच चिकित्सकपणा दिसून येतो. सुभाषितवजा लिहीत. लोकांना चिंतनाला प्रवृत्त करणारें तें लिखाण आहे. सुलभतेपेक्षां तर्कशुद्धता व परिमित भाषा, यांच्याकडे अधिक लक्ष दिलेलें आढळतें. ' मधुकर ' या त्यांच्या पुस्तकांत अशीं अनेक सुभाषितें आढळतात व मनांत तीं घोळविण्यांत एक प्रकारचा आनंद वाटतो.

विनोबा एका ठिकाणीं म्हणतात : " कलियुगाचा अर्थ हृदयाचा दुबळेपणा हा आहे. दुबळें हृदय पैशाचा लोभ पूर्णपणें सोडूं शकत नाहीं. त्यामुळें त्याची उडी जास्तींत जास्त दानापर्यंत जाते. त्याग मुळावरच घाव घालतो. त्याग ही पोटांत घेण्याची दवा आहे तर दान ही कपाळावर लावण्याची सुंठ आहे. त्यागांत अन्यायाची चीड आहे, दानांत लौकिकाची भीड

आहे. त्यागानें पापाचें मूळ फिटतें, दानानें पापाचें व्याज चुकतें. त्यागाचा स्वभाव दयाळू आहे तर दानाचा ममताळू. "

"एकाद्याच्या घरांत औषधाच्या पुष्कळ बाटल्या असल्या तर अनुमान काढतात कीं तो रोगी असावा. पण एकाद्याच्या घरांत पुष्कळशीं पुस्तकें दिसलीं तर मात्र आम्ही त्याला विद्वान् समजतों ! हा अन्याय नाहीं का ? आरोग्याचा पहिला नियम असा आहे कीं गरज भासल्यावांचून औषध घेऊं नका. त्याप्रमाणें शक्यतों पुस्तकांत डोळे खुपसून न बसणें ही शहाणपणाची पहिली कसोटी आहे. औषधाची बाटली हें आपण रोगी शरीराचें चिन्ह समजतों त्याप्रमाणें पुस्तक हें रोगी मनाचें चिन्ह मानलें पाहिजे. "

याच सुमारास त्रावणकोर-कोचीन भागांत हरिजनांना एका सार्वजनिक रस्त्यांवर जायला बंदी केल्यानें सत्याग्रह उद्भवला. विनोबाजी वैकोमच्या त्या सत्याग्रहासाठीं तिकडे गेले होते.

• • •

आश्रमांतील प्रार्थना संस्कृतमध्यें चालत. संस्कृत न येणाऱ्यांना ती प्रार्थना म्हणजे शब्दजंजाळच असे. प्रार्थना चित्तशुद्धीसाठीं असते. पण शब्दांचा अर्थच न समजला तर चित्तावर परिणाम कसा होणार ? आणि चित्तावर परिणाम झाल्याशिवाय जीवनशुद्धि कशी होणार ? अर्थाचें चिंतन ही फार महत्त्वाची गोष्ट आहे. मातृभाषेंतून प्रार्थना असली पाहिजे, असें विनोबाजींना वाटत होतें. आपल्याला गीता समजावी म्हणून त्यांची आई तळमळत असे. अशा किती मायबहिणी तळमळत असतील ! स्त्रिया आणि मुलें यांच्यासाठीं मराठींत गीता आणली पाहिजे, असें विनोबांना वाटत होतें. चिंतन व निदिध्यास यांच्या साहाय्यानें प्रत्येक शब्दाचा अर्थ नक्की करण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. देशांत १९३० च्या मिठाच्या सत्याग्रहाचे वारे वाहात होते. विनोबाजींचें काम संथ, स्वस्थ चालू होतें. गीतेचा मराठी अनुवाद करण्यासाठीं आवश्यक तो मानसयोग आणि इतर अनुकूलता त्यांना १९३० सालीं लाभली. ७ ऑक्टोबर १९३० पासून ६ फेब्रुवारी १९३१ पर्यंत चार महिन्यांत गीतेची मराठी प्रत तयार झाली. विनोबांनीं ती लहानमोठ्या मुलांना शिकविली. त्यांना जेथें जेथें अडे तेथें तेथें अधिक सोप्या शब्दांची योजना केली. मित्रांकडे प्रती पाठवून त्यांच्या सूचना मागविल्या. 'गीताई' असें सुटसुटीत नामकरण करण्यांत आलें.

गीताई माउली माझी तिचा मी बाळ नेणता ।
पडतां रडतां घेई उचलोनी कडेवरी ॥

आपली गीतेविषयीं भावना व्यक्त करणारा हा शिरोलेख त्यांनीं तयार केला. गीताई सुलभ करण्याचे त्यांचे प्रयत्न चालू होते.

१९३० चा सत्याग्रह-संग्राम आटोपला. गांधींनीं गोलमेज परिषदेला जायचें ठरविलें. सत्याग्रहींची सुटका झाली. विनोबांच्या अध्यक्षतेखालीं खानदेशच्या सत्याग्रहींचें संमेलन झालें. खानदेशांत विनोबांचीं व्याख्यानें झालीं. जणुं पूर्वापार संबंध असें नातें खानदेश व विनोबा यांच्यांत निर्माण झालें. त्यानंतर पुन्हां १९३२ सालीं धरपकडी व सत्याग्रह सुरू झाले. विनोबा खानदेशांत प्रचारार्थ फिरत होते. त्यांना अटक करून धुळ्याच्या जेलमध्यें पाठविण्यांत आलें. जेलमध्यें विनोबांचें विचारशासन जणुं सुरूं होतें. सत्याग्रहींशीं अत्यंत जिव्हाळ्याचे संबंध त्यांचे निर्माण झाले. वेगवेगळे विषय विनोबाजी तेथें शिकवीत. गीताईची अखेरची प्रत धुळ्याच्या तुरुंगांत तयार झाली. सत्याग्रहींसाठीं दर रविवारीं विनोबांचीं गीतेवर प्रवचनें ठेवण्याचें ठरलें. दर रविवारीं एकेका अध्यायावर विनोबा रसपूर्ण विवेचन करीत. २१ फेब्रुवारी ते १९ जून १९३२ असा हा कार्यक्रम चालला. रोजच्या उपयोगाच्या गोष्टींची चर्चा विनोबा प्रवचनांत गीतेच्या आधारें करीत. जीवनाशीं संबंध नसलेले काथ्याकुटी वादविवाद त्यांत नसत. खेड्यांत व शहरांत सामान्य मजुरी करून जगणाऱ्या श्रमिकांनाहि श्रमपरिहार लाभावा अशी ही रचना आहे. साने गुरुजींनीं हीं प्रवचनें लेखबद्ध करून भारतीय जनतेवर अपार उपकार करून ठेवले आहेत. धुळें जेल म्हणजे त्यावेळीं एक आश्रमच बनला होता.

• • •

गीतेच्या संदेशाचें विवरण विनोबांनीं पुढीलप्रमाणें केलें आहे : "व्यवहार शुद्ध कसा करावा, हें शिकविण्यासाठीं गीता आहे. जेथें तुम्ही व्यवहार करीत आहांत तेथें गीता येते. परंतु तेथेंच ती तुम्हांला ठेवूं मात्र इच्छित नाहीं. तुमचा हात धरून शेवटच्या मुक्कामावर ती तुम्हांला घेऊन जाईल. गरीब, दुबळा, अडाण्यांतलाहि अडाणी असो, त्याच्याजवळ गीता येईल. परंतु तेथेंच त्याला कायम करावा म्हणून नव्हे तर, त्याचा हात धरून पुढें नेण्यासाठीं, उंच नेण्यासाठीं. मनुष्यानें आपला व्यवहार शुद्ध करून परमोच्च स्थिति गांठावी हीच गीतेची इच्छा आहे.

"मी जड आहें, व्यावहारिक आहें, सांसारिक जीव आहें, असें म्हणून स्वतःभोंवतीं कुंपण घालूं नका. माझ्या हातून काय होणार? या साडेतीन हातांतच माझें सारसर्वस्व आहे, असें म्हणूं नका. ह्या बंधनांच्या भिंती अथवा तुरुंग आपल्याभोंवतीं उभारून पशु

वागतो त्याप्रमाणें वागूं नका. पुढें जाण्याची, उंच चढण्याची हिंमत बाळगा. मी क्षुद्र जीव म्हणून मनाची शक्ति मारूं नका. कल्पनेचे पंख तोडूं नका. कल्पना विशाल करा." असा गीतेचा संदेश त्यांनीं विवरला आहे.

गीताई व गीता-प्रवचनें ह्या विनोबांच्या दोन अमर कृति आहेत. गीताई ही आपल्या हातून परमेश्वरानें घडविलेली सर्वोत्कृष्ट सेवा आहे, अशी विनोबांची भावना आहे. गीताई रचली त्या दिवशीं आपलें जीवित-कार्य संपलें, असेंहि कधीं ते म्हणतात. ही गीताई जेथें जेथें मराठी बोलली जाते तेथें तेथें गेली आहे. दीड लाखांवर प्रती खपलेलें अलीकडच्या काळांतील हेंच एक पुस्तक असेल ! गीताई गांधीजींनाहि आवडली होती व गीतेच्या संस्कृत श्लोकांऐवजीं मराठी श्लोक त्यांनीं आश्रम-प्रार्थनेंत चालू केले होते. विनोबांनीं गीताई हें समश्लोकी मराठी रूपांतर केल्यानंतर इतरहि अनेक भाषांतून असे प्रयत्न झाले व गीतेचीं समश्लोकी प्रासादिक रूपांतरें अनेक भारतीय भाषांत आज उपलब्ध झालीं आहेत. ब्राह्मणांपुरतें मर्यादित असलेलें ज्ञान संतांनीं सर्वसामान्य लोकांपर्यंत-अगदीं स्त्रीशूद्रांपर्यंत नेऊन पोंचविलें. विनोबा हेंच संतकार्य आज करीत आहेत. ग्रंथांत बंदिस्त होऊन पडलेलें ज्ञान सर्वसामान्य लोकांना ते उपलब्ध करून देत आहेत.

★ ★ ★

*गीता आम्हांला सर्व कृष्णार्पण करायला शिकवते. कृष्णार्पण म्हणजे आपल्या शारीरिक, मानसिक, बौद्धिक अशा सर्व शक्ति समाजास अर्पण करणें. हिंदुस्थानांत हें सर्व बोललें जातें, पण याचा थोडा तरी अंमल झाला असता तर हिंदुस्थानची अशी स्थिति झाली नसती.*

# राष्ट्रीय कर्मयोग

जेलमधून सुटतांच वर्धा जिल्ह्यांत विनोबांचें काम पुन्हां सुरू झालें. सर्व गांवांची त्यांनीं व त्यांच्या सहकारी मंडळींनीं पाहणी केली. ग्रामीण जनतेच्या एकूण परिस्थितीचें अवलोकन केलें. वर्ध्याच्या आश्रमांत येऊन विनोबांना १२ वर्षें पूर्ण झालीं होतीं. 'कृत-युगांत फिरण्याचा धर्म आहे व म्हणून आपण कृतयुगी झालें पाहिजे' असें विनोबा म्हणत. खेडेगांवांतील लोकांना त्यांच्या निकृष्ट परिस्थितीचीं कारणें ते समजावून सांगत, त्यावर उपाययोजना सुचवीत. खेड्यांतील अनियमितपणा, अस्वच्छता, दूध व भाज्या यांची दुर्मिळता यामुळें ग्रामीण जनतेचीं जीवनें अधिकच पामर बनत आहेत, असें त्यांना दिसून आलें. जें करून जीवन थोडें फार सुधारतां येणें शक्य आहे तेंहि लोक करतांना दिसत नव्हतें. उच्च जीवनाची प्रेरणाच जणुं नष्ट झाली होती. परंतु शहरांत राहून व एकादा दिवस खेड्यांत जाऊन उच्च जीवनाची प्रेरणा लोकांत कशी निर्माण होणार? त्यांच्यांत जाऊन राहिलें पाहिजे, उठलें बसलें पाहिजे. उद्यमीपणा वाढेल असें त्यांना शिकविलें पाहिजे. विनोबाजी या दृष्टीनें विचार करीत होते. त्यांचें लक्ष वर्ध्याच्या जवळच असलेल्या नालवाडी या गांवानें वेधून घेतलें! त्या गांवांत वस्ती सारी हरिजनांचीच. तेथें जावयाचें विनोबांनीं ठरविलें. ह्या आपल्या विचारांसंबंधीं त्यांनीं गांधीजींना लिहिलेलें पत्र त्यांची मनोभूमिका उत्कृष्टपणें व्यक्त करते—

पूज्य बापूजींच्या सेवेसीं,

वर्ध्यापासून दीड मैलावर नालवाडी हें केवळ हरिजनांची वस्ती असलेलें एक गांव आहे. २५ तारखेपासून हरिस्मरण करून तेथें राहाणार आहें. वर्ध्याचा आश्रम स्थापन

होऊन बारा वर्षें झालीं. एक सत्र संपलें. अनुभव चांगला आला. कर्तेपणाची भावना गेली. केवळ ईश्वरच आहे, अशी प्रचीति आली. इतकीं वर्षें मी वर्ध्यांत नाहीं, आपल्या आज्ञेंत राहिलों. या दुनियेंत तुमच्या आशीर्वादावांचून सारें शून्य आहे. या बारा वर्षांत व्रतांचें पालन करण्याचा मी सतत प्रयत्न केला, असें मी म्हणूं शकतों. तरीहि मला स्वत:मध्यें बरीच अपूर्णता जाणवते. ईश्वरावर माझी जेवढी भक्ति आहे त्याहून कितीतरी अधिक त्याची कृपा मजवर आहे, असें दिसतें.

तुमच्या आशीर्वादानें मी पूर्णपणें ओतप्रोत आहें हें मला ठाऊक आहे. तरीहि त्याचीच याचना करण्यासाठीं मी हें पत्र पाठवीत आहे. आपल्या ह्या तुच्छ सेवकावर मेहेरनजर असूं द्या. आपल्या महायज्ञांत आहुति बनण्याची पात्रता ईश्वराकडून त्याला मिळवून द्या.

—विनोबाचे दंडवत प्रणाम

विनोबांचें हें पत्र आल्यानंतर महादेवभाईंनीं आपल्या डायरींत नोंदलें आहे : " बापूजींची भक्तमाला मोजण्याची इच्छा होते व त्यांत तपोधन विनोबांना पहिला क्रम देण्यांत कोठल्याहि प्रकारें संकोच वाटत नाहीं. असे लोक जोंपर्यंत वावरत आहेत तोंपर्यंत बापूंचा झेंडा फडकत राहील यांत काय शंका ? "

गांधीजींनीं विनोबांच्या पत्राला दिलेलें उत्तरहि सुंदर आहे.

चि. विनोबा,

तुमची भक्ति आणि श्रद्धा डोळ्यांतून आंनदाश्रु आणते. मी त्या योग्य असो नसो, तुम्हांला तर ती फलदायी होईलच. तुम्ही मोठ्या सेवेचें निमित्त बनाल.

—बापूचे आशीर्वाद

आणि वर्ध्याचा आश्रम सोडून विनोबा नालवडीला जाऊन राहिले.

विनोबा बुद्धीच्या कसोटीवर घासून गोष्टींची पारख करतात. लहानसहान कोणी असो, प्रेमळ पण स्पष्ट भाषेंत ते आपलीं मतें व्यक्त करतात. त्यांच्या या बाण्यानें त्यांच्या मतांची लोकांना फार कदर वाटते. १९३३ सालीं गांधीजींचा हरिजनांसाठीं उपवास सुरूं झाला. उपवासापूर्वीं त्यांनीं आपल्या विश्वासांतील लोकांचीं मतें जाणून घेतलीं होतीं. अग्निदिव्यांत प्रवेश करण्यापूर्वीं त्यांनीं रवींद्रांचा आशीर्वाद मागितला होता. विनोबांचा सल्ला त्यांना फार मोलाचा वाटत होता, ते म्हणत : " विनोबानें सांगितलें कीं माझी चूक झाली, तर मी समजून घेईन व उपवास सोडीन. "



विनोबांना पत्र पाठविण्याची परवानगी त्यांना हवी होती. आपल्या स्वतंत्र प्रज्ञेनें विनोबांनीं गांधीजींचें मन जिंकलें होतें.

• • •

१९३२ सालचा लढा संपला. गांधीजींनीं अहमदाबादच्या आश्रमांत स्वराज्य मिळाल्याशिवाय परत जायचें नाहीं असें ठरविलें होतें. जेलमधून सुटल्यावर कोठें जायचें, असा त्यांच्यापुढें प्रश्न होता. विनोबांनीं सुरू केलेल्या वर्ध्याच्या आश्रमांतच जायचें त्यांनीं ठरविलें. विनोबाजी नालवाडींत राहात होते. आपल्या सहकाऱ्यांच्या मदतीनें आसपासच्या गांवांतील स्थिति सुधारण्याचा त्यांचा प्रयत्न चालू होता. सर्व ग्रामसेवक पंधरा दिवसांनीं आपापला अहवाल पाठवीत. विनोबा त्यांना सल्ला देत. ग्रामीण उद्योग व खादी यांच्या-संबंधींचें लोकांचें ज्ञान वाढावें म्हणून दरवर्षीं एक यात्राहि भरवली जाई. ग्रामीण कार्याची माहिती देण्यासाठीं 'ग्रामसेवा वृत्त' नांवाची एक मासिक पत्रिकाहि निघूं लागली. नालवाडीच्या आसपास वेगवेगळ्या विधायक कार्यांच्या संस्था उभ्या राहिल्या.

खेड्यांकडे अधिकाधिक लक्ष जावें म्हणून काँग्रेसचें वार्षिक अधिवेशन खेड्यांत भरवावें अशी गांधीजींची सूचना होती. महाराष्ट्रांत फैजपूरला अधिवेशन घ्यायचें ठरलें. ही फार मोठी जबाबदारी होती. काँग्रेस अधिवेशनाची तयारी करण्यासाठीं महाराष्ट्रभर फिरणारे लोक पाहिजे होते, तसेंच अधिवेशनाच्या जागीं पाय रोवून बसणारेहि कोणी हवें होतें. महाराष्ट्रांतील कार्यकर्त्यांनीं विनोबांना हक्कानें बोलावलें. त्यांच्या हस्तें फैजपूरच्या 'टिळकनगर' च्या कामाचा शुभारंभ झाला. फैजपूरचें फजीतपूर होईल अशी विघ्नसंतोषी लोकांची अपेक्षा होती, पण फैजपूरचें फत्तेपूर झालें, पंढरपूर झालें.

• • •

खादीला ग्रामोद्योगांत फार महत्त्वाचें स्थान आहे. ग्रामीण जनतेला खादीच्या व्यवसायांतून रिकाम्या वेळीं रोजगार मिळावा अशी गांधींची अपेक्षा होती. खादीच्या कल्पनेंत देशभक्तीच्या भावनेबरोबरच आर्थिक दृष्टीचाहि समावेश झाला होता. आंठ तास कांतून निदान कुशल माणसाला तरी पोट भरतां आलें पाहिजे, अशी गांधींची इच्छा होती. विनोबांनीं या कामांत आपली शक्ति वेंचावयाचें ठरविलें. तकलीची गति वाढविण्याचे त्यांनीं प्रयत्न आरंभले. तासाला साडे तीनशें वार सूत ते काढूं शकत. दोन्ही हातांनीं कांतणें सुरू झालें. आश्रमांतील मुलांनाहि कुशलता वाढविण्याच्या दृष्टीनें ते तयार करूं लागले. ग्रामोद्योगांची कार्यक्षमता वाढवावयाची तर हातांतील कुशलता वाढली पाहिजे. त्यांच्या देखरेखीखालीं ताशीं चारशें तारांपर्यंत गति वाढूं शकली.

यानंतर दुसरा प्रयोग हातीं घेण्यांत आला. दिवसांतून आठ तास कताई विनोबा करूं लागले. आठ तासांच्या परिश्रमावर माणसाला स्वतःचें पोट तरी निदान भरतां आलें पाहिजे. निरंतर गति वाढविण्याचा प्रयत्न चालू होता. दिवसांत चार गुंड्या सूत विनोबा काढूं लागले. सर्वोदयाच्या सिद्धान्तांत न्हावी व वकील यांचें आठ तासांच्या प्रामाणिक परिश्रमाचें मूल्य समान असलें पाहिजे, असा एक सिद्धांत आहे. बुद्धिजीवि तासाभराच्या श्रमाचे ओंजळभर पैसे मिळवीत असेल तर प्रामाणिकपणें शरीरश्रम करणाऱ्याला निदान मूठभर पैसे तरी त्याच्या कुडीच्या पोषणार्थ मिळाले पाहिजेत.

वर्षभर नियमानें विनोबाजींचा हा प्रयोग चालू होता. गांधीजींना ह्या त्यांच्या प्रयोगांत विशेष रस होता.

"तूं दिवसाचे आठ तास कांततोस, चरखा संघाच्या आजच्या भावानें तुझी मजुरी किती होते?" गांधींनीं विचारलें.

" दोन आणे " विनोबा म्हणाले.

" तुझा रोजचा खर्च किती ? "

" आठ आणे. "

" याचा अर्थ या मजुरीच्या दरानें चांगली कताई करणाऱ्या कारागिरालाहि यावर आपली नीट गुजराण करतां येणार नाहीं. "

गांधीजींनीं गंभीरपणें या प्रश्नाची चर्चा केली. चरखा संघाच्या उत्पादनकेंद्रांतून काम करणाऱ्यांनां एवढ्या अल्प मजुरीवर निर्वाह कसा करावा? खादी व ग्रामोद्योग यांच्यांत काम करणारांना निदान त्यांचा निर्वाह तरी नीटपणें करतां आला पाहिजे. गांधीजींनीं कांतणाऱ्यांना निर्वाह–वेतन देण्याची चरखा संघाला सूचना केली.' खादी महाग झाली तरी चालेल, पण ती तत्त्वभ्रष्ट होतां कामा नये,' असें गांधीजींचें म्हणणें होतें. महाराष्ट्र चरखा संघानें गांधीजींनीं सुचविल्याप्रमाणें हा धाडसी प्रयोग करून पाहिला. आठ तास प्रामाणिक परिश्रम करणाराला जीवनांतील अत्यावश्यक गरजा तरी भागवतां आल्या पाहिजेत. देशांतील सामान्य जनतेची अशा प्रकारें आर्थिक सुधारणा केली तरच त्यांना जीवन पूर्णत्वानें जगतां येऊं शकेल. खादीमधील हा अभिनव प्रयोग होता.

• • •

या काळांत विनोबांची व्रतोपासनाहि जोमानें चालू होती. गांधीजींनीं सत्याग्रहींसाठीं व्रत–एकादशी सुचविली होती. हीं व्रतें नित्य आपल्यासमोर राहावीं, व प्रार्थनेच्या वेळीं त्यांचें चिंतन करतां यावें म्हणून विनोबाजींनीं हीं व्रतें एका श्लोकांत गुंफलीं. हा श्लोक सर्व देशभर आश्रमीय प्रार्थनेंत म्हटला जातो.

अहिंसा, सत्य, अस्तेय, ब्रह्मचर्य, असंग्रह ।
शरीरश्रम, अस्वाद, सर्वत्र भयवर्जन ।
सर्व धर्मीं समानत्व, स्वदेशी, स्पर्शभावना ।
हीं एकादश सेवावीं नम्रत्वें व्रतनिश्चयें ॥

गांधीजींनीं आपल्या अनुयायांना हा साधनामार्ग दाखवून दिला आहे. विनोबाजींनीं या प्रत्येक व्रताचें विवरण करणारे अभंग केले आहेत. ' ग्रामसेवा वृत्तां' तून हीं अभंग-व्रतें येत. सर्व व्रतांचें विवरण विनोबा अजून पूर्ण करूं शकले नाहींत. अभंगव्रतांची प्रस्तावना विनोबांनीं अशी केली आहे :

प्रेरणा परमात्म्याची, महात्म्याची प्रसन्नता ।
वाणी संतकृपेची ही, विन्याची कृतिशून्यता ॥
सत्याग्रह गुरूचें हें, मोहनाचें तमोहन ।
ज्ञान–विज्ञान–संपन्न, मोह–मोचन दर्शन ॥
आम्लान व्रतपुष्पांची, मंजु मंगल माळ ही ।
रहावी सर्वदां कंठीं, रमावी हृदयस्थळीं ॥
मूळची मोकळी गद्य, गूजरी साजरी गिरा ।
न भंगितां अभंगांत, गुंफिली परमादरें ॥

गांधीजी विनोबांच्या जवळच सेवाग्रामला राहात. ते स्वतः प्रवासांतून आपल्या ह्या मुलाची पत्रानें चौकशी करीत. कांहीं महत्त्वाच्या बाबतींत सल्ला लागला तर स्वतः त्याच्याकडे जात. विनोबा गांधींना सहसा पत्रें पाठवीत नसत किंवा मुद्दाम आपण होऊन गांधींच्याकडे जातहि नसत. गांधींनीं निर्देशिलेल्यांपैकीं बुद्धीच्या कसोटीवर उतरणाऱ्या गोष्टींवर ते प्रयोग करीत. ते गांधींची प्रयोगशाळा होते.

गीतेचे एकूण १८ अध्याय आहेत. त्यांत नाना विषयांची चर्चा आली आहे. या अध्यायांत कांहीं क्रम तर आहेच. गांधीजींनीं आपल्या मतानें कांहीं क्रम बसविला होता. पण पुढें त्यांनीं विनोबांना त्यासंबंधीं विचारलें. विनोबांनीं आपल्या मतानें गीतेच्या अध्यायांची संगती लावून दाखविली. गांधींना यासंबंधीं लिहिलेलें त्यांचें पत्र विनोबांनीं गीतेचा किती सखोल अभ्यास केला आहे त्याची साक्ष देते.

● ● ●

या काळांत विनोबांची प्रकृति कमजोर होऊं लागली. मित्रांना काळजी वाटूं लागली. मित्रांनीं गांधीजींच्या कानांवर ही गोष्ट घातली. 'तुला मला ताब्यांत घ्यावें लागेल' असें गांधींनीं लिहिलें. विनोबांनीं कळविलें : "मला तीन महिने मुदत द्या. मी प्रकृति सुधारून दाखवितों." विनोबाजींच्या मनांत गीतेच्या निदिध्यासानें असें ठसलें होतें कीं देह क्षणभंगुर आहे, आत्मा अमर आहे व स्वधर्म अबाध्य आहे. त्यामुळें देहाला साधन मानून ते त्याच्याकडून काम करून घेत होते. पण गांधींच्या निरोपांतून त्यांना इशारा मिळाला. त्यांचें वजन त्यावेळीं ९० पौंड होतें. त्यांनीं रोज नियमानें खाणावयाला आरंभ केला. शास्त्रशुद्ध आहार ठेवला आणि वजन ३५ पौंडांनीं वाढवून दाखविलें. त्यांच्या ह्या किमयेनें सर्व लोक आश्चर्यचकित झाले.

रशियन क्रांतीनंतर मार्क्सच्या विचारांचा जगभर बराच बोलबाला सुरू झाला होता. मार्क्सचें कॅपिटल म्हणजे समाजवादाचा व श्रमजीवींचा वेद अशी भावना सर्वत्र पसरली होती. विनोबा गांधींच्या अनुयायांपैकीं असले तरी सांप्रदायिक नव्हेत, स्वतंत्र विचाराचे. त्यांनीं मार्क्सचा कॅपिटल ग्रंथ वाचून त्याच्या तत्त्वज्ञानांतील सारासार भाग आपल्या कसोट्यांवर ठरवून टाकला. चिंतनाला सहायभूत म्हणून सतत विषय लागतच असतात. पण केवळ कल्पनाविलास व चिंतन यांत फरक आहे. कल्पनाविलासांत मनोरंजन असतें तर चिंतनांत प्रयोगांची प्रेरणा असते. विनोबा स्वतःच एका ठिकाणीं म्हणतात : " चिंतनांतून प्रयोग व प्रयोगांतून चिंतन अशी माझी जीवनाची घडण बसली आहे. हिलाच मी निदिध्यास म्हणतों. निदिध्यासांतून विचार स्फुरत रहातात." मार्क्सनें श्रमिकांना आपल्या संघटित श्रमांची शक्ति किती आहे याचें भान करून दिलें, हा त्याचा मोठा उपकार आहे, असें विनोबा म्हणतात.

नालवाडीला विनोबांच्या भोंवतीं ग्रामसेवा मंडळाचा संसार उभा राहिला. विविध प्रवृत्ति सुरू झाल्या, तेव्हां विनोबाजींनीं तेथून आपला मुक्काम हलवला आणि ते पौनार ह्या वर्ध्यापासून पांच मैलांवरील गांवीं गेले. धाम नदीच्या पलीकडच्या तीरावर एक छोटीशी टेकडी आहे. त्या टेकडीवर लाल रंगाची एक टुमदार हवेली आहे. तेथें विनोबांनीं आपला तळ ठोकला. ग्रामोद्योगांच्या साहाय्यानें ग्रामीण बेकारी दूर करण्याची गांधीजींची कल्पना होती. विनोबांनीं तेथें ' परिश्रमालय ' सुरू केलें. ज्यांना काम नसेल अशा स्त्री–पुरुष–मुलांनीं कोणींहि तेथें यावें व आठ तास श्रम करावें, त्यांना मजुरी देण्यांत येईल असें ठरविलें. कामासाठीं येणाऱ्यांत विनोबा मिसळत. त्यांची गति व कार्य-क्षमता वाढावी यासाठीं त्यांना मार्गदर्शन करीत. त्यांच्या सुखदुःखाच्या गोष्टी ऐकून घेत.

● ● ●

कर्मयोग्याचा ज्ञानावर खरा अधिकार, असें विनोबा म्हणतात. कर्ममय जीवनाच्या जोडीलाच त्यांची ज्ञानोपासनाहि सतत चालू असते. गांधीजींनीं एकादश व्रतांत ' सर्व धर्म समभाव ' हें एक व्रत घातलें आहे. त्यासाठीं विनोबांनीं सर्व धर्मांचा अभ्यास चालविला. गीता तर त्यांनीं पचवून टाकली होती. बायबलचाहि अभ्यास त्यांनीं केला होता. इस्लाम समजून घेण्यासाठीं त्यांनीं मुळांतून कुराणाचा अभ्यास करावयाला आरंभ केला व कुराण समजून घेतलें. मुसलमानांच्या इतक्याच सफाईनें ते ' अल् फातेहा ' म्हणूं लागले. सर्व धर्म प्रार्थनाहि त्यांनीं मराठींत तयार केली असून सर्व धर्मांचें सार त्यांत येऊन जातें. स्वतः विनोबा अत्यंत गोड गळ्यानें व समरस होऊन ही सर्व धर्म प्रार्थना म्हणतात.

विनोबांनीं पूर्वीं लिखाण खूप केलें होतें; पण तें सारें काशीला गंगार्पण करून टाकलें. कांहीं काळ आपलें चिंतन ते एका वहींत नोंदवून ठेवीत. हे विचार लोकांना इतके आवडत कीं शेंदीडशें लोकांनीं ते लिहून घेतले. सुभाषितांसारखे उद्बोधक असे हे विचार पुस्तकरूपानें 'विचारपोथी' या नांवानें प्रसिद्ध झाले आहेत. त्याची थोडी वानगी वाचकांना आवडेल.

—बुडत्याशीं सहानुभूति म्हणजे त्याच्याबरोबर बुडणें नव्हे. तर स्वतः तरून त्याला वांचविण्याचा प्रयत्न करणें.

—गुण किंवा दोष सहकुटुंब सहपरिवारें येऊन कार्यसिद्धि करीत असतात.

—कर्मठ उपासनेचेंहि 'कर्म' करतो, भक्त कर्माचीहि उपासना करतात.

—हवेची खोली म्हणून एकादी स्वतंत्र खोली नाहीं. सर्वच खोल्यांतून हवा पाहिजे, तसे धर्म म्हणून स्वतंत्र विषय नाहीं, सर्व व्यवहारांत धर्म पाहिजे.

—आजचें लोकमत दीनांचें मत, ज्याला कोणी पुसत नाहीं,
+ दुर्जनांचें मत जें कोणाला पुसत नाहीं,
+ विद्वानांचें मत, ज्यांत मेळ नाहीं.

—कर्मयोगाचें यंत्र सरूत राखावें, घर्षणाच्या भीतीनें ढील करूं नये. घर्षण टाळण्यासाठीं भक्तीचें तेल द्यावें.

—'पश्यति' शिवाय ज्याला विश्वास पटत नाहीं तो पशु, 'मनुते'वर ज्याचें भागतें तो मनुष्य.

—यशानें नम्रता आणि अयशानें उत्साह हा यश आणि अयश ह्यांचा कर्मयोगांतील विनियोग आहे.

—पहिली ठिणगी पडण्याला युगें गेलीं, पण आतां राख होण्याला त्रैराशिक मांडण्याची गरज नाहीं.

—स्वधर्माबद्दल प्रेम, परधर्माबद्दल आदर आणि अधर्माबद्दल उपेक्षा मिळून धर्म बनतो.

—गंगा आपल्या ठरलेल्या मार्गानें वाहाते म्हणून ती लोकांच्या अधिकांत अधिक उपयोगी पडते. परंतु अधिक उपयोगी पडण्याच्या लोभानें जर आपला नियतमार्ग सोडून लोकांच्या अंगणांतून ती वाहूं लागेल तर लोकांची काय स्थिति होईल ?

—ज्यांनीं ज्ञान आचरणांत आणलें त्यांनीं ईश्वराला मूर्तिमान् केलें.

★ ★ ★

# कारागृहांतील साधना


१९३७ सालीं प्रांतोप्रांतीं कॉंग्रेसचीं मंत्रिमंडळें आलीं. कॉंग्रेसच्या हातीं सत्ता आल्यानंतर जनतेच्या हिताच्या अनेक योजना गांधीजींच्या सल्ल्यानें हातीं घेण्यांत येऊं लागल्या. देश स्वतंत्र करावयाचा तर शिक्षणांत आमूलाग्र क्रांति करून खरें राष्ट्रीय शिक्षण सुरू झालें पाहिजे, ही गोष्ट देशांतील नेते वंगभंगाच्या वेळेपासून सांगत होते. १९२० सालीं सरकारी शाळांवर बहिष्कार घालण्याचा कार्यक्रम हातीं घेण्यांत आला. सरकारी शाळा सोडणारांसाठीं प्रांतोप्रांतीं राष्ट्रीय विद्यापीठें सुरू झालीं. परंतु १९३४ नंतर हा उत्साह बराच मावळला. अशा नकारात्मक पद्धतीनें या प्रश्नाचा विचार करून भागणार नाहीं हें गांधीजींच्या ध्यानांत आलें. पूर्वीं राष्ट्रीय शिक्षणाचा कार्यक्रमहि शहरांपुरताच मर्यादित होता. सात लाख खेड्यांत वसलेल्या बहुसंख्य जनतेचें काय ? तेथील मुलांना शिक्षण कसें मिळावयाचें ? शहरांतील प्रचलित शिक्षणपद्धतीनें मुलें शारीरिक श्रमांचा आणि श्रमिकांचा तिरस्कार करूं लागतात. परिश्रमांचा तिरस्कार करणारें कोणतेंहि राष्ट्र उदयास येत नाहीं. खेड्यांत शिक्षण द्यावयाचें म्हणजे केवळ चार बुकें वाचायला शिकवून चालणार नाहीं, त्यांच्यांत नवें जीवन आणलें पाहिजे. गांधीजींनीं त्यासाठीं मूलोद्योग शिक्षणाची कल्पना मांडली. विनोबाजी ही गांधीजींची प्रयोगशाळा असल्यानें विनोबांनीं ह्या नव्या पद्धतीला शास्त्रीय व तात्त्विक अधिष्ठान मिळवून दिलें. समवाय पद्धतीनें शिक्षण कसें द्यावें, तें त्यांनीं दाखवून दिलें. कांतण्याच्या उद्योगाच्या अनुषंगानें विविध विषय कसे शिकवावे, याचें एक शास्त्र त्यांनीं लोकांच्यापुढें ठेवलें. गांधीजींची मूलोद्योग शिक्षणाची कल्पना त्यांनीं ठाम पायावर उभी केली.

या काळांत खानदेश–वऱ्हाड भागांत दुष्काळी परिस्थिति निर्माण झाली. काँग्रेसचें सरकार असूनहि दाद लागेना. शेतकरी टेकीस आले. लोकप्रतिनिधींपेक्षां सरकारी नोकरशाहीवर मंत्र्यांचा भरंवसा अधिक आणि नोकरशाहीची जुनी चाकोरी न सुटलेली. आणेवारी अवास्तव लावण्यांत आली. आपण चळवळ केली तर आपलींच सरकारें बदनाम होतील, या धास्तीनें जनतेच्या सेवेचा पत्कर घेतलेले कार्यकर्ते ग्रस्त झालेले. शेवटीं कुणीच कांहीं हालचाल करीत नाहीं, असें पाहून विनोबा तीव्रपणें बोलले. मोजमापाशिवाय बोलायचें नाहीं हें त्यांचें धोरण. कपाशीच्या फराट्यांना लागलेल्या बोंडांच्या मोजमापाचे तिथीवार आंकडे सांगून त्यांनीं आणेवारींत झालेली चूक किती ढोबळ आहे हें दाखवून दिलें. आपल्या या भाषणांच्या अखेरीस ते म्हणाले : "मंत्री गादीवर आहेत ते जनतेचीं गाऱ्हाणीं दूर करण्यासाठीं. जर वास्तव अडचणींचाहि परिहार त्यांना करतां येत नसेल तर त्यानीं खालीं उतरावें." जाज्वल्य सत्यनिष्ठा आणि दलितांची कणव त्यांच्या तोंडांतून तीव्रतेच्या रूपानें बाहेर पडत होती. सरकारच्या मागें गोंडा घोळत जाण्यासाठीं लोक-संघटना नसून सरकारला सत्यस्थितीची जाणीव करून देण्यासाठीं त्या आहेत. जनसंघटना ही खासगी नोकरशाही नव्हे, ह्याची जाणीव त्यांनीं लोकांना करून दिली. सरकार बदनाम किंवा कीर्तिवंत व्हायचें तें आपल्या दुष्कृत्यांनीं किंवा सत्कृत्यांनीं होईल. स्तुतिपाठांनीं दुष्कृत्यांची लाज झाकली जाणार नाहीं, ही जनसंघटनांची जाणीव लोपली कीं, त्यांचा दंडशक्तीला अंकुश लागण्याऐवजीं दंडशक्तीच त्यांच्यावर आरूढ होते.

• • •

परंतु जगांतलें वातावरण तापत चाललें. युद्धाचे ढग जमूं लागले. १९३९ सालीं युद्ध सुरूं झालें. युरोपांतलीं राष्ट्रें त्यांत गोवलीं गेलीं. मस्तवाल हिटलरचा प्रतिकार करण्यासाठीं इंग्लंडनें युद्ध छेडलें. हिंदुस्थानांतील प्रांतोप्रांतींच्या काँग्रेस मंत्रिमंडळांना न विचारता व्हाइसरॉयनें एक फतवा काढून हिंदुस्थानहि युद्धांत सामील झाल्याचें जाहीर केलें. देशाचा हा अपमान होता. स्वातंत्र्येच्छु राष्ट्र असला अपमान कधींहि सहन करणें शक्य नव्हतें. काँग्रेस मंत्रिमंडळांनीं राजीनामे दिले. गांधीजींनीं युद्धविरोधी सत्याग्रह सुरू करण्याचें ठरविलें.

ह्या वेळचा सत्याग्रह हा सामुदायिक सत्याग्रह नव्हता, व्यक्तिगत सत्याग्रह व्हायचा होता. गांधीजी पारखून पारखून एकेका सत्याग्रहीची निवड करणार होते. पहिला सत्याग्रही कोण होणार ? गांधींनीं विनोबांना निरोप पाठविला : "तूं व्यक्तिगत सत्याग्रहाला तयार



आहेस कीं नाहीं ? तुझ्यामागें कामें पुष्कळ आहेत, मिळेल का तुला वेळ ? " विनोबा अनेक कामांत मग्न होते, पण मोकळे होते. त्यांनीं उत्तर पाठविलें : " मला तसा वेळ तर नाहीं आहे, पण मी मुक्त आहें. कोणतेंहि काम मला बांधूं शकत नाहीं. " आणि विनोबांनीं संमति कळविली. सत्याग्रहीला सत्याग्रह करण्याला वेळ मिळूं नये इतकें त्यानें कामांत जखडून घेणें बरें नव्हें. गांधीजींनीं ' पहिला सत्याग्रही ' म्हणून विनोबांचें नांव जाहीर केलें. पण लोकांना समजेना, हे पहिले सत्याग्रही विनोबा आहेत तरी कोण, कुठले ? आणि कोणाला माहीत कसे नाहींत ? जगाला विनोबांचें नांव त्या वेळीं प्रथम कळलें.

गांधीजींनीं आणि महादेवभाईंनीं विनोबांचा परिचय करून देणाऱ्या सुंदर टिपण्या ' हरिजन 'मध्यें लिहिल्या. गांधींनीं लिहिलें : " विनोबा संस्कृतचे पंडित आहेत. आश्रमांत आरंभीं दाखल झालेल्या सभासदांपैकीं ते एक. स्वयंपाकापासून संडाससफाईपर्यंत सर्व कामें त्यांनीं केलीं आहेत. त्यांची स्मरणशक्ति आश्चर्यजनक आहे. ते स्वभावानें अध्ययनशील आणि हाडाचे शिक्षक आहेत. टकळी कांतण्यांत तर त्यांनीं क्रांतीच केली आहे. तिच्यांतील सर्व सुप्त गुणांचें दर्शन त्यांनीं घडविलें आहे. त्यांच्या इशाऱ्यावर बलिदान करील अशी कार्यकर्त्यांची सेना त्यांच्यापाशीं आहे. इतिहासाचे ते मर्मज्ञ विद्वान्

आहेत. सविनय कायदेभंगापेक्षां रचनात्मक कार्य अधिक प्रभावी असतें असा त्यांचा विश्वास आहे. सर्वत्र राजकीय व्याख्यानबाजी चालते तेथें आणखी भर कशाला, अशी त्यांची भावना. त्यामुळें प्रसिद्धीच्या प्रकाशांत ते नसतात. "

महादेवभाईंनीं लिहिलें : " प्रसिद्धीची ज्यांना कधीं तमा नव्हती त्यांना गांधीजींच्या सत्याग्रहानें बेहद्द प्रसिद्धि दिली आहे. परंतु या प्रसिद्धीपासूनहि कमळाप्रमाणें निर्लिप्त राहण्याची शक्ति विनोबांच्या इतकी कोणांतहि नसेल. ते फारसे कोणाला ठाऊक नसले, आज त्यांचा फारसा प्रभाव दिसत नसला, तरी कांहीं वर्षांनीं लोकांना तो कळेल. एखाद्या गोष्टीबद्दल निश्चय केला कीं लागलीच त्याची अंमलबजावणी करणें, हा त्यांचा फार मोठा गुण आहे. निरंतर विकासशीलता हा त्यांचा दुसरा गुण आहे. मी प्रतिक्षणीं विकास करीत आहे, असें फारच थोड्यांना म्हणतां येईल. गांधींशिवाय विनोबांतच हा गुण मला दिसला. "

• • •

सरकारनें विनोबांना पकडून तीनदां शिक्षा ठोठावली. विनोबांना जेलमध्यें काय नि बाहेर काय, विशेष फरक नव्हता. त्यांचे कार्यक्रम जेलमध्यें व्यवस्थितपणें चालू होते. नागपूर जेलमध्यें ते असतांना इतर सत्याग्रहींनीं त्यांना स्वराज्याची कल्पना स्पष्ट व संपूर्णपणें मांडण्याची विनंती केली. विनोबांनीं तेथें स्वराज्यशास्त्राचें विवेचन केलें, त्यांच्या त्या प्रवचनांचें पुस्तक आतां प्रसिद्ध झालें आहे. विनोबांची स्वतंत्र प्रज्ञा त्यांत दिसून येते. जगांतील राज्यशास्त्रावरील पहिल्या पंक्तीच्या ग्रंथांत विनोबाजींच्या ह्या पुस्तकाची गणना करावी लागेल. गांधीजींच्या स्वराज्यकल्पनेची शास्त्रशुद्ध चर्चा त्यांत केली आहे. राज्य वेगळें, स्वराज्य वेगळें; ' न त्वहं कामये राज्यं ' मला राज्य नको, ' यते मही स्वराज्ये ' स्वराज्यासाठीं आम्ही प्रयत्न करतों, असा राज्य व स्वराज्य यांतील भेद दाखवून विनोबा म्हणतात : " स्वराज्यशास्त्र नित्य वर्धिष्णु आहे. त्यामुळें देशकालानुसार त्याची पद्धत बदलत राहील. पण त्याचीं मूलतत्त्वें शाश्वत आहेत. "

१०४७ सालीं आपण स्वतंत्र झालों, राज्यकारभार आपल्या हातीं आला. आतां स्वराज्य निर्माण करण्याचें काम बाकी आहे. राज्याचें स्वराज्य करावयाचें तर त्याची स्पष्ट कल्पना आपल्यासमोर असली पाहिजे. या दृष्टीनें स्वराज्याच्या दहा कसोट्या विनोबांनीं मांडल्या आहेत.

[stamp]

१—देशांतील सर्व लोकांत परस्परांविषयीं बंधुभाव असावा.

२—राष्ट्रांतील सर्व लोकांचें ज्ञानपूर्वक, यथाशक्ति परंतु सहजस्फूर्त, हार्दिक सहकार्य सतत व सर्वत्र दिसावें.

३—समर्थ अल्पसंख्या व सर्वसामान्य बहुसंख्या यांचें हितैक्य असावें.

४—सर्वांच्या सर्वांगीण व समान विकासाची दृष्टि असावी.

५—राज्यसत्तेचें केंद्रीकरण होऊं नये ती जास्तींत जास्त विभागलेली असावी.

६—समाजाला बंधनांनीं जखडूं नये. कमींत कमी बंधनें असावीं.

७—राज्यव्यवस्था गुंतागुंतीची व लोकांना न समजणारी नसावी. तंत्र सोपें व सामान्य लोकांना कळण्यासारखें असावें.

८—कारभार खर्चिक नसावा. जनतेकडून कररूपानें जमलेला सर्व पैसा वेतनापायीं खर्च न होतां तो जनहिताच्या योजनांत खर्च व्हावा.

९—रक्षणाची कमींत कमी आवश्यकता रहावी.

१०—सार्वत्रिक, अव्याहत, तटस्थ म्हणजेच मुक्त ज्ञानप्रचार व्हावा.

असें हें दशगुणी स्वराज्य आणण्यासाठीं सर्वांनीं झटावयाचें आहे. ह्या दहा कसोट्यांना उतरेल तें खरें स्वराज्य. हें स्वराज्याचें मंदिर चौखांबी असेल. सेवाभाव, स्वावलंबन, अहिंसक शक्ति व समान मजुरी या चार खांबावर हें मंदिर स्थिर राहील.

स्वराज्याचीं आणखी चार लक्षणें विनोबांनीं सांगितलीं आहेत.

१—समर्थांचें सामर्थ्य जनसेवेंत समर्पित व्हावें.

२—जनता पूर्ण रीतीनें स्वावलंबी आणि परस्पर सहकार्य करणारी असावी.

३—नित्य सहकार्य आणि प्रासंगिक असहकार वा प्रतिकार यांचें अधिष्ठान अहिंसा हेंच असेल.

४—सर्वांच्या प्रामाणिक परिश्रमांची नैतिक व आर्थिक किंमत समान असावी.

स्वराज्याचें विनोबांनीं केलेलें हें विवेचन अगदीं नेमकें आहे. त्यांचें हें पुस्तक त्यांच्या गणिती बुद्धीचें द्योतक आहे. ' गागरमें सागर ' म्हणतात तसें थोडक्यांत सर्व राज्यशास्त्र त्यांत आलें आहे. व्यक्तिगत सत्याग्रहांतून मिळालेलें हें अमोल रत्न आहे.

● ● ●

पुढें जागतिक परिस्थिति बदलली आणि सरकारनें सत्याग्रहींना सोडून दिलें. त्यानंतर क्रिप्ससाहेब वाटाघाटी करून अपेशी ठरून परत गेले. भारताच्या पूर्व सीमेवरील

जपान्यांचें दडपण वाढत चाललें होतें. देश वांचावयाचा तर तो स्वतंत्र झाला पाहिजे. युद्धकाळांत अहिंसक व्यक्तीनें काय करावें ? चौरीचुऱ्याला दंगा झाला म्हणून पूर्वी गांधीजींनीं ऐनभरांत आलेली चळवळ मागें घेतली होती. हिंसा घडेल या भीतीपायीं अहिंसक माणसानें का बसून रहायचें ? अहिंसा क्रियाशून्य असूं शकत नाहीं. गांधीजींचें असें तीव्र विचारमंथन चालू होतें. निर्वाणीची चळवळ उभारावयाची असें त्यांनीं ठरविलें. हिंसेचें थैमान चालू असतांना न्यायाच्या प्रस्थापनेसाठीं ' करेंगे या मरेंगे ' या ब्रीदानें लढा सुरूं करण्याचा त्यांनीं निश्चय केला. कदाचित् उपास करून प्राणत्याग करण्याचाहि प्रसंग येईल असें ते म्हणूं लागले.

महादेवभाई अस्वस्थ झाले होते. गांधीजींना या विचारापासून परावृत्त करण्याचा त्यांचा प्रयत्न होता. विनोबांनीं तसा सल्ला दिला तर गांधी प्राणांतिक उपोषणाचा बेत रहित करतील; असें त्यांना वाटत होतें. गांधी ज्यांच्या म्हणण्याचा गंभीरपणें विचार करतील अशी ही एकच व्यक्ति होती ?

गांधीजींनीं विनोबांना सल्ल्यासाठीं बोलावलें. ते आले. गांधीजींनीं आपले विचार त्यांच्यापुढें मांडले. प्रबल हिंसेचा प्रतिकार करण्यासाठीं अहिंसक माणसानें आत्मबलिदान करणें योग्य कीं अयोग्य, असा प्रश्न होता. विनोबांच्याकडे सगळे आशेनें पहात होते. विनोबा गांधीजींना बलिदानाच्या विचारापासून परावृत्त करतील या आशेनें बिचारे त्यांच्याकडे नजरा लावून बसले होते. पण तटस्थपणें विनोबांनीं सांगितलें : " अशा परिस्थितींत अंतिम उपाय म्हणून अहिंसक माणसानें आत्मबलिदान करणें अहिंसेच्या मर्यादेंत बसतें. "

गांधीजी म्हणाले : " यावर विचार करायला हवा तर आणखी दोन चार दिवस मी वेळ देतों. विचार करून मग नक्की काय तें कळव. "

विनोबा म्हणाले : " यांत आणखी विचार करण्यासारखें काय आहे ? मी सांगितलें तें पूर्ण विचारांतींच सांगितलें आहे. "

आणि ज्या निश्चित भावनेनें पौनारहून ते आले होते त्याच वृत्तीनें ते परत गेले.

मुंबईला अ. भा. काँग्रेसचें अधिवेशन झालें. देशांतील वातावरण अत्यंत स्फोटक बनलें होतें. सर्वत्र धाकधूक होती. ब्रिटिश सरकारकडे सत्तात्यागाची मागणी करण्यांत आली. सरकारनें नेत्यांना पकडून डांबलें. विनोबांना त्यांच्या सहकाऱ्यांनीं काय करायचें विचारलें. विनोबा म्हणाले : " रामनामाप्रमाणें आम्ही आजपासून स्वतंत्र आहोंत असें

सर्वत्र सांगा." सरकारनें विनोबांना लौकरच अटक केली. वर्ध्याच्या इतर संस्था शाबूत राहिल्या. फक्त विनोबांची संस्था बेकायदा ठरवली. त्यांना दूर वेलोरच्या जेलमध्यें डांबण्यांत आलें.

• • •

वेलोरला जातांच विनोबांचें अध्ययन सुरू झालें. भारतांतील विविध भाषांचा आणि लिप्यांचा त्यांनीं तुलनात्मक अभ्यास आरंभिला. जेलमधील इतर कैद्यांशीं आपलेपणाचे संबंध निर्माण व्हावेत म्हणून त्यांच्या भाषा ते शिकले. त्या भाषांत बोलूं लागले. जेलमधून आपल्या जवळच्या नातेवाईकांना पत्रें पाठवायची परवानगी असते. विनोबांना गांधींना पत्र पाठवायचें होतें. पण गांधी विनोबांचे नातेवाईक नाहींत, या सबबीवर सरकारनें त्यांना गांधींना पत्रें पाठवायला बंदी केली. विनोबा म्हणाले : " गांधींच्या इतकें जवळचें मला कोणी नाहीं. त्यांना पत्र पाठवायला परवानगी देणें शक्य नसेल तर अन्य कोणालाहि मी पत्र पाठविणार नाहीं. " आणि तीन वर्षांत त्यांनीं कोणाला पत्र पाठविलें नाहीं.

वेगवेगळ्या भाषा आणि लिप्या यांचा अभ्यास करून एक शास्त्रशुद्ध नवी लीपि त्यांनीं तयार केली. हीच लीपि आपल्या सर्व लिखाणांत ते सध्यां वापरतात. लीपि सुधारण्यांत त्यांची दृष्टि मुख्यत: शिक्षकाची व संशोधकाची होती. टाइपरायटर व छापखाना यांचाहि सूक्ष्म विचार त्यांत केलेला आहे. शिक्षणाच्या दृष्टीनें सुलभ, अधिक शास्त्रीय व अधिक योग्य प्रकारें उच्चार प्रकट करणारी लीपि असावी असा त्यांनीं प्रयत्न केला. आपली ही लीपि ह्या तिन्ही कसोट्यांवर उतरते व म्हणून लगेच सर्वांनीं ती वापरावी असा आग्रह मात्र त्यांनीं राखला नाहीं. स्वतः त्या लीपींत लिहावयाला त्यांनीं आरंभ केला. स्वतःसाठीं ह्या नव्या लीपींत टाइपरायटर बनवून घेतला व खिळे पाडून आपलें लेखन त्या लीपींत छापायला सुरुवात केली. ते म्हणतात : " माझा लेखणीच्या क्रांतिकारक शक्तीवर अधिक विश्वास आहे. ही लीपि शास्त्रशुद्ध आहे असें ज्यांना वाटतें त्यांनीं तिचा वापर करावा. ती लादण्यांत तिच्या शास्त्रीयतेचा उपमर्द केल्यासारखेंच होईल. " या लीपीला त्यांनीं ' लोकनागरी ' असें नांव दिलें आहे. देवनागरीची प्रतिष्ठा विनोबांच्या संशोधनानें अधिक वाढली आहे.

जेलमध्यें कांहीं महिने त्यांनीं संपूर्ण मौन पाळलें. जेलमधील कैद्यांत कोणत्याहि प्रकारचा पंक्तिप्रपंच न करतां ते सर्वांत मिळूनमिसळून वागत. जेलमधील एक कम्युनिस्ट मित्र म्हणाले कीं, तुम्हीं नवें कांहीं वाचत नाहीं. त्यांना विनोबा म्हणाले कीं, तुम्हीच निवडक पुस्तकें वाचून दाखवा. विनोबा सूत कांतीत असतांना ते मित्र कम्युनिझमवरचीं

वेगवेगळीं पुस्तकें वाचीत. तास दीड तास रोज श्रवण होई. हा क्रम त्यांचा कांहीं महिने चालला. विनोबांनीं बुद्धि सांप्रदायिकतेनें कधींच बरबटूं दिली नाहीं. ते म्हणतात : " बुद्धीला पटत नाहीं म्हणा, ' माझ्या ' बुद्धीला पटत नाहीं असें म्हणूं नका, तुम्ही बुद्धिवादी आहांत कीं मद्बुद्धिवादी ? " मन नवविचारांसाठीं ते सतत मोकळें ठेवतात.

विनोबांना वेलोरहून पुढें शिवणीच्या जेलमध्यें पाठविण्यांत आलें. जेलमध्यें त्यांचें गीता व उपनिषदें यांचें चिंतन चालूच होतें. रोजच्या प्रार्थनेंत गीतेच्या दुसऱ्या अध्यायांतील स्थितप्रज्ञाचें वर्णन करणारे शेवटचे १८ श्लोक म्हटले जातात. शिवणी जेलमधील सत्याग्रहींच्या पुढें विनोबांनीं या अठरा श्लोकांवर अठरा प्रवचनें दिलीं. तीस वर्षांच्या निदिध्यासानें जो अर्थ त्यांच्या मनांत स्थिर झाला तो त्यांनीं तेथें विवरला. गीतेसंबंधींची ' स्थितप्रज्ञ दर्शन ' ही अप्रतिम अशी कृति आहे.

आरंभींच विनोबांनीं त्या प्रवचनांत सांगितलें आहे : " माणसाचें तत्त्वज्ञान त्याच्या बुद्धींत गुप्तच राहील. प्रकट त्याचें आचरणच होईल. त्याच्या आचरणावरूनच त्याच्या तत्त्वज्ञानाचें माप जगाला आणि त्यालाहि कळावयाचें. आचरणांत आणि ज्ञानांत अंतर राहो, पण विरोध तर असतांच कामा नये आणि अंतरहि सतत तोडीत राहिलें पाहिजे. "

या अवधींत त्यांनीं गीताईचें पाठसंशोधन केलें. त्यांतील शब्दांची अखेरची योजना ठरविली. ईशवास्य उपनिषदाचें चिंतन त्यांचें बराच काळ चालू होतें. गांधींसाठीं त्यांनीं ईशावास्यावर कांहीं लिखाणहि केलें होतें. परंतु मूळ संस्कृतमधून श्लोक पाठ करण्यानें अर्थाचा व्हावा तसा दरक्षणीं बोध सामान्य माणसाला होत नाहीं. संस्कृत ग्रंथांच्या आड पडलेलें ज्ञान सामान्य जनांच्या कळवळ्यानें संतांनीं लोकभाषांतून आणलें. भाषा-शैलीपेक्षां संतांना लोकांच्या शीलाचें माहात्म्य अधिक वाटत होतें. सकलजनसुलभ भाषेंत ज्ञान आलें तरच लोकजीवनाचा उद्धार करण्याला तें समर्थ होतें. ब्रिटिश राजवटी-पासून संतांचें हें कार्य बऱ्याच प्रमाणांत थांबलें होतें. आपल्या सर्वसामान्य लोकांपेक्षां आपण वेगळें आहोंत हें दाखविण्यांतच गौरव वाटूं लागला होता. म. गांधींनीं पुन्हां संतांचें तें कार्य हातीं घेतलें. विनोबांनीं याच हेतूनें ईशावास्योपनिषदाचें सुबोध मराठी गेय गद्यांत रूपांतर केलें. विनोबाजी स्वतः तें फार सुंदर म्हणतात. सकाळच्या प्रार्थनेंत त्यांनीं त्याचा समावेश केला आहे. अशा प्रकारें जेलमध्यें त्यांच्या विविध प्रवृत्ति सुरू होत्या.

युद्धाची अखेर जवळ आली असें दिसूं लागलें. सरकारनें सत्याग्रहींची सुटका केली. तिकडे गांधीजीहि सुटले होते. जेलमध्यें विनोबाजींचा वेगवेगळ्या पक्षांतील लोकांशीं

जिव्हाळ्याचा संबंध आला. त्यांना असें दिसून आलें कीं, सर्वच पक्षांत कांहीं सज्जन व कांहीं दुर्जन असतात. तेव्हां कोणा एकाच पक्षाला किंवा संस्थेला आपली संस्था मानणें हें अहिंसेच्या दृष्टीनें बरें नाहीं. गांधीजींच्या पुढें त्यांनीं आपली कल्पना मांडली. सर्वांपासून अलग राहून सज्जनतेची सेवा करायची असें त्यांनीं ठरविलें. गांधी म्हणाले : "तुझा अभिप्राय मी समजलों. तूं सेवा करणार आहेस, अधिकार राखणार नाहींस. हें ठीक आहे." अहिंसेच्या विकासासाठीं विनोबांनीं सर्व संस्थांचे राजीनामे दिले व ते मोकळे झाले.

गीताई मराठींत असली तरी त्यांतील शब्दांची योजना चिंतनपूर्वक विनोबाजींनीं केली होती. अनेक लोक मूळ गीता न वाचतां गीताईच वाचतात. बहुजनसमाजाला संस्कृतचें ज्ञान नसल्यानें तें साहजिकहि आहे. गीताईतला प्रत्येक शब्दन् शब्द त्यांना समजावा यासाठीं विनोबांनीं 'गीताई–शब्दार्थ–कोश' बनविण्याची पूर्वतयारी तुरुंगांतच करून ठेवली होती. बाहेर आल्यावर १९४५–४६ सालीं त्यांनीं आपले धाकटे बंधु शिवाजी यांच्यासह वर्षभर खपून हा कोश तयार केला.

त्यांचे इतर आश्रमीय कार्यक्रम पुन्हां सुरू झाले. परंतु तिकडे नौखाली पेटली. जनतेच्या अब्रूच्या रक्षणार्थ गांधीजी तिकडे धांवून गेले. 'हरिजन' पत्रांसाठीं लिहायलाहि त्यांना वेळ मिळेना. तेव्हां त्यांनीं किशोरलाल भाई, काकासाहेब व विनोबा यांच्यावर 'हरिजन' चालविण्याची जबाबदारी टाकली. विनोबाजींनीं या काळांत बरेंच लिखाण केलें आहे.

वस्त्रविद्येचा विनोबांनीं बराच विकास केला आहे. चरखा व तकली यांची गति वाढविण्याचा त्यांनीं खूप प्रयत्न केला. कांतण्याचें एक शास्त्र निर्माण केलें. पेळू मिळण्यांत अडचण पडूं लागली तेव्हां कांतणारानें स्वतःच पेळू बनवावे या दृष्टीनें त्यांनीं तुनाईची पद्धत रूढ केली. याला 'दशयंत्र पिंजण' असें काव्यमय नांव दिलें. हाताचीं दहा बोटें हीं यंत्रासारखींच तर आहेत !

लोक बारीक सूत काढीत, सूत बऱ्याच वेळां कच्चें असे. त्यामुळें विणकर तें विणायला नाराज असत. विणकरांची ही अडचण दूर करण्यासाठीं त्यांनीं सूत दुहेरी करून त्याला पीळ देण्याची दुवटा पद्धत प्रचारांत आणली. अशा प्रकारें तुरुंगांत आणि तुरुंगाबाहेरहि त्यांचें रचनात्मक, संशोधनात्मक व प्रायोगिक कार्य निरलसपणें चालू होतें.

★ ★ ★

# विधायक नेतृत्व

बेचाळीसच्या लढ्यानंतर विनोबाजी नागपूर 'जेलमधून सुटले. तेथून वर्ध्याला परत येतांना स्टेशनांच्या आजूबाजूला त्यांनीं जें दृश्य पाहिलें त्यामुळें त्यांना अतिशय दुःख झालें. रेल्वेच्या दोन्ही अंगांना लोक खुशाल शौचाला बसलेले दिसले. तें दृश्य कांहीं वर्धा–नागपूर भागांतलेंच होतें असें नव्हे, तें एक अखिल भारतीय प्रदर्शन होतें. स्वातंत्र्याच्या उंबरठ्यावरील राष्ट्राचे नागरिक किती ओंगळ वागत होते ! परदेशी यात्रेकरू हीं दृश्यें पाहून भारताबद्दल मनांत काय म्हणत असतील ! विनोबाजींना या गोष्टीची अत्यंत खंत वाटली. त्यांनीं आश्रमांत येतांच हें काम हातीं घ्यावयाचें ठरविलें.

त्यांच्या पौनार आश्रमापासून २॥ मैलांवर सुरगांव नांवाचें एक छोटें खेडं आहे. घाणीनें बरबटलेलें कोणतेंहि गांव सुरगांव कसें होईल, तें असुरगांवच म्हणायचें. विनोबाजींच्या मित्रांनीं त्या खेड्यांत पूर्वीं ग्रामसेवेचें काम केलें होतें. ह्या गांवांत विनोबांनीं नियमितपणें भंगीकामाला आरंभ केला. त्यांच्यासारख्यांना भंगीकाम करतांना पाहून लोकांना वाईट वाटायचें त्यांना लोक विचारायचे : " किती दिवस हें तुमचें काम चालणार ? " विनोबा म्हणत : " वीस वर्षांचें हें काम आहे. आजचीं मुलें वीस वर्षांनीं जवान होतील. एक नवी पिढी निर्माण होईल. तोंपर्यंत हें काम करावयाचें असें मी मनांत योजिलें आहे. " आणि वीस महिने अगदीं सूर्याच्या नियमितपणें त्यांचें भंगीकाम सुरूं होतें.

• • •

ऑक्टोबर महिन्यांत विनोबांचे वडील आजारी पडले. ते एकटेच बडोद्याला राहात असत. रंगकाम व संगीत हे त्यांचे अत्यंत प्रिय विषय. त्या विषयांत त्यांचें संशोधन



चाले. ते स्वतंत्रपणें एकटेच रहात. आहारांत नाना प्रयोग त्यांनीं केले. तीस वर्षें हातानें स्वयंपाक करून खात. कधीं कोणाची सेवा त्यांनीं घेतली नाहीं. अत्यंत उद्योगी आणि प्रयोगी ते होते. आपल्या प्रयोगांसाठीं नोकरींतून ते एक वर्ष अगोदर निवृत्त झाले होते. खादी रंगविण्याचें शिक्षण देण्यासाठीं पुढें कांहीं दिवस चांद्याला येऊन राहिले होते. रात्रीं झोंप न आली तर उठून प्रयोग करायला लागत. म्हातारपणीं त्यांनीं आपल्याजवळ येऊन रहावें असा आग्रह मुलांनीं केला, पण त्यांनीं करारीपणानें व स्वतंत्र बाण्यानें बडोद्याला काळ कंठला. शेवटीं आजारी पडल्यानंतर विनोबांचे धाकटे बंधु शिवाजी त्यांना धुळ्याला घेऊन आले. त्यांची प्रकृति काळजी करण्यासारखी आहे असें समजल्यावर विनोबाजी धुळ्याला गेले. ४७ सालीं शरद् पौर्णिमेला विनोबांचे वडील मृत्यु पावले. विनोबाजींनीं शवाला अग्नि दिला. गीतापाठ केला. त्या दिवशीं गीतेची ' अधिकरण माला ' जाहीर रीतीनें म्हटली. ' अधिकरण माला' म्हणजे गीतेमध्यें चर्चिल्या गेलेल्या साठ विषयांची धांवती सूचि, गीतेचा धांवता पट. पित्याच्या मृत्यूनंतर १९४८ च्या जानेवारीपर्यंत विनोबा प्रकृतिस्वास्थ्यासाठीं धुळ्यालाच राहिले. तेथें त्यांचीं रोज प्रवचनें होत. वेगवेगळे लोक नाना विषयांवर त्यांच्याशीं चर्चा करण्यासाठीं येत. १९३२ सालच्या चळवळीच्या वेळीं खानदेशांतील कितीतरी मंडळींशीं विनोबांचा परिचय झाला होता. धुळ्याच्या मुक्कामांत त्यांच्या गांठीभेटी झाल्या. प्रकृति थोडी सुधारल्यानंतर विनोबाजी परत वर्ध्याला आले.

स्वातंत्र्योत्तर काळांत देशांत द्वेषाचा जो वडवानल पेटला होता तो विझविण्याचा, माणसांतील उफाळून आलेली पशुता घालविण्याचा गांधीजी निकराचा प्रयत्न करीत होते. देशाची नवरचना करण्याच्याहि नाना योजना त्यांच्या डोक्यांत घोळत होत्या. देशांतील विधायक कार्यकर्त्यांची एक परिषद त्यांनीं १९४८ च्या फेब्रुवारी महिन्यांत वर्ध्याला बोलावली होती. परन्तु ईश्वरी योजना वेगळीच होती. ३० जानेवारी १९४८ रोजीं जातीय विद्वेष शमविण्यासाठीं गांधीजींची आहुति पडली. सारा देश जणूं वेडावून गेला. ज्या वेळीं त्यांच्या आधाराची निकड त्याच वेळीं राष्ट्रपिता गेला. राज्याचें स्वराज्यांत रूपांतर करण्याचें कार्य कोण करणार ? सारे असहाय, हीनदीन झाले, लोकांना आपला मार्गदर्शक प्रकाश गेल्यासारखें वाटलें. दीनदलितांचा सखा गेला. वर्ध्यांत गांधीजींच्या वेगवेगळ्या संस्था. तेथील शोकाला तर पारावार नव्हता. पण विनोबांनीं खंबीरपणें दुःख आवरलें. सर्व सेवकांचें सांत्वन केलें. १३ दिवस त्यांचीं रोज प्रवचनें झालीं. गांधीजींच्या जीवनाचें रहस्य त्यांनीं विशद करून सांगितलें व त्यांचीं मुलें म्हणविणाऱ्यांवर येणाऱ्या जबाबदारीचें भान करून दिलें.

• • •

स्वातंत्र्य मिळाल्यानें एक प्रकारची तृप्तीची भावना लोकांत पसरली. स्वातंत्र्य मिळालें; आतां सरकार सर्व करीलच, आपल्याला आतां कांहीं करण्याची गरज नाहीं अशी परावलंबी वृत्ति लोकांत पसरूं लागली. विधायक कार्यांतला उत्साह व तेजहि नाहींसें झालें. हा निरुत्साह घालवून विधायक कार्यकर्त्यांत उत्साह आणण्यासाठींच गांधीजींनीं विधायक कार्यकर्त्यांची परिषद योजली होती.

ही परिषद पुढें मार्चमध्यें झाली. श्री. जवाहरलाल, जयप्रकाश व इतर थोर नेते आणि देशांतील सर्व विधायक कार्यकर्ते एकत्र जमले. विधायक कार्यांत नवा प्राण ओतण्यासाठीं काय योजना करावी, याची चर्चा झाली. संस्था काढावी, गांधीजींच्या नांवें चालवावी असें कांहीं लोकांनीं सांगितलें. विनोबाजी तर सर्व संस्थांतून बाहेर पडलेले. आहेत त्या संस्थांची काय स्थिति आहे तें सर्वांना दिसत होतें. परंतु संस्था स्थापणें, संघटना करणें ह्या चाकोरीबाहेर कोणी पडूं शकत नव्हतें. गांधींच्या नांवाचा मोह सोडण्यालाहि कोणी तयार नव्हतें. संस्था आली कीं पदाधिकारी, निवडणुकी, गटबाजी, शिस्तभंग या गोष्टी सुरू होतात व बाह्यतः संस्था–उभारणीचें कार्य चालतांना दिसत असलें तरी मानसिक संकुचितपणा व स्पर्धा निर्माण होत असतात.

विनोबांनीं मोकळ्या संघटनेची एक अभिनव कल्पना संमेलनांत मांडली. गांधींचें नांव वापरण्यालाहि ते अनुकूल नव्हते. ते म्हणाले : "गांधीजींचे सिद्धान्त म्हणून ज्यांना म्हणतात ते आले तरी कुठून? ते काय त्यांच्या बापदादांचे होते? ते तर आत्म्याचे सिद्धान्त आहेत. तोच आत्मा आपल्या ठायीं असल्यानें ते सिद्धान्त आपणां सर्वांचे आहेत. आपण सत्याचा आग्रह ठेवूं तो काय गांधीजी सांगत होते म्हणून? सिद्धान्त व्यक्तीपेक्षां मोठे असतात. त्यामुळें त्यांचें आचरण करून व्यक्तीला प्रतिष्ठा येते. जो विचार मी आत्मसात् केला तो माझाच झाला. घर माझें, संपत्ति माझी आणि सिद्धान्त कोणाचे तर म्हणे गांधीजींचे. हें कसें? गांधीजींचे कांहीं सिद्धान्त असते तर ते मृत्यूनंतर घेऊन गेले असते. सिद्धान्त गांधीजींचे नाहींत. ते गांधीजींच्या द्वारें प्रकट झाले. त्यांना मी जेव्हां ग्रहण करतों तेव्हां ते माझेच होतात. ते गांधींच्या नांवानें लोकांपुढें ठेवण्याची गरज नाहीं."

परिषदेंत विनोबांनीं सर्वोदय समाज या नांवानें मुक्त संघटना उभी करावी असें प्रतिपादन केलें. निवडणुकी, शिस्त, सभासदत्व, वर्गणी वगैरे भानगडी त्यांनीं ठेवल्या नाहींत. जो कोणी साधनशुद्धि मानीत असेल तो या समाजाचा सभासद. वर्षांतून एकदां सर्वोदय संमेलन भरवावें व त्यांचीं आमंत्रणें व सूचना ज्यांना मिळाव्या असें वाटत असेल त्यांनीं पत्रानें आपलीं नांवें नोंदवावीं असें ठरविण्यांत आलें. पण त्याचबरोबर विधायक कार्य करणाऱ्या सर्व संस्थांनीं शक्ति एकवटून समग्र सेवेचें कार्य चालवावें;यासाठीं 'सर्व सेवा संघ' या नांवाची एक संस्थाहि स्थापण्यांत आली. सर्वोदय समाजाचा सर्व मोकळा कारभार तर सर्व सेवा संघ म्हणजे अंमलबजावणी करणारा कर्तव्यदक्ष सेवकांचा संघ.

• • •

देशांतील निर्वासिताचा प्रश्न, अशांतता, असंतोष ह्या गोष्टींना तोंड कसें द्यावयाचें? सरकार हें कार्य करूं शकत नव्हतें. वेगवेगळ्या राजकीय पक्षांना असंतोष असण्यांत कांहीं गैर वाटत नव्हतें. निर्वासितांच्या जातीय भावना चिथावून देशांत अशांतता माजविण्याचे मनसुबे कांहींचे चालले होते. विनोबाजींना मदतीसाठीं जवाहरलालजींनीं पाचारण केलें. विनोबा दिल्लीला गेले. अलवार, भरतपूर भागांतील लोकांच्या पुनर्वसाहतीचें काम त्यांनीं अंगावर घेतलें. तें काम सुरळीत चालू झालें व देशभर शांतियात्रेसाठीं ते निघाले.

ज्या ज्या ठिकाणीं असंतोष व विद्रोह होता तेथें नवविचारांचें सिंचन विनोबांनीं केलें. गांवोगांव प्रवचनांत ते नवविचारांचा वर्षाव करीत. " बहुजनसमाजाच्या भाग्याशीं आपलें भाग्य जोडावयाला आपण तयार झालें पाहिजे. रामराज्य हवें तर विषमता व वैर यांचा अंत झाला पाहिजे. गुलामी जाणें म्हणजे कार्याची इतिश्री नव्हे. शेतांतले तण उपटले, खडेगोटे काढून टाकले हें ठीकच झालें पण यापुढें त्यांत कांहीं पेरलें नाहीं तर काय उपयोग ? स्वातंत्र्य मिळालें. मार्गांतले अडथळे दूर झाले. आतां शोषणरहित समाजरचनेच्या कामाला उत्साहानें लागलें पाहिजे. स्वस्थ बसून चालणार नाहीं. कांहीं कार्यकर्ते सरकारजमा, कांहीं संसारजमा व कांहीं पेन्शनींत निघाले. मग नवसमाजरचना कशी होणार, कोण करणार ? " असें ते म्हणत. देशापुढील नाना प्रश्न सोडविण्याचा उपाय त्यांनीं १९४९ च्या मे महिन्यांतील एका प्रार्थना प्रवचनांत सांगितला : "ज्यांना दोन मुलें आहेत त्यांनीं आपल्याला तीन मुलें आहेत असें समजावें. हा तिसरा मुलगा म्हणजे गरीब जनता. ह्या तिसऱ्या मुलासाठीं आपण आपल्या संपत्तीचा, बुद्धीचा व वेळेचा योग्य हिस्सा दिला तर सर्व प्रश्न सुटतील. घरांत नवें मूल जन्मलें तर कोणी तक्रार करीत नाहीं, उलट आपला खर्च त्या मानानें करतात. जर आम्हीहि तसेंच केलें तर अपरिग्रहाचा चांगला आरंभ होईल. आरंभीं थोड्या लोकांना ही अपरिग्रहाची युक्ति पटली तर इतरांनाहि त्याचा स्पर्श केव्हां ना केव्हां झाल्याशिवाय राहाणार नाहीं. हिंदुस्थानला दारिद्र्य देऊन परमेश्वर त्याची कसोटी पाहात आहे. त्याच्याच कृपेनें आपण त्या कसोटीला उतरूं " असें सांगून विनोबाजी ' अपरिग्रह स्वीकारा; अन्यथा अपहार टळणार नाहीं ' अशी धोक्याची सूचना देत होते. अपरिग्रह म्हणजे सांठवून न ठेवणें. ' जो सांठवितो तो वस्तु सांठवीत नसून आपलें मरणच सांठवितो,' असें शास्त्रांनीं सांगून ठेवलें आहे.

● ● ●

शांति व रचनात्मक कार्य यांचा एक सेवक या नात्यानें विनोबांनीं देशभर यात्रा आरंभिली. हिंदुस्थानचें वातावरण शुद्ध करण्याचें कार्य त्यांनीं अंगीकारलें. ३२ वर्षें गांधींनीं दाखविलेल्या रचनात्मक कार्यांत ज्यांनीं मूकपणें काढलीं ते प्रसंगोपात्त बाहेर आले. आपल्या आयुष्याचीं अत्यंत मोलाचीं वर्षें, तारुण्याचे दिवस विनोबांनीं मूकसेवेंत घालविले, पण प्रसंग येतांच जबाबदारी घेण्यासाठीं ते पुढे सरसावले. विधायक कार्यकर्त्यांना नवी चेतना देऊं लागले : " शरीराच्या एखाद्या अवयवाला इजा झाली

तर इतर सर्व अवयव ठीकठाक असूनहि आमचें सारें लक्ष त्या दुखऱ्या भागाकडे लागतें. चांगला समाज शरीरासारखा एकजीव असला पाहिजे. समाजाचा जो दुःखी भाग असेल त्याच्याकडे सर्व समाजाचें लक्ष गेलें पाहिजे. " विनोबा अशा रीतीनें नवी दृष्टि देत फिरत होते. देशभर त्यांचा दौरा सुरूं होता.

हैद्राबाद राज्यांत पोलिस कारवाईनंतर जी अशांतता, गडबड माजली होती ती शमविण्यासाठीं विनोबाजींनीं जावें, अशी जवाहरलालजींनीं इच्छा प्रदर्शित केल्यावरून विनोबाजींनीं त्या भागांत दौरा केला. नवविचार प्रसृत केले, सर्वोदयाची दृष्टि जनतेला समजावून सांगितली. एका ठिकाणीं ते म्हणाले : " सर्वोदय व्यवस्थेंत सर्वांना समान सुख व पुरुषार्थाला समान अवसर असेल. यापुढें भक्तीचीं राज्यें येतील. भक्ति ज्ञाननिष्ठ असते, तिला दिशा असते, उलट शक्ति दिशाशून्य असते. येथील प्रजा अद्वैताच्या, प्रेमाच्या वातावरणांत वाढलेली, त्यामुळें आपलें एवढें विशाल राष्ट्र राहूं शकलें. मोठी वृत्ति असेल तर मोठे व्हाल, क्षुद्र वृत्ति ठेवाल तर जीवनहि क्षुद्र बनेल. विविध विचार समाजांत प्रसृत व्हावेत, पण आचार सर्वमान्य तत्त्वांचाच व्हावा. असें वागलों तर दुफळी माजणार नाहीं. विविधता हें वैभव आहे. ' नाना धर्माणम् पृथ्वित्र विवाजसम् ' अनेक धर्म व वाणी ही पृथ्वीची शोभा आहे. "

श्रमाची महति सांगतांना दुसऱ्या एका ठिकाणीं त्यांनीं सांगितलें : " लोक परिश्रमांचा तिरस्कार करूं लागले म्हणून रोमच्या साम्राज्याचें पतन झालें. काम करणाऱ्यांना आपण हीन समजलों, परिश्रम न करणारे उच्च म्हणून मिरवूं लागले त्यामुळें आपल्या देशाची अधोगति झाली. ' उत्पादनवाढ झाली पाहिजे ' अशा घोषणा करून उत्पादनवाढ होणार नाहीं. प्रत्येकानें नित्य कांहीं तरी उत्पादक परिश्रम केले तरच उत्पादन वाढूं शकेल. "

साहित्याबद्दल विवेचन करतांना ते म्हणाले : " स वाग्विसर्गो जनताघविप्लवः— जनतेचें पापताप निवारण करील तें खरें साहित्य. त्यासाठीं साहित्यिकांत दीनजनांचा कळवळा असला पाहिजे; शील हीच शैली व सत्य हेंच साहित्य अशी लेखकांची वृत्ति पाहिजे. "

इतिहासाची रूपरेखा त्यांनीं एका ठिकाणीं मांडली : " जग हें संकल्परूप आहे. त्या त्या काळांत विशिष्ट लाटा उठतात व त्यांच्यावर समाज हेलावत असतो. जगभर तेंच दर्शन घडतें. हजार हजार वर्षांची एकेक लाट असते. जगांतील बहुतेक सर्व धर्मसंस्थापक

एक हजार वर्षांच्या लाटेंत झालेले दिसतील. नंतर संतांची लाट येते. या जागतिक लाटा, हे संकल्प ओळखून त्याप्रमाणें आपण आपली गति ठेवली पाहिजे. आतां साम्ययोगाची लाट आली आहे. साऱ्या जगभर या ना त्या स्वरूपांत ती दृग्गोचर होत आहे. ह्या साम्ययोगी लाटेशीं अविरोधी असा आपण जीवनक्रम ठेवला पाहिजे. प्रत्येक कामांतून समानता निर्माण होत आहे ना, हें आपण दक्षतेनें पाहिलें पाहिजे. साम्ययोगाचा एक भाग म्हणून सर्वांनीं नित्य उत्पादक शरीरश्रम केले पाहिजेत. ”

श्रमिकांच्या राज्याबद्दलची आपली कल्पना विशद करतांना त्यांनीं सांगितलें : “ आज श्रीमंतांचा मत्सर म्हणजे गरिबांचें सुख, असें झालें आहे. त्या श्रीमंतांचा मत्सर करण्यासारखें त्यांच्याजवळ आहे तरी काय ? त्यांना धड अन्न पचत नाहीं, खरें प्रेम मिळत नाहीं. ही का हेवा करण्यासारखी स्थिति आहे ? श्रीमंतांनींच गरिबांचा मत्सर करावा अशी खरी स्थिति असते. गरिबांना मोकळी हवा मिळते, दगडावर पडलें तरी गाढ झोप येते. श्रीमंतांना श्रमिकांचा हेवा वाटावा असें केलें पाहिजे. श्रीमंतांना शरीरश्रम करण्यांत आनंद वाटला पाहिजे. श्रीमंतांचें कांहीं काढून घ्यायचें आहे असें नाहीं. आहेच काय तसें त्यांच्याजवळ ? थोडेसे रंगीबेरंगी कागद, दगड आणि पिस्तुलें. किसान मोहोर रोखल्यावर, पिस्तुल रोखल्यावर का देतो वस्तु ? कारण त्याला आ .त्या गरजेच्या वस्तु बाहेरून खरेदी कराव्या लागतात. आपल्या गरजा अगोदर त्यानें भागवाव्या व उरलें तर आपल्या इच्छेप्रमाणें किंमत घेऊन दुसऱ्यांना द्यावें. दूध खाऊन उरलें तर विकावें. पण पैशाला तो बळी पडतो. पैसा हा लबाड कारभारी आहे. त्याचें उच्चाटन केलें, गांवांच्या प्राथमिक गरजा गांवांतच भागवल्या, कच्चा माल जागींच पक्का करून अधिक असलेला बाहेर पाठवला, तर आजचे गरीब श्रीमंत आहेत असें आढळेल व श्रीमंताना लाचार बनून याचना करावी लागेल. ज्यांच्याजवळ वस्तु उत्पादन करण्याची शक्ति ते खरे श्रीमंत अशी स्थिति निर्माण करावयाची तर लबाड कारभारी पैसा आपण काढून टाकला पाहिजे. ”

‘ मजुरांचें राज्य म्हणजे मजुरांच्या नांवानें चालणारें राज्य ’ असें आज कार्यकर्ते म्हणविणारांच्या जीवनाकडे पाहिलें म्हणजे वाटूं लागतें. पण मजुरांचें राज्य म्हणजे मजुरीला, श्रमाला प्रतिष्ठा आणून देणें. जोंपर्यंत उत्पादक श्रमांचा तिरस्कार केला जात आहे, लहान मोठे सर्व त्या कामांत हात लावीत नाहींत तोंपर्यंत उत्पादनवाढीनेंहि प्रश्न सुटणार नाहीं. विनोबा म्हणतात : “ शरीराला श्रमवा पण उत्पादन होऊं देऊं नका असें आज

चाललें आहे. कुदळीनें खणाल, विहिरींतून पाणी काढून झाडांना घालाल तर उत्पादनहि साधेल व व्यायामहि होईल. पण आपल्या श्रमांतून उत्पादन झालें तर आपण मजूर ठरूं अशी लोकांना भीति वाटते. उद्यां चक्की फिरविण्यानें उत्कृष्ट व्यायाम घडतो असें पाश्चिमात्यांनीं सांगितलें तर येथें व्यायामशाळांतून चक्क्या बसवतील. पण त्यांत दाणे घातले तर ती फॅक्टरी होईल व आपण मजूर ठरूं अशी भीति वाटून व्यायामप्रेमी रिकामीं जातीं फिरवतील ! मजुरीबद्दल जोंपर्यंत अशी तिरस्काराची भावना आहे तोंपर्यंत समाजांत शांतता नांदणार नाहीं. कांहीं चाकू अति श्रमानें झिजत आहेत, कांहीं अति रिकामेपणानें गंजत आहेत. दोहोंचा क्षय चालू आहे. एकाला पोटभर खायला मिळत नाहीं, दुसऱ्याला खाल्लेलें पचत नाहीं. भगवंतानें सर्वांना एक तोंड दिलें व दोन हातहि दिलेले आहेत. कांहींनीं खावें व कांहींनीं कष्टावें अशी त्याची योजना असती तर त्यानें समाजांत राहू–केतू निर्माण केले असते. तरुणांना जर क्रांति हवी असेल तर त्यांनीं कामाला लागावें. उत्पादक परिश्रम केल्याशिवाय मजुरांचें राज्य अशक्य आहे. साम्ययोग हा या युगाचा संदेश आहे. सर्वांनीं उत्पादक परिश्रम करून साम्ययोगाच्या प्रस्थापनेंत भाग घ्यावा. ”

शिक्षणासंबंधींहि क्रांतिकारक विचार विनोबाजी जागजागीं मांडत : “ राष्ट्र स्वतंत्र होतांच जुना झेंडा सारून नवा झेंडा लावला. मग गुलामीच्या बेड्या बळकट करणारी, जीवनपराङ्मुख अशी तीच पुराणी शिक्षणपद्धति कशाला कायम ठेवली आहे ? आजचें शिक्षण वर्ष दोन वर्षें बंद पडलें तरी मला चालेल. कांहीं न शिकतांच मी शिकलों असा अहंकार ह्या शाळा निर्माण करतात. मुलें वयाची पंचविशी होईपर्यंत शिकतच असतात, मग पुरुषार्थ केव्हां करणार ? १६ वर्षांचा जनकोजी अहमदशहाचा मुकाबला करीत होता. भाऊसाहेब पेशवे चौदा वर्षांचे, पण युद्धांत जात होते. ज्ञानेश्वरांनीं सोळाव्या वर्षीं ज्ञानेश्वरी लिहिली. मुलगा १६ वर्षांचा झाला कीं त्याच्याशीं मित्राप्रमाणें वागावें असें मनु म्हणतो. मित्राला काय रोजच्या रोज आपण फुकट खायला घालतों ? आपल्या पिलांनीं लवकर उडावयाला लागून स्वावलंबी व्हावें म्हणून पक्षी प्रयत्न करतात तर वयाची पंचविशी गांठीपर्यंत मुलगा बापावरच अवलंबून असतो. असली ही लाचार शिक्षणपद्धति बंद झाली आणि मुलें उद्योग करूं लागलीं तरी चालेल. ”

कार्यकर्त्यांतील शैथिल्य दूर करीत नवविचार देत त्यांचा दौरा देशभर चालू होता. देशाची नाडी ते समजावून घेत होते. काळाची हांक ऐकण्याचा जणूं त्यांचा प्रयत्न

चालला होता. पुणें-मुंबईकडेहि त्यांचा प्रवास झाला. पुण्याला एस्. पी. कॉलेजमध्यें त्यांचें प्रवचन झालें. महाराष्ट्रीय जीवनाचें अचूक निदान त्यांनीं केलें. " पूर्वजांच्या कमाईवर नेहमींच जगणें शोभत नाहीं. पुण्याइतक्या त्यागबुद्धीनें चालविलेल्या सार्वजनिक संस्था देशांत फार कमी आहेत. पण हीच एक कांहीं समाधानाची गोष्ट होऊं शकत नाहीं. इतका त्याग असून पुण्याचें-महाराष्ट्राचें तेज कां दिसत नाहीं? कारण ज्या दृष्टीची आवश्यकता आहे, ती दृष्टि नाहीं ! योग्य दृष्टीच्या अभावीं पराक्रमशीलता, पराक्रमशून्यता ठरत आहे. ज्ञानदेवांनीं यालाच आंधळ्या गरुडाची शक्ति म्हटलें आहे. सम्यक् ज्ञान आणि सम्यक् दृष्टि यांच्यावांचून पराक्रम, अपराक्रम किंवा कुपराक्रम ठरेल. "

महाराष्ट्राची जीवनांत पीछेहाट होत आहे असें दिसतें. लोकमान्यांनंतर भारतीय प्रतिष्ठेचा कोणी नेता महाराष्ट्रांत झाला नाहीं. महाराष्ट्रानें याचा गंभीरपणें विचार केला पाहिजे. महाराष्ट्राच्या प्रकृतींत जे त्रिदोष आहेत त्यांचा निरास झाला पाहिजे, तरच महाराष्ट्रांत भारतीय कीर्तीचीं माणसें निर्माण होऊं शकतील, असें विनोबाजी सांगतात. महाराष्ट्रांतील त्रिदोष असे : ( १ ) खोल रुजलेला जातिवाद ( २ ) हिंसेचें समर्थन व तरफदारी करणारें हाडीमाशीं खिळलेलें तत्त्वज्ञान ( ३ ) इतिहासाचा वृथा अभिमान. यांच्यांतच भरीला भर म्हणजे न्यूनगंडाची भावना. ह्या सर्वांचा परिपाक म्हणजे संकुचित वृत्तीचा मनावरील प्रभाव. महाराष्ट्रानें हे त्रिदोष घालविल्याखेरीज महाराष्ट्राला डोकें वर काढतां येणार नाहीं असें त्यांना वाटतें. एकदां ते म्हणाले होते : " आम्हांला आमच्या मायबापांची ओळख नाहीं. ज्ञानेश्वरांचा, तुकारामांचा हा देश. ' जाळीन मी भेद, येथें प्रमाण तो वेद, ' असें गर्जून सांगणाऱ्यांचे आम्ही वारस. पण हा वारसा आपण विसरलों. भेदांचा बुजबुजाट झाला. त्यांतून बाहेर पडलों तर शत मार्गांनीं आपली प्रगति होईल. " महाराष्ट्रांतील हे प्रमुख दोष नाहींसे व्हावे याची त्यांना तळमळ आहे. या कामीं आपलें जें साह्य महाराष्ट्राला होण्यासारखें आहे तें देण्याला ते उत्सुक आहेत. अखिल भारतीय प्रतिष्ठेचीं माणसें निर्माण करण्याचा या देशांत सर्वत्र जाणीवपूर्वक प्रयत्न झाला पाहिजे. जवाहरलाल–जयप्रकाश यांच्याशिवाय दुसरीं अशीं माणसें देशांत नाहींत, याची त्यांना खंत वाटते. देशाला हा फार मोठा धोका आहे, असें त्यांचें मत आहे.

★ ★ ★

# साम्ययोगाचा ध्यास

देशभर नवविचार फैलावीत ही शांतियात्रा चालू असतांनाच विनोबांची प्रकृति बिघडली. आंतड्याला सूज आली. विनोबा विश्रांती घेण्यासाठीं पौनारला आश्रमांत आले. ' रामनाम ' चिकित्सा व आहारांत योग्य फेरफार असा क्रम त्यांनीं ठेवला. याच काळांत रामनामासंबंधीं गांधीजींच्या विचारांचें संकलन असलेलें एक पुस्तक विनोबांच्या हातीं आल. चिंतनाला योग्य असा विषय विनोबांना सांपडला. त्यांनीं रामनामासंबंधींचें आपलें चिंतन लिहून काढलें. रामनामासंबंधीं शास्त्रशुद्ध चिकित्सा त्यांत आहे. बुद्धिवाद्यांनींहि एकदां अभ्यासावें असें तें विवेचन आहे. अंधश्रद्धाळु लोकांनाहि आपली निष्ठा तपासण्याच्या दृष्टीनें तें उपयोगी पडेल.

रामनामामुळें माणूस निर्भय बनला पाहिजे. त्याचे विकार शमले पाहिजेत. रामनाम जपणाऱ्याची जीवनचर्याहि त्याच्या निष्ठेला साजेशी असली पाहिजे. अशी जीवनचर्या असेल तर रामभक्ताला कधीं रोगहि होतां कामा नये. रामभक्ताची जीवनचर्या कशी असावी, तें विनोबाजींनीं सांगितलें आहे.

१—सर्वदा स्वच्छ, शुद्ध, युक्त आणि मित आहार आणि विशेष प्रसंगीं अल्पाहार व निराहार.

२—देह, वाणी व मन यांची शुद्धि व आसपासच्या सर्व वातावरणाची स्वच्छता.

३—निसर्गावर प्रेम व त्याचें उन्मुक्त सेवन.

४—योग्य परिश्रम व विश्रांती यांची व्यवस्था.

५—स्वतःला देहभिन्न समजणें, प्राणिमात्रांच्या सेवेंत लागणें व विशुद्ध चित्तानें परमेश्वराचें निरंतर स्मरण करणें.

ह्या जीवनचर्येलाच ब्रह्मचर्य म्हणतात व हाच रामनामाचा उपचार आहे. अशा प्रकारची जीवनचर्या राखणारे रामसेवक निघतील तेव्हां रामनामांत पुन्हां सामर्थ्य येईल.

नामजपाला महत्त्व आहे. परंतु 'असेल माझा हरि, तर देईल खाटल्यावरीं' ही वृत्ति उपयोगाची नाहीं. ज्यानें आपल्याजवळच्या सर्व शक्ति मनःपूर्वक कामांत लावल्या त्यालाच आणखी शक्तीसाठीं ईश्वराची करुणा भाकण्याचा अधिकार प्राप्त होतो. आपल्याजवळ असलेली शक्ति न वापरतां परमेश्वराचा धावा करणें हीहि एक प्रकारची अश्रद्धाच आहे. एकाद्या धनी बापानें मुलाला धंद्यासाठीं दिलेलें भांडवल तो न वापरूं लागला तर त्याला आणखी पैसा देण्याची प्रेरणा बापाला कशी होणार? ईश्वरदत्त सर्व शक्ति वापरून आणखी शक्तीची आवश्यकता एखाद्या भक्तानें सिद्ध केली तर ती शक्ति मिळण्याचा विश्वास वाटणें, यालाच खरी श्रद्धा म्हणतात. स्वतःची शक्ति न वापरणें ही भक्ति नव्हे.

आपल्या देशांतील भक्तिमार्गांत जे तीन दोष शिरले आहेत व ज्यामुळें रामनामाला ओंगळ स्वरूप आलें आहे तेहि विनोबांनीं दाखविले आहेत. पहिला दोष सकामता, ह्या दोषामुळें देवाशीं सौदेबाजी करणारे नवस-सायासादि प्रकार सुरूं होतात. दुसरा दोष मूढ विश्वास, ह्यामुळें धर्मांत ढोंगीपणा शिरतो. तिसरा दोष मौखिकता, यांत आपलें जीवन तसेंच राखून नामजपांत वेळ दवडण्यांतच सार्थकता मानली जाते. रामनामा-संबंधींचें हें विवेचन फार सुंदर आहे.

जें रामनामाचें तेंच प्रार्थनेचें. प्रार्थनेंतहि हे तीन दोष दाखल होतात. प्रार्थनेंत जडता येऊं नये व नित्य नवीन उत्साह प्रतीत व्हावा अशा तऱ्हेचे बदल विनोबांनीं वेळोवेळीं आपल्या प्रार्थनेंत केलेले आहेत. त्यांनीं या काळांत प्रार्थनेबरोबरच सूतकताई सुरूं केली, प्रार्थनेंत ईशस्तुति, आत्मनिरीक्षण ह्या गोष्टी पूर्वीं होत्या आतां त्यांच्यांशीं कर्म जोडण्यांत आलें. प्रार्थना कर्ममय होऊं लागली. विनोबांविषयीं महादेवभाईंनीं लिहून ठेवलेलें किती समर्पक आहे तें अशा प्रसंगांतून विशेषच प्रतीत होतें. ते म्हणतात : "योगः कर्मसु कौशलम्"—या अर्थानें विनोबा खरेखुरे योगी आहेत. त्यांचे विचार, वाणी व आचार यांत जशी एकतानता आहे तशी फारच थोड्या लोकांत पाहायला मिळते. यामुळें त्यांचें जीवन



हें एक मधुर संगीत आहे असें वाटतें. 'संचार करो सकल कर्मे शांत तोमार छंद-माझ्या सर्व कर्मांतून देवा, तुझेंच रूप प्रकट होऊं दे ' ही रवींद्रांनीं लिहिलेली प्रार्थना करूनच विनोबा जन्माला आले असावेत."

• • •

स्वातंत्र्योत्तर काळांत आश्रमादि संस्थांचें तेज वाढवावयाचें तर बुरसटपणा टाकून नवा क्रांतिकारी कार्यक्रम हातीं घेतला पाहिजे. लोकांकडून देणग्या जमवून आश्रमांचे संसार चालविण्यांत एक प्रकारची लाचारी आहे, असें विनोबांना वाटत होतें. गांधी स्मारक निधि हा पैशांत जमविलेला अखेरचा राष्ट्रीय निधि ठरावा अशी त्यांची इच्छा होती. त्या दृष्टीनें लोकांना अप्रिय वाटणारें पण समाजाच्या निकोप वाढीसाठीं आवश्यक असे विचार ते निर्भीडपणें मांडीत होते. त्यांचे हे क्रांतिकारी विचार अव्यवहारी व विक्षिप्त म्हणूनहि त्यांची संभावना क्वचित् होत होती.

ग्रामीण जनतेचा उद्धार करावयाचा तर त्यांना जी सक्तीची अर्धबेकारी भोगावी लागते ती नाहींशी झाली पाहिजे. शेतीच्या लहानशा तुकड्यांतूनहि भरपूर कष्ट करून पुरेसें उत्पन्न काढतां येतें व लहान जमिनीहि परवडतात हें दाखवून दिलें पाहिजे. साम्य-योगाच्या प्रस्थापनेसाठीं नाण्यांचा वापर कमींत कमी करणें आवश्यक आहे, ही गोष्ट त्यांना चिंतनांतून उमगली होती. पण प्रयोग करून सिद्ध केल्याशिवाय सामाजिक दृष्टीनें त्याचा उपयोग काय? म्हणून विनोबाजींनीं फिरणें बंद करून ह्या प्रयोगांतच लागावयाचें ठरविलें : "सार्वजनिक संस्थाहि अपरिग्रही व्हाव्या, पैशाचा छेद व्हावा व या प्रयोगांत देह समर्पण व्हावा असें वाटतें. यशच घ्यायचें : सदेह किंवा विदेह. त्यासाठीं जीवनांत बदल करण्याची गरज आहे. आज देशभर जें होत आहे त्याबद्दल लेशहि संतोष नाहीं, पण प्रकाशानेंच अंधार दूर होतो म्हणून अंधार असल्याचा ओरडा करीत बसत नाहीं, प्रकाशाची उपासना करतों" असें म्हणून त्यांनीं आश्रमाला एक नवी दिशा लावून दिली.

विनोबाजींनीं जमिनीचा हिशेब असा बसविला होता : मांसाहारी दीड एकर जमिनीचें उत्पन्न खातों, दूध वापरणारा अन्नाहारी पाऊण एकर व बिनदूधवाला अन्नाहारी अर्ध्या एकरांत आपलें भागवील. हिंदुस्थानांत ३० कोटी लोक आहेत व ३२ कोटी एकर जमीन लागवडीखालीं आहे, तेव्हां येथें नव्या पद्धतीनें शेती केली तर देशांतील सर्वांत बिकट असलेला अन्नप्रश्न सुटूं शकेल, अशा निर्णयावर विनोबा पोंचले होते. वर्षभराच्या चिंतनानंतर त्यांनीं १ डिसेंबर १९४९ रोजीं साम्ययोगी समाजनिर्मितीचा श्रीगणेशा केला. १९५० च्या जानेवारीपासून बाहेरून भाजी आणावयाची नाहीं असा आश्रमवासीयांनीं निश्चय केला. केवळ एक महिन्याचाच अवधि होता. शिवाय विनोबांचा आग्रह असा होता कीं, आपण कसें तरी जगायचें नाहीं, हाल काढायचे नाहींत. सर्व जगांतल्या उत्कृष्ट भाज्या आपल्या येथें झाल्या पाहिजेत. जें राजाला मिळत नाहीं तें कांचनमुक्तीनें रंकाला लाभलें पाहिजे.

सर्व आश्रमीय मंडळी शेतींत राबूं लागली. विनोबाहि रोज कुदळ घेऊन श्रम करूं लागले. सर्वस्वीं माणसांच्या हातीं मशागत करून जमिनी पिकविण्याचें ठरविलें. ह्या हातशेतीला त्यांनीं 'ऋषि शेती' हें नांव दिलें. अगदीं प्राचीन काळीं, ऋषिमुनी याच पद्धतीनें शेती करीत असत, म्हणून हें अन्वर्थक नांव.

हिंदुस्थानांतील बहुसंख्य जनता खेड्यांत राहते, आणि शेती हाच त्यांचा मुख्य व्यवसाय आहे. तेव्हां हिंदुस्थानचा गरिबीचा प्रश्न सुटावयाचा तर प्रथम शेती सुधारली पाहिजे. त्यासाठीं विनोबांनीं शेतींत चार भाग पाडून प्रयोग सुरू केले.

१—ऋषि शेती : शेतीच्या सर्व क्रिया हातांनीं.

२—बैल शेती : बैलांची मदत घेऊन धान्यादि पिकविणें.

३—दूधवाडी : विहिरीवर पाणी काढण्यासाठीं यंत्र बसवून जनावरांच्या चाऱ्याची व्यवस्था आणि ऊंस व केळीं यांचें उत्पादन.

४—बगीचा : औषधी व इतर वनस्पतींची निपज.

आश्रमीय मंडळींना शेतीचें एकहि काम सुरुवातीला येत नव्हतें. परंतु नेटानें सर्व कामाला लागले.

शिक्षितांना मजूर व मजुरांना शिक्षित बनविण्याचा हा साम्ययोगी प्रयोग होता. साधनविहीन, अल्प जमीन असलेल्या किसानाला या प्रयोगांतून दिलासा मिळेल अशी विनोबांना खात्री वाटत होती. अन्नस्वावलंबन, वस्त्रस्वावलंबन, शिक्षण व आरोग्य-स्वावलंबन, ८ तास मजुरी, सर्व क्रियांची समान मजुरी व समान वेतन आणि सामूहिक रसोई असा हा साम्ययोगी समाजाचा कार्यक्रम होता.

● ● ●

त्या वर्षीं सव्वा एकर जमिनींत रोज ४ घंटे याप्रमाणें २८५ दिवस काम करण्यांत आलें. बाजारभावानें खर्चवजा २८५ रुपये उत्पन्न आलें. या हिशेबानें ताशीं ४ आणे मजुरी पडली. आसपास पुरुषाला १३ आणे व स्त्रीला ७ आणे असा रोजगाराचा दर होता. म्हणजे सरासरी माणशीं ८ तासांचे १० आणे पडतात. म्हणजे दर ताशीं १। आणा मजुरी पडते. मालक व मजूर दोन्ही आश्रमीयच असल्यानें त्यांना चालू दराच्या तिप्पट मजुरी पडली; पण जर तसें नसतें तर निदान दुप्पट तरी मजुरी झाली असती.

ज्या जमिनींत शेती करण्यांत आली ती जमीन तिसऱ्या दर्जाची, काम करणारे नवखे, केवळ भावनेच्या बळावर त्यांनीं काम केलेलें. जर शेतीला पाण्याची सोय झाली तर ऋषि–शेती अधिक यशस्वी होईल. जमिनीचे लहान तुकडे परवडत नाहींत हा आरोपहि निःशेष ठरेल.

या प्रयोगांतून सरळ असा निष्कर्ष निघतो कीं जमिनीची मालकी जर कसणाराकडे असेल व तो पूर्ण शक्ति लावून मेहनत करील तर आजच्यापेक्षां तिप्पट उत्पादन करूं शकेल, आज मजुराला एक तास राबल्यानें सव्वा आणा प्राप्ति होते, पण जर स्वतःच्या मालकीच्या जमिनीवर तो मन लावून मेहनत करील तर त्यालाताशीं चार आणे मजुरी पडेल. मालकी हक्काच्या बदलानें व इंटेन्सिव्ह पद्धतीनें शेती केल्यानें शेतींत श्रम करणारांची प्राप्ति तिप्पट होऊं शकेल.

कोट्यवधि रुपये खर्च करून वर्षेंच्या वर्षें खटपट करून ज्या योजना आंखण्यांत येतात त्यांच्या साहाय्यानेंहि एवढी वाढ ग्रामीण उत्पन्नांत घडवून आणणें आटोक्यांतलें मानलें जात नाहीं. वित्तच्छेदनाच्या भावनेंतून झालेला परंधामचा हा साम्ययोगी प्रयोग ह्या दृष्टीनें फार महत्त्वाचा आहे. ही संभाव्य परिणामकारकता ध्यानांत घेऊनच 'कार्यं वा साधयेत् देहं वा पातयेत्' या निष्ठेनें विनोबा या कामांत रमून गेले होते.

• • •

देशांतील तरुणांना आपल्याकडे सतत आकर्षून घेण्याचें फार थोड्या रचनात्मक कार्यकर्त्यांना साधतें. विनोबाजींचें हें वैशिष्ट्य म्हणून सांगतां येईल कीं तरुणांनीं आकर्षित व्हावें असें भव्य काम नेहमीं त्यांच्या हातीं असतें. साम्ययोगी समाजनिर्मितीच्या ह्या प्रयोगाला आरंभ केल्यापासून विनोबांच्यामध्येंहि एक नवी स्फूर्ति जाणवूं लागली. त्यांचा उत्साह नित्य वाढतांना दिसूं लागला. आहाराचे, शेतीचे, खताचे नित्य नवे प्रयोग सुरूं झाले. त्यांच्या प्रतिभेची पौर्णिमा होत आहे, असें जाणवूं लागलें. सायंकाळची प्रार्थनाहि आतां पाणी काढायच्या रहाटावर होऊं लागली. अठरा आऱ्यांना भिडून पाण्याच्या प्रवाहाबरोबर नामसंकीर्तनाचा प्रवाह वाहूं लागला. कर्मांत भक्ति व भक्तींत कर्म साकारूं लागलें. विनोबांच्याकडे येणारे लहानथोर लोक रहाटाला खांदा भिडवूं लागले. "विनोबांच्या बरोबर रहाट ओढतांना रहाटाच्या आऱ्यांबरोबर माझें विचारचक्रहि तीव्र गतीनें फिरूं लागलें" असें जयप्रकाशजी म्हणाले.

तुकडोजी महाराजांनींहि ह्या श्रमउपासनेंत भाग घेतला. पैशाच्या स्वरूपांत आश्रमासाठीं दान घेणें बंद झालें. लोक श्रमदानाला येऊं लागले. कर्मकुसुमांची ओंजळ वहाण्याला लोक येत. श्रमदानांतून विहीर खोदण्यासाठीं वापियज्ञ सुरूं झाला. आसपासच्या गांवांतील मुलें व शिक्षक आपल्या भाकरी बांधून सुट्टीच्या दिवशीं येत व श्रमदान करून जात. विधायक कार्य करणाऱ्या संस्थांतील सेवकहि येऊन जात.

सार्वजनिक संस्थांना पैशापायीं जी लाचारी पत्करावी लागते, प्रसंगीं तत्त्वाला मुरड घालावी लागते त्यावर हा तोडगा होता. स्वातंत्र्यकाळांत सार्वजनिक कार्य करणाऱ्या संस्थांना तेजस्वी करण्याचा हा मार्ग होता. इतर संस्थांनाहि विनोबाजींनीं हाच सल्ला दिला. सेवाग्रामच्या गांधीजींच्या आश्रमांतील कार्यकर्त्यांपुढें त्यांनीं आपले विचार मांडले : " सर्वांनीं आतां मजूर व्हावें. आश्रमांत तरी निदान मजूर व आश्रमीय असा भेदाभेद नसावा. स्वातंत्र्योत्तर काळांत पैशांचें दान अशा संस्थांनीं स्वीकारूं नये. गांधी स्मारक निधि हा पैशांत जमविलेला शेवटचा निधि ठरावा " असें विनोबांनीं सांगितलें. " जर आज गांधीजी असते व त्यांनीं पैशांत दान स्वीकारून आश्रम चालविला असता, तर आपली उपयोगिता ते गमावून बसले असते. परंतु नित्य विकासशील गांधींनीं स्वातंत्र्योत्तर काळांत तसलें दान स्वीकारलें नसतें असें मला वाटतें " असें ते म्हणाले. आश्रमांत जो माल जरूरीपेक्षां अधिक निर्माण होईल तो विधायक संस्थांनीं एकमेकांना द्यावा; पण विकूं नये असें वळण लावण्याचा त्यांनीं प्रयत्न केला.

• • •

जागतिक शांततावाद्याची एक परिषद १९४९ च्या डिसेंबरमध्यें शांतिनिकेतनमध्यें भरली होती. प्रकृतीच्या कारणास्तव विनोबाजी तेथें जाऊं शकले नाहींत. त्यांनीं संदेश पाठविला होता: " आम्ही राज्यांपासून फारशी आशा ठेवतां कामा नये. याचा अर्थ त्यांना विश्वशांति नकोच आहे असा नाहीं. परंतु तीं सारीं एका कुचक्रांत सांपडलीं आहेत. तीं एकमेकांना भितात आणि एकमेकांशीं लढतात. राज्यकर्त्यांच्या मागें लागून त्यांना पटविण्यांत शक्ति खर्च करण्याऐवजीं आपण सर्वसामान्य जनतेंत गेलें पाहिजे व त्यांनाच शांततेची महति पटविली पाहिजे. किसान–मजुरांकडे, विद्यार्थी–शिक्षकांकडे, शास्त्रज्ञांकडे जाऊन त्यांना आम्ही अहिंसा पटविली पाहिजे. शेवटीं हत्यारें तर मजूरच बनवतात, शास्त्रज्ञ त्यांस मदत करतात, शिक्षक–विद्यार्थी त्याचें समर्थन करतात आणि भोळी जनता यांतच आपलें हित आहे असें मानतें. ह्या सर्वांशीं आम्ही प्रत्यक्ष संबंध जोडला पाहिजे आणि सेवेंतूनच हें होऊं शकतें. सेवेच्या जोडीला जर आम्ही जीवनाची शुद्धि करीत राहिलों तर ईश्वरी प्रकाशाचे आम्हीं वाहक बनूं शकूं. काम तर तोच करणार आहे, आम्ही त्याच्या हातीं निमित्तमात्र, औजार म्हणून. परंतु त्याच्या हातचें औजार बनायचें म्हणजे पूर्ण निरहंकार आम्हांला बनलें पाहिजे. स्वतःला शून्यवत् केलें पाहिजे. आजच्या युगांत संघटनेला फार महत्त्व दिलें जातें; परंतु अहिंसेचा प्रकाश केवळ संघटना उभारून निर्माण होणार नाहीं, तो जीवनशुद्धींतून निर्माण होईल आणि एकदां तो निर्माण झाल्यावर

आपल्या अंत:शक्तीनें कामहि करून जाईल." जगांतले हे शांततावादी शांतिनिकेतनमधील परिषदेनंतर सेवाग्रामला महात्माजींच्या कुटींत जमले होते. विनोबाजींनीं त्या सर्वांचें तेथें स्वागत केलें. म्हणाले : "विनाशाच्या कामीं मदत न करणें म्हणजेच अहिंसा नव्हे. अहिंसा म्हणजे विधायक कामांत, मानवतेच्या सेवेंत तन्मय होणें. आसपासच्या गरिबांशीं तन्मय झाल्याखेरीज अहिंसा कोठली?"

अशा प्रकारची तन्मयता गरिबांशीं, श्रमिकांशीं साधण्याचा प्रयत्न या शांति-सैनिकाचा चालू होता. श्रमिकांच्या अडचणींची, दु:खांची प्रचीति येत होती. त्यांतून मार्ग शोधण्यासाठीं चिंतन चालू होतें. देशांतली वाढती विषमता पाहून अंत:करण तळमळत होतें. तेलंगणांत या विषमतेमुळें उपद्रव चालू होते. कम्युनिस्ट रातचे राजे आणि सरकारी लष्कर व पोलिस दिवसाचे राजे अशी परिस्थिति होती. या दोन राजांच्या कचाट्यांत जनता भरडली जात होती, भेदरली होती. लाखों रुपयांचा खर्च करून सरकार शांतता निर्माण करूं पाहात होतें, तर शेंकडों लोकांची हत्या करून कम्युनिस्ट गरिबांचें राज्य निर्माण करूं पाहात होते. दोघे आपआपल्या शक्ति अजमावीत होते. दलितपीडित जनता दोघांचा जणूं खुराक बनली होती. त्या भागांत जाऊन तेथील अशांततेच्या कारणांचा छडा लावण्याची इच्छा तर विनोबांना १९४९ पासून होती; पण तसा प्रसंग आला नव्हता.

१९५१ च्या मार्चमध्यें नवशिक्षणपद्धतीनें कार्य करणाऱ्यांचें एक संमेलन सेवाग्रामला भरलें होतें. विनोबाजी त्या संमेलनाला हजर होते. त्यांनीं जमलेल्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन केलें. तेथून ते पुन्हां पौनारला आपल्या साम्ययोगाच्या प्रयोगासाठीं परत फिरणार तों सर्वोदय समाजाचे लोक त्यांच्याकडे गेले. हैद्राबादजवळ शिवरामपल्ली येथें सर्वोदय समाजाचें संमेलन होतें. विनोबांच्या मार्गदर्शनासाठीं सारे भुकेले होते. विनोबांनीं शिवरामपल्लीला यावें असा कार्यकर्त्यांनीं आग्रह धरला. विनोबा म्हणाले : "मी येईन पण पायीं येईन." कार्यकर्ते बुचकळ्यांत पडले. या म्हणावें तर पायानें ३५० मैल चालण्याचा त्रास त्यांना द्यायचा, येऊं नका म्हणावें तर मार्गदर्शनाला मुकायचें! शेवटीं विनोबांचें मार्गदर्शनच महत्त्वाचें ठरलें आणि विनोबांच्या पायीं यात्रेची लगेच तयारी झाली.

• • •

६ मार्चला पहाटे विनोबा उठले. तालिमी संघाच्या मुलींनीं 'निर्बल के बल राम' हें सुंदर भजन म्हटलें व विनोबांना निरोप दिला. तेथून पौनारवरून ते वर्ध्याला आले.

लक्ष्मीनारायण मंदिरांत निरोपाचा समारंभ झाला. विनोबा म्हणाले : " कदाचित् आपली ही भेट शेवटचीच ठरण्याचा संभव आहे ! " विनोबा असें निर्वाणीचें कां बोलतात, कोणाला कळेना. त्यांच्या अंत:करणांत काय शिजत होतें याचा पत्ता कोणाला नव्हता. पण लोकांच्या मनाला त्यांच्या ह्या शब्दांनीं चटका लावला. विनोबा मजल दरमजल करीत मार्गावरील जनतेचें पापताप निवारण करीत हैद्राबादला पोंचले. मार्गांत त्यांचें मनोमंथन चालू होतें. ग्रामीण जनतेशीं संबंध येत होता. मूक जनता त्यांना आपल्या हृदयवेदना सांगत होती. जनतेच्या अडीअडचणी त्यांना समजत होत्या. स्वराज्यानंतरची जनतेची स्थिति आपल्या डोळ्यांनीं ते पहात होते.

शिवरामपल्लीचें संमेलन आटोपलें. १५ एप्रिलला रामनवमी होती. विनोबांनीं जनतेच्या हृदयांतील निद्रिस्त रामरायाला जागें करण्यासाठीं तेलंगणामध्यें जाण्याचा आपला निश्चय जाहीर केला. ते त्याच दिवशीं हैद्राबादच्या तुरुंगांत जाऊन कम्युनिस्टांना भेटले. ता. १६ एप्रिलला त्यांनीं तेलंगणाचा मार्ग चालावयाला आरंभ केला. साम्ययोगाच्या प्रयोगांत रमलेला ऋषि दलितपीडितांना सांत्वन देण्यासाठीं तिकडे निघाला. अभय-प्रवर्तनासाठीं पदयात्रा सुरू झाली.

• • •

'साम्ययोग' हा शब्द विनोबांनीं गीतेंतून उचललेला आहे. साम्यवादांत जो बळजबरीचा वास येतो तो या शब्दांत नाहीं, उलट योग शब्दामुळें साधनेचा भाव त्यांत प्रतीत होतो. साम्ययोगाची कल्पना त्यांनीं गीतेमधील सहाव्या अध्यायांतल्या २९ ते ३२ या श्लोकांवरून घेतलेली आहे.

भूतांत भरला आत्मा, भूतें आत्म्यांत राहिलीं
योगानें जोडीला देखे हेंचि सर्वत्र दर्शन ॥
मज सर्वांत जो पाहे, पाहे माझ्यांत सर्वहि
त्याचा मी आणि तो माझा, एकमेकांस अक्षय ॥
स्थिर होऊनि एकत्वीं, सर्व भूतीं भजे मज
राहो कसाहि तो योगी, माझ्यामध्येंचि राहतो ॥
जो आत्मौपम्य बुद्धीनें, सर्वत्र सम पाहतो
जसें सुख तसें दुःख, तो योगी थोर मानिला ॥

या चार श्लोकांतून साम्ययोगाचा आधार असलेलीं तीन तत्त्वें त्यांना मिळालीं. तीं अशीं :

( १ ) समाजांत कोठल्याहि सत्तेचें राज्य नसावें. समाजावर सद्विचारांचें नियंत्रण असावें.

( २ ) व्यक्तीची सर्व शक्ति समाजाच्या सेवेंत अर्पण व्हावी आणि व्यक्तीच्या विकासाला समाजानें पूर्ण वाव द्यावा आणि त्यासाठीं व्यक्तीला सर्व सोयी मिळाव्या.

( ३ ) प्रामाणिकपणें आपापल्या कुवतीनुसार मनुष्य जी सेवा करील तिला समान मोबदला मिळाला पाहिजे. प्रामाणिकपणें कोणतेंहि काम करणाराला समाजांत सारखाच दर्जा लाभावा आणि कामें वेगवेगळीं असलीं तरी त्यांचें नैतिक व आर्थिक मूल्य सारखेंच मानलें जावें.

गांधीजींच्या हातीं आफ्रिकेंत रस्किन या थोर ग्रंथकाराचें ' अन्टु धिस लास्ट ' हें पुस्तक पडलें आणि तें वाचून त्यांच्या जविनांत क्रांति झाली. त्या पुस्तकांतून सर्वोदयाचे जे तीन मूलभूत सिद्धान्त गांधीजींनीं काढले तेच सिद्धान्त विनोबांना गीतामातेच्या दुधांतून मिळाले आणि सर्वोदयाची परिणति साम्ययोगांत झाली. हें एक नवें दर्शन आहे.

हें अभिनव दर्शन साकार करण्याच्या तळमळीमुळें साठीच्या उंबरठ्यावरील विनोबा तेलंगणाच्या भूमींत पदयात्रा करावयाला निघाले होते. साम्ययोगाचा नुसता वाचिक जप उपयोगी नाहीं, ज्या ठिकाणीं लोकक्षोभ आहे त्या ठिकाणीं साम्ययोगाच्या अमृताचें सिंचन करून तो क्षोभ शमवितां येतो हें सिद्ध करतां आलें पाहिजे, नाहींतर इतर अनेक सद्विचारांप्रमाणें ग्रंथांची शोभा वाढविण्यापुरताच त्याचा उपयोग होईल.

★ ★ ★

*अंतःकरणांत भक्तीचा झरा वहात असला*
*आणि बाहेरून तदनुकूल तप चाललें म्हणजे*
*जीवन हिरवेगार आणि सजीव बनतें.*

# भूदानाची गंगोत्री

वरंगळ आणि नलगोंडा ह्या जिल्ह्यांत दहशतवाद्यांनीं नुसता उच्छाद मांडला होता. सगळीकडे लोक कावरेबावरे झालेले. मनांतल्या भावना जिभेवाटे प्रकट होण्याचीसुद्धां त्यांना धास्ती वाटायची. त्या भागांत जाऊन लोकांना भेटण्याची, त्यांच्याशीं मनमोकळी चर्चा करण्याची साधी हिंमत कोणांत नव्हती. हिंस्र श्वापदांसाठीं एकादें रान मोकळें सोडावें त्याप्रमाणें हे दोन जिल्हे दहशतवाद्यांच्यासाठीं जणुं मोकळे ठेवले होते. त्या भागांत दहशतवाद्यांखेरीज जात होते ते म्हणजे भारतीय सैन्यांतले जवान. हातांत बंदुका घेऊन ते जायचे. बंदुकीनें माणसें मारतां येतात, पण हृदय उघडण्याची शक्ति तिच्यांत कोठें आहे ? सैनिकांच्या धाकानें लोक घरांत दडून बसत. रात्रीं दहशतवाद्यांची भीति आणि दिवसा सैनिकांची धास्ती. सामान्य जनतेला मनमोकळेपणानें जगणेंहि शक्य नव्हतें. रात्रीं कम्युनिस्टांचें राज्य तर दिवसा सैन्याचें. आणि या दोन जात्यांच्या तळ्यांत जनता बिचारी भरडून निघत होती.

माणसाची भयवृत्ति वाढविणें हें जगांत सर्वांत मोठें पाप आहे. भित्रा मनुष्य आपला सद्‌गुणांचा किल्ला वाळूच्या पायावर जणुं उभारतो. भयाच्या एका लाटेसरशी हा सद्‌गुणांचा किल्ला वाहून जातो. निर्भयता हा गुणांचा राजा आहे. जो निर्भय झाला त्याला सत्याचें दर्शन केव्हां ना केव्हां होऊं शकेल, पण ज्यानें निर्भयता मिळविली नाहीं त्याला गुणविकास करणें अशक्य आहे. एकाच्या दहशतीनें ज्यानें एक विचार मान्य केला तो त्यापेक्षां अधिक दहशत दाखवितांच त्या विरुद्धचा दुसरा विचारहि कबूल करील ! तेलंगणाकडे प्रस्थान करतांना पहिल्याच भाषणांत विनोबा म्हणाले : “ जो भितो त्याचें रक्षण करण्याचा भार प्रत्यक्ष परमेश्वरसुद्धां घेऊं शकणार नाहीं. भीतीच्या कारणांचा

छडा लावला पाहिजे. माणसानें माणसाला भ्यावें, हें माणुसकीला शोभत नाहीं. ह्या भीतीच्या मुळाशीं विषमता आहे; धन दौलतीचा, श्रेष्ठपणाचा मोह आहे. जर समाजांतल्या वरिष्ठ वर्गाच्या लोकांनीं आपली धनदौलत आणि बुद्धि समाजाच्या सेवेसाठीं वापरली नाहीं, तर त्यांचा बचाव प्रत्यक्ष परमेश्वरहि करूं शकणार नाहीं." निर्भयता म्हणजे परस्परांबद्दल विश्वास. जोंवर विषमता हें आपल्याला वैभव वाटतें तोंवर असा परस्पर विश्वास निर्माण होणार नाहीं, माणूस भयमुक्त होणार नाहीं.

भयहारी रामनामाचा उद्घोष करीत दहशतवाद्यांच्या प्रदेशांत विनोबांनीं प्रवेश केला. लोकांच्या मनाचीं कवाडें उघडूं लागलीं. मनांत दाबून ठेवलेल्या भावना प्रकट होऊं लागल्या. आपली वेदना लोक विनोबांना सांगूं लागले. संताचा दरबार गांवोगांव भरूं लागला. नौखालींत गांधीजींच्या अभयप्रवर्तक यात्रेनें लोकांना वाचा दिली, तेलंगणांत विनोबांच्या शांतियात्रेनें तेंच साधलें.

• • •

१८ एप्रिलचा दिवस. विनोबांचा मुक्काम पोचमपल्ली या खेड्यांत होता. नेहमीं-प्रमाणें लोक विनोबांकडे येऊन आपलीं अंतःकरणें मोकळीं करूं लागले. पोचमपल्लींतले हरिजन विनोबांकडे आले. आपल्या अडचणींचा पाढा त्यांनीं वाचला. म्हणाले : "ना आम्हांला जमीन, ना व्यवसाय. कष्ट करून जगण्याची आम्हांला संधिच नाहीं. आम्ही दुर्भागी. आम्हांला आमची ताकत वापरून जगणें शक्य नाहीं. जगण्यासाठीं कष्ट करण्याची आमची तयारी आहे, पण त्याला वाव नाहीं. आमची उपासमार होते आहे."

त्यांचें म्हणणें खरें होतें. उपाशी माणसाला परमेश्वराचें दर्शन सद्गुणांच्या रूपांत होत नाहीं; भाकरीच्या रूपांतच होऊं शकतें. भगवान् बुद्धांची ती प्रसिद्ध कथा आहे ना? त्यांचे शिष्य धर्मप्रचारार्थ निघाले. मानवानें आपलें कल्याण कसें साधावें, याचा मार्ग सांगण्यासाठीं कळवळ्यानें ते निघाले होते. एका शिष्याला एक भिकारी प्रथम दिसला. पण आत्मिक कल्याणाचा मार्ग समजून घेण्याची त्याची तयारी नव्हती. तो शिष्य रागावून बुद्धांना हें सांगूं लागला. तेव्हां बुद्धांनीं त्या माणसाला बोलावून जेऊं घालून परत पाठवलें. शिष्य म्हणाला : "हें काय, तुम्हीं तर त्याला धर्माचा उपदेशहि केला नाहीं?" बुद्ध म्हणाले : "त्याची सत्प्रवृत्ति जागी राहाण्याजोगी परिस्थिति आपण निर्माण केली पाहिजे. तोच त्याला आज उपदेश." चोरीची आई असलेला परिग्रह समाजांत कायम आहे तोंवर चोरी जाणार नाहीं. आपली शक्ति वापरण्याची संधि प्रत्येकाला मिळाली पाहिजे. शक्तीला अनुकूल संधि लाभली तर ती शिव होते, अन्यथा रुद्र रूप धारण करते.



विनोबा त्या हरिजनांचें गाऱ्हाणें ऐकूण अस्वस्थ झाले. देशांतील सर्व प्रश्नांचें मूळ हें आहे. त्या हरिजनांसाठीं कांहीं केलें पाहिजे. पण काय करणार? सरकारकडे लिखापढी करून त्यांना एकादी पडित जमीन मिळवून देतां येईल. परंतु सरकारी लाल फिती कारभारांत हें साधें काम व्हायला किती वेळ लागेल आणि स्वतःच बनविलेल्या कायद्यांचीं किती बंधनें आड येतील! ज्यांचें दुःख पराकोटीला पोंचलें आहे, त्यांच्या दृष्टीनें क्षणाक्षणाचें महत्त्व असतें. सरकारी कृपा आणि कायदे यांच्या मागें लागून वेळ दवडण्यांत काय स्वारस्य? त्यापेक्षां लोकहृदयांतील रामरायांना साद कां घालूं नये?

त्यांनीं गांवकऱ्यांना हरिजनबंधूंची करुण कहाणी सांगितली. गांवांत एकादाहि मनुष्य भुकेनें तडफडत असणें हें साऱ्या गांवाला लांछन आहे. प्रत्येक गांव हें एकाद्या कुटुंबासारखें बनलें पाहिजे. कुटुंबांत कोणी उपाशीं रहाणें ह्यांत कुटुंबाची शोभा नाहीं. जें असेल तें प्रेमानें वांटून खाण्यांत आनंद असतो. विनोबाजींचे हे शब्द व्यर्थ गेले नाहींत. श्री. रामचंद्र रेड्डी नांवाचे एक सद्गृहस्थ उठले. हरिजनांची मागणी ४० एकर कोरडवाहू व ४० एकर पाण्याखालची जमीन मिळावी अशी होती. परंतु रामचंद्र रेड्डी यांनीं ५०

एकर कोरडवाहू व ५० एकर पाण्याखालची अशी १०० एकर जमीन देण्याचें ठरविलें. परमेश्वरानें रामचंद्र रेड्डींच्या रूपानें विनोबांचें भलतेंच कोड पुरविलें! 'बायबल'मध्यें येशूनें सांगून ठेवलें आहे: "ठोठावा म्हणजे उघडेल, मागा म्हणजे मिळेल." पण श्रद्धापूर्वक फारसें कोणी तसें करीत नाहीं आणि त्यामुळें प्रश्नांचीं उत्तरें शोधीत दारोदार फिरण्याची पाळी येते.

• • •

घटना घडून गेली पण विनोबांच्या मनाच्या आकाशांत ती निनादत राहिली. एका लहानशा खेड्यांत जमीन मागितली काय आणि जनतेंतील एक इसम उभा राहून लगेच जमीन देतो काय? हें सगळें काय आहे? भूमातेच्या अंकावर डोकें टेकतांच प्रगाढ निद्रेंत मग्न होणाऱ्या त्या संताला झोप येईना. ऐंशी एकर जमीन मागितली आणि शंभर एकर जमीन मिळाली, या घटनेचा काय अर्थ? भगवन्तानें या प्रसंगांतून कोणता इषारा पाठविला आहे? कावळा बसला आणि फांदी मोडली यासारखा हा एखादा अपघात आहे कीं त्यांत आणखी कांहीं सखोल अर्थ आहे?

जगांत मानव हा सर्वस्वीं स्वतंत्र असा घटक नाहीं. मानवाच्या जन्मापूर्वींच त्याचें कारण हजर असतें, त्याचप्रमाणें घटना घडण्यापूर्वीं त्याची तयारी समाजांत झालेलीच असते. भूकंपाचा उद्रेक एखाद्या क्षणीं अचानक घडल्यासारखा भासला तरी पृथ्वीच्या पोटांत तो तत्पूर्वीं कितीतरी काळ शिजत असतो. झाडावर अचानक एक दिवस एक कळी खुललेली दिसते. पण त्यापूर्वींच तिच्या जन्माची तयारी चाललेली असते. बाह्य रूपांत अचानक साक्षात्कार झाला तरी घटनेचीं पाळेमुळें दूरवर रुजलेलीं असतात. ह्या दानाचीं पाळेंमुळें कुठें असतील!

विनोबांना विचार करतांना असें आढळून आलें कीं, या गांवचा हा दाता एक निमित्तमात्र आहे. ह्या दानासाठीं अनुकूल वातावरण निर्माण झालेलें असलें पाहिजे. या गांवांत भूमिहीनांनीं मागणी केली तशी दरेक गांवांत होण्याची शक्यता आहे. जर खेड्यांतील मूक जनतेला वाचा फुटली तर हाच आवाज इतरत्राहि ऐकूं येईल. ह्या सृष्टीची रचना अशी कांहीं मजेदार आहे कीं येथें गरज निर्माण झाली कीं तिच्या तृप्तीची सोयहि निर्माण झालेली असते. ईश्वराच्या दुनियेंत अपूर्ण किंवा एकांगी अशी घटना घडत नाहीं. मूल जन्माला येतें, त्याच्या पोटांत भूक असते तर त्याबरोबर मातेच्या स्तनांत दूधहि असतें. ईश्वराची योजना सर्वांगपरिपूर्ण असते. एकीकडे मुलाच्या पोटांत भूक दिली तर

आईच्या स्तनांत तिकडे दूधहि दिलें आणि तिच्या हृदयांत दूध पाजण्याची प्रेरणाहि दिली. विनोबांना ही घटना हा ईश्वरी संकेत वाटला.

विनोबांच्या मनांत विचार आला, खरोखर हें काम करण्याची शक्ति आपल्यांत आहे का ? त्यांना तसें सामर्थ्य आपल्यांत आहे असें भासेना. आपण शक्तिशून्य आहोंत, असेंच त्यांना वाटलें. मग त्यांच्या मनांत विचार आला : शक्ति आपल्यांत नसेल पण विश्वास, श्रद्धा आपल्यांत नाहीं असें थोडेंच आहे.

हातांत शंभर एकर जमीन फक्त होती. त्यांनीं गणित करायला आरंभ केला. हिंदुस्थानच्या दृष्टीनें त्यांनीं मनांत गणित मांडलें. त्या गणिताचें उत्तर फार प्रचंड आलें ! पांच कोटि एकर तरी जमीन मिळाली पाहिजे, त्यावांचून हा प्रश्न सुटणार नाहीं, हें त्यांच्या ध्यानांत आलें. एवढ्या प्रचंड प्रमाणावर जमीन मिळेल का ?

ह्या आंकड्याला भिऊन ईश्वरी संकेताकडे दुर्लक्ष करणें त्यांना अहिंसावृत्तीशीं विसंगत वाटलें. हा मार्ग न पटला तर निराशेच्या गर्तेत पडण्यावांचून गत्यंतरच नव्हतें. दुसरा मार्ग होता हिंसेचा. पण हिंसेनें प्रश्न सुटल्याचा केवळ आभासच होतो. हिंसेनें एक प्रश्न सोडविण्याच्या प्रयत्नांत नवे हजारों प्रश्न पुढें उभे ठाकतात. असे विचारतरंग विनोबांच्या मनांत उठत होते. रामाचें नांव घेत ते झोपीं गेले.

• • •

दुसऱ्या दिवशीं पुन्हां पदयात्रा पुढें गेली.त्या गांवीं विनोबांनीं आदल्या दिवशींच्या घटनेचा उल्लेख केला. वास्तविक तेलंगणांतील प्रत्यक्ष परिस्थिति आपल्या डोळ्यांनीं पहावी याच हेतूनें विनोबा तेलंगणांत गेले होते. निघतांना त्यांच्या मनांत भूदानाची कल्पना-देखील नव्हती. पण त्यांची पोचमपल्लीच्या अनुभवानें खात्री पटली कीं अहिंसेच्या उपासकाला ईश्वरानें हा संकेत केला आहे. त्या संकेताचें रहस्य समजून घेतलें पाहिजे. रामावतार झाला तेव्हां माकडांनींसुद्धां थोर कामगिरी बजावली. ईश्वरी संकेतानें सामान्यांतहि असामान्यत्वाचा संचार होतो, हा सृष्टीचा सर्वांत महान् चमत्कार आहे. एकदां महंमद पैगंबरांकडे त्यांचे कांहीं शिष्य आले. म्हणूं लागले, तुम्ही कांहींतरी चमत्कार दाखवा म्हणजे आपल्या धर्माचा झटपट प्रचार होईल. पैगंबर म्हणाले : " माझ्यासारख्या अशिक्षित माणसाच्या तोंडून एवढीं सूक्ष्म तत्त्वें बाहेर पडतात, हा का कमी चमत्कार आहे ? " विनोबांची भावना अशीच होती. एक व्यक्ति या दृष्टीनें एवढा मोठा

भार पेलण्याची आपली शक्ति नाहीं, असें त्यांना वाटणें अगदीं स्वाभाविक होतें. परंतु ईश्वराचा संकेत: झाला असल्यामुळें गणितानें येणाऱ्या प्रचंड उत्तराची त्यांना भीति वाटली नाहीं.

● ● ●

दुसऱ्या दिवशीं ज्या गांवांत ते गेले तेथें अत्यंत विश्वासानें आणि प्रेमानें त्यांनीं गरीब भूहीनांच्यासाठीं जमिनीची मागणी केली. एखाद्या मुलानें ज्या अधिकारानें आपल्या बापापाशीं जमिनीची मागणी करावी त्या आत्मविश्वासानें त्यांनीं जमीन मागितली. जे लोक स्वागताला आले होते त्यांना कल्पनाहि नव्हती कीं हा माणूस भूदान मागणार आहे. ते बिचारे विनोबांच्या स्वागतासाठीं हारगुच्छ घेऊन मोठ्या उत्साहानें आले होते.

त्यांच्या स्वागताचा स्वीकार करून विनोबा म्हणाले : " हीं फुलें किती सुंदर आहेत ! पण या फुलांची आई त्यांच्यापेक्षांहि सुंदर आहे. मला फुलें नकोत, तीं देवाला वहा. मला माती द्या, माती. मी तुमचा बाळ आहे आणि तुम्ही माझे मायबाप आहांत. तुमच्या घरांत चार मुलें असतील तर मला पांचवा मुलगा माना. मला पांचवा भाग द्या. "

त्या लोकांना कांहींहि कल्पना नव्हती कीं विनोबा अशी कांहीं मागणी करणार आहेत. हिरोशिमावर अणुबॉंब पडल्यानंतर जसा आघात झाला तसा आघात त्यांच्यावर झाला. त्यावेळीं विनोबांना पंचवीस एकर जमीन मिळाली.

विनोबांनीं विचार केला कीं काल एक बिंदू मिळाला. आज दुसरा बिंदू मिळाला. दोन बिंदू जोडले कीं एक सरळ रेघ तयार होते. भूमितीचा हा सिद्धान्त युक्लिडनें सांगून ठेवला आहे. त्याप्रमाणें आपल्या कामाची सरळ रेघ तयार झाली आहे असें विनोबांना वाटलें. गंगोत्रीला गंगेचा उगम झाला आणि तिचा प्रवाह कांठांचें पापताप शमन करीत वाहूं लागला. त्याप्रमाणें पोचमपल्लीला भूदानाची गंगोत्री उगम पावली आणि ती वाहूं लागली. ज्ञानेश्वरांनीं म्हटलें आहे : ' जे वाट कृपेची करितु, ते दिशा स्नेहेचि भरितु ' त्याप्रमाणें विनोबांच्या कृपेची वाट जाते तेथील सर्व दिशा स्नेहप्रेमाच्या सुगंधानें दरवळून जातात.

★ ★ ★

# पुढचें पाऊल

भूदानाची गंगा वाहूं लागतांच ती प्रत्येक पावलागणिक परिपुष्ट होऊं लागली. भूदानाच्या कल्पनेमागील विचारांचे नवनवे पैलू विनोबांच्या नित्याच्या प्रार्थना–प्रवचनांत स्पष्ट होऊं लागले. वाविळापल्ली या गांवांत विनोबाजींनीं प्रार्थना–प्रवचनांत आपलें हृद्गत अधिक स्पष्टपणें व्यक्त केलें. ते म्हणाले : "मी वामनावतार बनून जमीन मागायला सुरुवात केली. माझ्या शब्दांत ईश्वरानें सामर्थ्याचा संचार करविला. भूदान हें एक क्रांतिकारी कार्य आहे याची जाणीव लोकांना होऊं लागली. हें कार्य राज्ययंत्राच्या सामर्थ्यापलीकडचें आहे हेंहि लोकांच्या ध्यानांत येऊं लागलें.

"सरकारनें शांतता प्रस्थापित करण्यासाठीं जें लष्कर पाठविलें होतें त्यावर दरसाल ५ कोटी रुपये खर्च होत होते. जेथें वाघाची शिकार करायची असेल तेथें लष्कराचा उपयोग होऊं शकेल; परंतु जेथें एकाद्या विचारसरणीला तोंड द्यावयाचें असेल, तेथें विचारानेंच तें काम होऊं शकेल.

"तेलंगणांत कम्युनिस्टांना जें यश मिळालें त्यांचीं कारणें शोधतां शोधतां मी अशा निष्कर्षावर येऊन पोंचलों कीं, आजचा मुख्य प्रश्न भूमीचा आहे. आज तेलंगणांत जो प्रश्न उभा आहे तो उद्यां सबंध हिंदुस्थानांत उपस्थित झाल्याशिवाय राहाणार नाहीं. आपण सर्वांनीं त्याला तोंड दिलें पाहिजे आणि म्हणून तो सोडविण्याचा अहिंसक मार्ग शोधून काढण्यास मी प्रवृत्त झालों. प्रश्न केवळ कांहीं लोकांच्या उपासमारीचा किंवा संकट निवारण्याचा असतां तर मीं दान मागितलें असतें व तें थोडें देण्यानें भागलें असतें. पण येथें राजकीय, आर्थिक व सामाजिक समस्या सोडवायची आहे. ज्या ठिकाणीं राजकीय

आर्थिक व सामाजिक क्रांति करावयाची असेल त्या ठिकाणीं मूळ मनोवृत्तिच बदलून टाकण्याची गरज असते. " गांवोगांव भूदान यज्ञाचा हविर्भाग मागत समाजाची मनोवृत्ति पालटण्यासाठीं आवश्यक नवविचार पेरीत विनोबाजी फिरत राहिले.

इतक्या मोठ्या प्रमाणावर मागून जमीन मिळते यावर लोकांचा विश्वासच बसेना. परंतु तेलंगणांतील लोकांच्या हृदयांतील रामराय जागे होत होते. त्यांच्यांत निर्भयता येत होती. सामाजिक भावना निर्माण होत होती. आपल्या भाग्यांत इतरांना भागीदार करण्यासाठीं ते प्रवृत्त होत होते. सुमारें दोन महिन्यांच्या अवधींत सुमारें साडेसहाशें लोकांनीं तेरा हजार एकर जमीन दान दिली. रोज सरासरीं दोनशें एकर जमीन मिळत होती. खून–लूटमार व धाकदपटशा यांनीं रातच्या राजांना जें साधलें नाहीं तें विनोबांच्या शांतिप्रवचनांनीं साधलें !

आपली हैद्राबाद संस्थानांतली ही पदयात्रा आटोपून २६ जून १९५१ रोजीं विनोबा सेवाग्रामला परतले. त्यांच्या यशानें वैचारिक जगतांत मोठें वादळ माजलें. असें कांहीं घडलें असेल, यांवर तर्क विश्वास ठेवायला तयार नव्हता; पण सत्य अविश्वास दाखवायला संधि देत नव्हतें. २७ जूनला विनोबा परत परंधामला आश्रमांत आले. तेथें आल्यावर त्यांनीं सांगितलें : " येथें आश्रमांत राहून ज्यांनीं साम्ययोगी समाजाच्या निर्मितीसाठीं, कांचनमुक्तीच्या प्रयोगासाठीं तपस्या केली तिचें महत्त्व फार आहे. त्यामुळेंच मला तिकडे बळ मिळत होतें. अहिंसेचा शोध करणें हें वर्षानुवर्षें माझें जीवनकार्य झालेलें आहे. माझे सर्व प्रयोग त्याच एका दिशेनें चाललेले आहेत. मी माझ्या आवडत्या संस्थांतूनहि बाहेर पडलों तो अहिंसेच्या साधनेसाठीं. आपल्या जीवनांतील सर्व प्रकारच्या सामाजिक व वैयक्तिक अडचणींचा परिहार अहिंसेच्या द्वारें कसा करतां येईल याचा शोध करणें हें माझें मुख्य कार्य आहे व त्यासाठींच एक शांतिसैनिक या नात्यानेंच मी तेलंगणांत गेलों होतों. हें काम मीं जर टाळलें असतें तर अहिंसेचें व शांतिसेनेचें कार्य करण्याची माझी प्रतिज्ञाच मीं मोडली असा त्याचा अर्थ झाला असता. "

• • •

केवळ विनोबांच्या व्यक्तिमत्त्वामुळें जमीन मिळते असा आक्षेप कांहींनीं घेतला. पण विनोबाजी परतल्यानंतरहि जमीन मिळतच राहिली. ' कम्युनिस्टांच्या आतंकानें त्रस्त झाल्यामुळें नलगोंडा व वरंगळ भागांत जमीन मिळाली. ' जेथें कम्युनिस्टांचा उपद्रव नाहीं तेथें जमीन मिळणार नाहीं ' अशी अभद्रवाणी आरंभीं कांहींनीं उच्चारली होती. पण



विनोबांना सर्वांत अधिक भूमि अदिलाबाद जिल्ह्यांत मिळाली कीं, जेथें कम्युनिस्टांचें भय नाममात्रहि नव्हतें. प्रवर्तनशक्ति केवळ दुष्टांच्या हातीं आहे, सज्जनांनीं दुष्टाव्याचे असहाय साक्षिदार तरी व्हावें किंवा त्यांना विरोध करीत नामोहरम तरी व्हावें, असा जगाचा आडाखा. सज्जनांचीं जीवनें म्हणजे फार तर दुर्जनांच्या जीवनांचीं शुद्धिपत्रें, पण त्याहून अधिक किंमत त्यांना नाहीं. कायद्याच्या वा कम्युनिस्टांच्या बडग्याशिवाय लोक वळत नाहींत असा जगाचा अनुभव. पण विनोबांनीं दाखवून दिलें कीं सज्जनांनीं मनांत आणलें व निरहंकार वृत्तीनें प्रयत्न केले तर सद्भावप्रवर्तन होऊं शकतें. प्रवर्तनाची शक्ति सज्जनांत-सुद्धां असूं शकते. दुर्जनतेप्रमाणें सज्जनतेचीहि लाट उसळून देतां येते. सर्व जग ' घेऊं पासरी ' झालेलें, आपल्याच पोळीवर तूप ओढण्यासाठीं गुंतलेलें दिसत असलें तरी देण्याचीहि लाट निर्माण करतां येते. समानता आणण्यासाठीं अपहार हाच एकमेव मार्ग नसून अपरिग्रह हाहि मार्ग होऊं शकतो.

विनोबांना भूमीचें दान हवें आहे, पण त्या दानामागची भावना त्यांना अधिक महत्त्वाची वाटते. ते म्हणतात : " दरिद्रनारायणाला आपल्या कुटुंबांतलाच एक समजून

त्याचा हिस्सा मला द्या. घरांत चार मुलें असतील तर दरिद्रनारायणाला पांचवा मुलगा समजून द्या. मी गरिबांचा आणि श्रीमंतांचा सर्वांचा मित्र आहे. मला मैत्रींतच आनंद वाटतो. जी शक्ति प्रेमांत, मैत्रींत आहे ती द्वेषांत नाहीं. अनेक लढाया करून जी क्रांति राजेमहाराजांना करतां आली नाहीं ती बुद्ध, येशू, रामानुज यांनीं केली. यांच्यापैकीं एकेकानें जें काम केलें तेवढें अनेक राजांनीं मिळूनसुद्धां केलें नसेल. प्रेम आणि विचार यांच्या तोलाची दुसरी शक्ति जगांत नाहीं. म्हणून मी पुन:पुन्हां समजावून सांगेन. प्रथम मला हृदयपरिवर्तन करावयाचें आहे, नंतर आचारपरिवर्तन व अखेरीस समाजपरिवर्तन. बुद्धीला पटेपर्यंत मला घाई नाहीं, पण बुद्धीला पटल्यावर मात्र मला धीर निघणार नाहीं. ”

• • •

विनोबांच्या या अभूतपूर्व यात्रेची दखल सर्वांना घ्यावी लागली. त्यांच्या यात्रेंतून जमिनीच्या प्रश्नाचा उकल व्हायला लागला, भूमिदान मिळूं लागलें, मोबदला न देतां जमिनीच्या फेरवांटपाच्या कार्याला आरंभ झाला. पण सर्वांत महत्त्वाची गोष्ट जी साधली ती म्हणजे लोक निर्भय बनले. पोलिस आणि कम्युनिस्टांचे पुढारी यांच्या जाचांतून जनतेची सुटका झाली. कम्युनिस्टांचे पुढारी गांधींना व त्यांच्या अनुयायांना भांडवलदारांचे हस्तक म्हणून सतत हिणवीत; पण त्या कम्युनिस्टांना जें करतां आलें नाहीं तें शांततामय मार्गानें व अधिक झपाट्यानें विनोबांनीं करून दाखविलें. कम्युनिस्टांना त्यांनीं कधीं दुखविलें नाहीं. प्रेमानें त्यांची बाजू समजून घेण्याचा सतत प्रयत्न केला. विनोबा पौनारला परतल्यावर कॉ. डांगे यांनीं विनोबांना एक पत्र पाठविलें होतें. विनोबांनीं उत्तरीं कळविलें : “ जमिनीचा प्रश्न सुटला पाहिजे व त्यासाठीं कायद्याची मदत मिळाली पाहिजे, याबाबत कोणाचा मतभेद नाहीं. हा प्रश्न प्रेम, विश्वास व शांतता या मार्गांनीं सुटूं शकतो. रझाकारांचा जमाना गेल्यानंतर कम्युनिस्टांच्या शस्त्रें बाळगण्याचें कोठल्याहि प्रकारें समर्थन होऊं शकत नाहीं. कम्युनिस्टांनीं आपला कार्यक्रम बदलला पाहिजे, त्यांत जनतेचें व कम्युनिझमचेंहि हित आहे. ”

तेलंगणांतून पौनारला परतल्यावर जवळ जवळ अडीच महिने विनोबा साम्ययोगाच्या प्रयोगांत मग्न होते. त्यांचे नवे नवे विचार ‘ सर्वोदय ’ व ‘ सेवक ’ या मासिकांच्या द्वारें प्रसृत होत होते. लोकशाही राज्यव्यवस्थेसाठीं एक सत्ताधारी पक्ष व दुसरा सत्ताकांक्षी पक्ष असणें आवश्यक मानलें जातें. पण लोकशाही राज्यव्यवस्थेच्या

शुद्धीसाठीं काय यंत्रणा उभारावी हाहि एक मूलभूत प्रश्न आहे. विनोबा म्हणतात कीं, लोकशाहीच्या शुद्धीकरणासाठीं विधायक कार्यकर्त्यांच्या निष्पक्ष समाज आवश्यक आहे. त्यासाठीं पंचविध कार्यक्रमहि त्यांनीं लोकांपुढें मांडला : ( १ ) जीवनशोधन—एकादश व्रतांच्या साधनेच्या दृष्टीनें जीवनाचें नित्य परिशिलन करावें. ( २ ) अध्ययनशीलता—सृष्टीची गतिमानता ओळखून सतत अध्ययन करीत राहावें. ( ३ ) उपेक्षितांची सेवा. ( ४ ) वाणीनें निषेध आणि कृतीनें सत्याग्रह—समाजविघातक व शोषणरहित अहिंसक समाजरचनेला विरोधी गोष्टींचा वाणीनें निषेध व प्रसंगीं कृतीनें सत्याग्रह करणें. ( ५ ) विविध प्रश्नांचीं अहिंसक उत्तरें शोधणें.

• • •

याच काळांत भारत सरकारनें एक नियोजन मंडळ नेमून देशांतील साधनसंपत्तीचा आढावा घेऊन देशाच्या विकासाच्या दृष्टीनें पंचवार्षिक योजनेचा एक कच्चा मसुदा तयार करून प्रसिद्ध केला. देशभर त्या मसुद्यावर चर्चा चालू होती. स्वातंत्र्योत्तर काळांतील ही राष्ट्रीय महत्त्वाची दुसरी कृति. पहिली लोकसत्तात्मक घटना तयार करण्याची. नियोजनाच्या पहिल्या मसुद्यानें विनोबाजींना धक्का बसला, गांधीजींच्या सहवासांत वाढलेल्या राजकीय धुरंधरांच्या देखरेखीखालीं तयार झालेला हा मसुदा आहे कीं काय अशी शंका वाटावी असा तो मसुदा होता. आपल्या नेहमींच्या प्रवृत्तीला सोडून विनोबांनीं ह्या मसुद्यासंबंधीं तीव्र मतप्रदर्शन केलें. तेव्हां श्री. रा. कृ. पाटील यांना चर्चा करण्यासाठीं विनोबांकडे मुद्दाम पाठविण्यांत आलें. त्यांच्याजवळ विनोबा म्हणाले : " अन्न व रोजगाराची शाश्वति न देणारी कोणतीहि योजना राष्ट्रीय म्हणविण्याला लायक नाहीं. अन्न व रोजगाराची हमी द्याल तर खादी व ग्रामोद्योग यांच्याशिवाय तरणोपाय नाहीं असें दिसून येईल. खादीसाठीं खादी असा माझा आग्रह नाहीं. सर्वांना रोटी व रोजगार देण्याची प्रतिज्ञा नियोजन मंडळानें करावी व मग कोणताहि कार्यक्रम पुढें मांडावा."

नियोजनासंबंधीं चर्चा करण्यासाठीं विनोबांना नेहरूंनीं दिल्लीला पाचारण केलें. विनोबाजींनीं वर्ध्याच्या परिसरांत काम करणाऱ्या विविध रचनात्मक संस्थांच्या कार्यकर्त्यांना सेवाग्रामला जमविलें.

ते अत्यंत तीव्र विचारांत गढून गेले होते. जोराजोरानें फेऱ्या मारीत होते. एकेक कार्यकर्ता आला कीं त्याच्याशीं बोलत होते. " आपणां विधायक कार्यकर्त्यांना हें

आव्हान आहे. ही कसोटीची वेळ आहे. आपण आतां कमी पडलों तर आपल्या सिद्धान्तांना आपल्याला मूर्त व व्यापक स्वरूप देतां येणार नाहीं. आपण प्रवाहपतित बनूं " असें ते म्हणाले. त्यांनीं सर्व विधायक कार्यकर्त्यांचें मनोगत जाणून घेतलें. सर्वांना सांगितलें : " नेहरूंच्या निमंत्रणावरून दिल्लीला जाण्याचें मीं नक्की केलें आहे. परंतु मी पायीं जाणार आहें. तुम्ही विचार करा व जर कांहीं महत्त्वाचें बोलावेसें वाटलें तर वाटेंत मला गांठून तुमचें म्हणणें सांगा. "

• • •

ते १२ सप्टेंबरला पौनारहून पुन्हां पायीं दिल्लीच्या यात्रेला निघाले. निघतांना त्यांनीं सांगितलें : " क्रांति टाळणें हा माझा उद्देश नाहीं. मी हिंसक क्रांति टाळून अहिंसक क्रांति करूं इच्छितों. आपल्या देशाची भावी सुखशांति जमिनीचा प्रश्न शांततामय मार्गानें सुटण्यावर अवलंबून आहे. कायद्यासाठीं काम अडून राहूं नये असें वातावरण मी निर्माण करीत आहें. क्रांति अटळ आहे हें आपले लोक समजून चुकले आहेत. पण त्यांना चीन–राशियासारखी हिंसक क्रांति नको आहे. भूदान यज्ञाच्या मार्गानें अहिंसक क्रांति होऊं शकेल अशी लोकांची खात्री झाली आहे व म्हणूनच ते जमिनी देत आहेत. कम्युनिस्टपीडित मुलखाशिवाय इतरत्र जर जमीन मिळाली नाहीं तर सर्वोदयापूर्वी सर्वनाश आवश्यक आहे असा अर्थ होईल. भूमीची समस्या ही फार महत्त्वाची आहे. अहिंसक पद्धतीनें जर तिचा उकल झाला तरच इतर सारीं विधायक कार्यें जोर धरतील; नाहीं तर गांधींचें सारें काम आवरून घ्यावें लागेल. "

• • •

यानंतर मजल दरमजल करीत विनोबाजी मध्यप्रदेश, उत्तर प्रदेश, विंध्य प्रदेश यांतून ७९५ मैलांचा प्रवास करून दोन महिन्यांनीं दिल्लीला पोंचले. या तिन्ही प्रदेशांत पदयात्रेंत मोठ्या प्रमाणावर जमीन मिळाली. कम्युनिस्टपीडित भागांत रोज दोनशें एकर जमीन मिळत होती तर या प्रदेशांत रोज ३०० एकरांचें प्रमाण पडलें !

भूदान यज्ञाची त्रिसूत्री विनोबांनीं कार्यकर्त्यांसाठीं तयार केली. कारण आतां केवळ एकटे विनोबा हें कार्य करीत नव्हते. विधायक कार्यकर्त्यांच्या मनाचीहि पकड या चळवळीनें घेतली होती. त्या कार्यकर्त्यांनीं योग्य रीतीनें कार्य करावें यासाठीं हे नियम.

( १ ) आमचा विचार समजून घेऊनहि जर कोणी जमीन दिली नाहीं तर त्यांत दुःख नाहीं. कारण त्यानें आज न दिली तर तो उद्यां देईल. विचारबीजें उगवल्यावांचून राहात नाहींत.

( २ ) विचार समजून घेऊन आपला हविर्भाग कोणीं दिला तर त्यांत आनंद आहे. कारण त्यामुळें सर्वत्र सद्भावना पसरेल.

( ३ ) विचार समजल्यावांचून दडपणामुळें कोणी जमीन दिली तर त्यांत दुःख आहे. कसेंहि करून केवळ जमीन मिळविणें हें भूदानयज्ञाचें उद्दिष्ट नाहीं. साम्ययोग व सर्वोदय वृत्ति निर्माण करण्यासाठीं भूदान आहे.

या दृष्टीनें ते म्हणतात : " जमिनीचें तसें मला फारसें महत्त्व वाटत नाहीं. लोक म्हणतात : ' आम्ही या जमिनीचे मालक आहोंत. ' पण हेच लोक मरून जातात. त्यांची माती होते आणि जमिनींत मिसळून जाते. जमीन मात्र कायम राहाते. आणि तरी ते म्हणतात : ' आम्ही जमिनीचे मालक ! ' तुम्ही जमिनीचे मालक कीं जमीन तुमची मालक ? यासाठीं मला जमिनीची कवडीइतकी किंमत नाहीं. तरीहि मी जी जमीन मागतों ती प्रेमभावना वाढविण्यासाठीं. लोकांनीं प्रेमानें जमिनी दिल्या ह्या गोष्टीला फार महत्त्व आहे. "

● ● ●

मध्यप्रदेशांत सागरला व्याख्यानांत त्यांनीं सांगितलें : " मला पांच कोटि एकर जमीन पाहिजे आहे. हिंदुस्थानांत तीस कोटि एकरांच्या आसपास जमीन आहे. प्रत्येक कुटुंबांत सरासरी पांच भाऊ असतात. दरिद्रनारायण हा सहावा भाऊ. त्याचा हिस्सा म्हणून ही ५ कोटि एकर जमीन हस्तांतरित झाली पाहिजे. जमिनीवरील मालकी हक्काच्या प्रवृत्तीचें अंतीं निराकरण करावयाचें असून ' सब भूमि गोपालकी ' अशी स्थिति निर्माण करावयाची आहे. "

मालकी हक्काचा मोह जसा श्रीमंतांना असतो तसा गरिबांनाहि असतो, म्हणून त्यांनींहि आपल्या जमिनींतला हिस्सा द्यावा असें ते म्हणतात. बहुजनसमाजाच्या भाग्याशीं आपलें भाग्य जोडण्याची वृत्ति समाजाच्या सर्वच थरांत निर्माण झाली पाहिजे. ते म्हणतात: " माझी पहिली मागणी गरिबांकडून आहे. माझ्या या मागणीचें लोकांना आश्चर्य वाटतें. परंतु प्रत्येकाचा उद्धार हा त्याच्या आत्मबलानें होत असतो हें लक्षांत ठेवलें तर त्यांत आश्चर्य वाटण्यासारखें कांहीं नाहीं. " पुढें एका ठिकाणीं त्यांनीं सांगितलें आहे : " गरीब जमीन देतो त्याचा नैतिक परिणाम समाजावर होतो. श्रीमंतांवर एक नैतिक दबाव पडतो. दान देणारे गरीब हे माझ्या अहिंसक सेनेचे सैनिक बनतात. "

● ● ●

दिल्लीला पोंचल्यावर आठवडाभर राजघाटाच्या सान्निध्यांत विनोबाजींचा मुक्काम होता. राष्ट्रपति व पंतप्रधानांनीं त्यांचें स्वागत केलें. राष्ट्रपतींनीं भूदान यज्ञांत आपला हविर्भाग अर्पण केला. नियोजन मंडळाचे सदस्य विनोबांच्याकडे आले. खुल्या दिलानें त्यांच्यांत चर्चा झाली. परदेशांतून धान्य न मागविण्याची सरकारनें केलेली प्रतिज्ञा मोडल्याबद्दल विनोबाजींनीं तीव्र आलोचना केली. अशा राष्ट्रीय प्रतिज्ञाभंगामुळें लोकांमधली निर्धारशक्ति कमी होते, असें ते म्हणाले. येत्या पांच वर्षांनंतर सर्वसामान्य परिस्थितींत परदेशांतून धान्य मागविलें जाणार नाहीं असें सरकारतर्फें आश्वासन देण्यांत आलें.

सर्वांना रोजगाराची हमी दिल्याखेरीज कोणतीहि योजना नॅशनल —राष्ट्रीय म्हणतां येणार नाहीं असें विनोबाजी म्हणाले. तेव्हां नियोजन मंडळाचे एक सभासद म्हणाले : " हें नॅशनल प्लॅनिंग नसून पार्शल प्लॅनिंग आहे. " विनोबा म्हणाले : " जर हें नॅशनल प्लॅनिंग नसून पार्शल प्लॅनिंग असेल तर ही पार्शलिटी—हा पक्षपात गरिबांसाठीं असला पाहिजे, श्रीमंतासाठीं नव्हे. "

तिसरा मुद्दा विनोबांनीं असा मांडला कीं कार्यक्षमतेच्या गोष्टी करण्यापूर्वीं सर्वांना रोटी देतां येईल असा कार्यक्रम हातीं घेतला पाहिजे. विनोबांनीं आपली बाजू अत्यंत समर्थपणें नियोजन मंडळापुढें मांडली व त्या अनुषंगानें नियोजनाच्या अखेरच्या मसुद्यांत योग्य तो फेरफार करण्यांत आला. खादी व ग्रामोद्योगांचा आणि बेसिक शिक्षणपद्धतीचा योजनेंत समावेश करण्यांत आला. पांच वर्षांत अन्नस्वावलंबन साधण्याचा कार्यक्रमहि ठरविण्यांत आला.

दिल्लींतून प्रयाण करण्याच्या वेळेस विनोबांना तापानें घेरलें. लोक म्हणाले : " थांबा, विश्रांति घ्या. " पण विनोबांनीं ऐकलें नाहीं. ते म्हणाले : " काम झाल्याशिवाय विश्रांति कसली ? रामकाज साधे बिना मोहीं कहाँ विश्राम—रामरायाचें कार्य साधल्याशिवाय विश्रांति कोठली ? " दिल्लींतून पुन्हां उत्तर प्रदेशची यात्रा सुरू झाली.

● ● ●

विनोबांच्या भूदान कार्यानें या वेळेपावेतों सर्वांचें लक्ष वेधून घेतलें यांत शंकाच नाहीं. त्यांच्या ह्या कार्यामुळें देशभर विचारमंथन सुरू झालें. भूदानासंबंधीं सर्वत्र एक प्रकारचें कुतूहल निर्माण झालें. जयप्रकाशजी या चळवळीकडे बारकाईनें पहात होते. समाजवादी तत्त्वज्ञानाच्या कसोटीवर चळवळीची परीक्षा करीत होते. लोकशाही राजवटींत

हिंसक साधनांचा आश्रय त्याज्य आहे हें त्यांनीं कधींच मान्य केलें होतें. भूदानाबाबत ते म्हणतात : " जमिनीचें फेरवांटप करून जास्तींत जास्त भूमिहीन शेतमजुरांना जमीन मिळवून देण्याच्या मुद्यावर भारताची आर्थिक क्रांति अडखळली होती. भारतांतील आर्थिक क्रांतीच्या कार्यक्रमांतील सर्वांत पहिलें आणि महत्त्वाचें पाऊल म्हणजे जमिनीचें न्याय्य फेरवांटप. कारण कृषिप्रधान भारतांत शेती हाच सर्वांत मोठा व मूलभूत धंदा आहे. ह्या व्यवसायांत समानतेचें तत्त्व दाखल झाल्याशिवाय आर्थिक समानतेला कांहीं अर्थच उरत नाहीं. कॉंग्रेसनें या आर्थिक क्रांतीला घाबरून तिच्याकडे पाठ फिरवली. समाजवाद्यांनीं या क्रांतीचें शिंग तर चहूंकडे फुंकलें. पण प्रत्यक्ष व्यवहारांत त्यांनाहि फारशी प्रगति करतां आली नाहीं. याचेंच निमित्त करून कम्युनिस्टांनीं तेलंगणांत सतत तीन वर्षे दहशत निर्माण केली, परंतु तरीहि प्रश्न तसाच कायम राहिला.

" या दरम्यान संत विनोबा या प्रश्नाचें उत्तर शोधण्यासाठीं पायीं निघाले. हवा, पाणी, प्रकाश यांच्याप्रमाणेंच जमीन हीहि ईश्वरानें दिलेली एक देणगी आहे, त्यामुळें तिच्यावर सर्वांचा समान अधिकार असला पाहिजे, हा अभिनव मंत्र त्यांनीं उच्चारला. धर्म आणि न्याय यांच्या नांवानें, देशहित आणि लोकहित यांच्यासाठीं त्यांनीं भूस्वामींकडून जमिनीची मागणी केली. हें सर्व विलक्षणच होतें. लोक हंसले. विद्वान लोक म्हणाले : मागून कुठें कधीं कुणाला जमीन मिळाली आहे का ? पण एकट्या विनोबांनीं वर्ष दीड वर्षाच्या काळांत केवळ मागून साडे तीन लाख एकर जमीन मिळविली ! साऱ्या देशाचें, नव्हे, जगाचें लक्ष या विलक्षण कल्पनेनें वेधून घेतलें आहे. देशांत असें वातावरण तयार झालें आहे कीं ही अडखळलेली आर्थिक क्रांति सर्व बंधनें तोडून भरवेगानें पुढें जाईल.

" महात्माजींनीं राष्ट्रीय क्रांतीचें अहिंसक रूप जगाला दाखविलें, विनोबा आर्थिक क्रांतीचें अहिंसक रूप आपल्यापुढें ठेवीत आहेत. स्वराज्याच्या लढाईच्या काळांत बरेचसे क्रांतिकारक याच काथ्याकुटांत गुंतून पडले होते कीं अहिंसेनें कुठें स्वराज्य मिळालें आहे का ? आज तसलाच काथ्याकूट आर्थिक क्रांतिबाबत चालू आहे आणि या आंधळ्या क्रांतिकारकांच्या डोळ्यांदेखत क्रांति आपला ध्वज फडकवूं लागली आहे." जयप्रकाशजींच्याप्रमाणें ज्यांनीं ह्या चळवळीचें सूक्ष्म निरीक्षण केलें त्यांनाहि या चळवळींतील क्रांतिकारकता दिसून आली.

★ ★ ★

# धर्मचक्र प्रवर्तन

भूदान यज्ञाच्या कार्यक्रमामुळें स्वातंत्र्योत्तर काळांत समाजांत पसरणारें वैफल्य व निराशा यांना आळा बसला. विधायक कार्यकर्त्यांना नवें चैतन्य मिळालें. क्रांतिवृत्तीच्या तरुणांना नवें आवाहन पोंचलें. सेवापुरीच्या सर्वोदय समाजाच्या संमेलनावर भूदान यज्ञाची गहिरी छाया पडली होती. उत्तर प्रदेशांत भूदान यज्ञाला भरघोस यश लाभलें. बनारसला पोंचेपर्यंत एक लाख एकरांचें दान पूर्ण झालें. विनोबा विनोदानें म्हणाले : " आतां मी लखपति झालों ! " या मार्गानें भूमीचा प्रश्न सुटूं शकेल असा विश्वास कार्यकर्त्यांना वाटूं लागला. १९५४ च्या एप्रिलपर्यंत हिंदुस्थानांत २५ लाख एकर जमीन मिळविण्याचा सेवापुरीला संकल्प करण्यांत आला. प्रांताप्रांतांनीं आपापले हिस्से ठरवून घेतले.

विनोबाजींच्या भूदान यज्ञाच्या कल्पनेंत नित्य नूतन विकास होत आला आहे. ते नेहमीं म्हणतात : " अपयशांतून यशाकडे हा माझा मार्ग नाहीं. लहान यशांतून मोठ्या यशाकडे हा माझा क्रम आहे. " जसजसें काम वाढत गेलें तसतसा उद्दिष्टांतहि विकास झाला, तें व्यापक बनत गेलें. नवनवीन विचारांची भर पडूं लागली.

एका ठिकाणीं विनोबाजींनीं सांगितलें आहे : " षष्ठांश मधुयायी—सहावा हिस्सा राजाला मिळाला पाहिजे, असा आमचा रिवाज आहे. आज दरिद्रनारायण हा आमचा राजा आहे. महंमद पैगंबर एकदां जंगलांत फिरत होते. दोन शिष्य बरोबर होते. तेवढ्यांत मोठी शत्रुसेना आली. शिष्य म्हणाले : ' शत्रूची सेना मोठी आणि आम्ही तर फक्त तिघेच ! ' महंमद म्हणाले : ' आम्ही तिघे नाहीं, चार आहोंत. तो चवथा दिसत नाहीं, पण आहे मोठा जबरदस्त. ' त्याचप्रमाणें मी म्हणतों : " कुटुंबांत तुम्ही पांच नाहीं सहा



आहांत. आणि तो अदृश्य असा सहावा दरिद्रनारायण, तो आहे मोठा जबरदस्त." ह्या जबरदस्त बलाच्या सहाव्या दरिद्रनारायण बंधूची आठवण विनोबा ह्या आंदोलनाच्या निमित्तानें सर्वांना करून देत आहेत.

दुसऱ्या एका ठिकाणीं ते म्हणाले : "कोणी कमी जमीन दिली तर मी घेत नाहीं. गरिबांना लाचार बनविण्यासाठीं ही चळवळ नाहीं. भूदान मागणें म्हणजे भिक्षा मागणें नव्हे, दीक्षा देणें आहे. मी तर गरिबांचा हक्क या स्वरूपांत जमीन मागतों. त्यांना जर शिजवून भरविलें असतें तर ते लाचार बनले असते. पण त्यांना आम्ही जमीन देतों म्हणजे पुरुषार्थाची संधि देतों. स्वतः कष्ट करून त्यांना पीक घ्यावें लागेल. यांत गरिबांना दीन बनविण्याचा प्रश्नच कोठें येतो ?"

● ● ●

भूदानाच्या चळवळीला थोडें फार यश येऊं लागल्याबरोबर कांहीं लोकांनीं कायद्याच्या मागणीचा धोशा सुरू केला. तेव्हां विनोबा म्हणाले : "आई मुलावर काय कायद्यानें प्रेम करते ! ती कायद्याच्या भीतीनें आपल्या मुलांना दूध पाजते कीं काय ?

समाजांत जें अन्याय आणि दु:ख आहे तें आमच्या अंत:करणांत खरें प्रेम जागृत असेल तरच समूळ नाहींसें होऊं शकेल. कायद्यानें प्रश्न सुटलासा वाटतो. पण एक कायदा, हजार पळवाटा; अशी कायद्याची स्थिति होते ! कायद्याच्या बडग्यानें गोष्टी करून घ्यायचें आपण ठरविलें तर किमान असेल तेवढेंच करण्याकडे माणसाचा कल होतो. कायद्यांत जो बळजबरीचा भाव आहे त्यामुळें एक प्रकारची कटुता निर्माण होते, द्वेष पसरतो.

"भूदानांत द्वेषमत्सराला थारा नाहीं. येथें किमान करण्यासाठीं बडगा दाखवायचा नसून, हृदयांतला रामराय जागवून कमाल करून दाखवायचें आहे. परंतु मला कायदा नको आहे असा याचा अर्थ नाहीं. कायदे दोन तऱ्हेचे असतात. एक कायदा वरून लोकांवर लादला जातो. दुसऱ्या प्रकारचा कायदा हा लोकमतनिदर्शक असतो. लोकमतावर शिक्कामोर्तब करण्याचें काम तो करतो. लोकमानस तयार असेल तर पडछायेप्रमाणें कायदा हा मागून चालत येईल. पण जर लोकमानस तयार नसेल तर कायद्याचे शब्द पाळल्याचे देखावे दिसतील; पण कायद्यामागचें तत्त्व मात्र ध्यानांत घेतलें जाणार नाहीं. आणि कायदा करण्याच्या मार्गांत मी अडथळा तर आणलेलाच नाहीं. या चळवळीनें असें वातावरण तयार होत आहे कीं त्यामुळें पुरोगामी कायदा करणें सुलभ व्हावें.

" आणि आज कायद्याची गोष्ट काढली कीं लगेच मोबदल्याचा प्रश्न समोर उभा राहातो. देशांतील कोट्यवधि एकर जमीन जमीनदारांकडून काढून घ्यायची म्हटलें तर मोबदला देण्यासाठीं एवढी प्रचंड रक्कम आणायची कोठून ? भूदानामुळें हा मोबदल्याचा प्रश्नच सुटून जातो. कारण भूदानांत मोबदल्याचा मुद्दा कुणी काढीत नाहीं. एवढेंच काय जेथें जमीनदारी नष्ट करण्याचे कायदे झाले तेथें त्या मोबदल्याचेंहि दान मी मागितलें आणि तें मिळालेंदेखील.

" जमीन धारण करण्याची कमाल मर्यादा ठरविण्याचीहि मागणी लोक करतात. पण देशांतले वेगवेगळे पक्ष जी कमींत कमी कमाल मर्यादा सुचवितात ती जरी अंमलांत आणायचें ठरविलें तरीहि गरिबांना त्यामुळें फारशी जमीन मिळण्याचा संभव नाहीं. आज दहापांच एकरवाल्यांकडूनहि आम्ही जमीन मागूं शकतों आणि ते देतातहि. पण जर जमीन-धारणेची कमाल मर्यादा आपण ठरविली तर त्या मर्यादेपेक्षां ज्यांच्याजवळ कमी जमीन आहे त्यांच्यापासून एकादा गुंठाहि जमीन मिळण्याचा संभव नाहीं. माझें म्हणणें असें कीं कमाल मर्यादेचा नाद सोडा, किमान मर्यादा आधीं ठरवा व तेवढी जमीन प्रत्येकाच्या

ांच्याला आल्यानंतर जर कांहीं उरली तर मग जास्ती देण्याचा विचार करा. शेतकऱ्याला आपल्या किमान आवश्यक गरजा भागवितां येतील एवढी जमीन देण्याचा भूदानाचा दावा आहे. ''

० ० ०

कांहीं चिकित्सक मंडळी म्हणतात, भूदानामुळें जमिनींच्या लहान लहान चिरोट्या पडतील. ह्यामुळें शेतींतलें उत्पादन घटेल, कारण लहान शेतकरी नीट मशागत करूं शकणार नाहीं. परंतु स्वतः विनोबांच्या आश्रमांत जे प्रयोग झाले त्यावरून असें सिद्ध झालेलें आहे कीं, लहान तुकड्यांतहि एकाग्र कष्ट केले तर ती जमीन अधिक उत्पादन देते. जपानसारख्या देशांत तर अर्धा पाऊण एकरांतहि भरपूर उत्पादन काढणारे शेतकरी आहेत. विनोबाजी म्हणतात : '' भूहीन शेतकऱ्यांसाठीं पांच कोटि एकर जमीन एकत्र करून वांटायची म्हटलें तर त्यांत थोड्याफार प्रमाणांत लहान तुकडे होतील ही गोष्ट मान्यच केली पाहिजे. परंतु भूदानाच्या एकंदर व्यापाचा विचार करतां हें प्रमाण फार अल्प असेल. जमिनीचे तुकडे होणें ही खरी भीतिदायक गोष्ट नाहीं. मानवी हृदयाचे आज तुकडे बनले आहेत ही खरी दुःखाची गोष्ट आहे. जर परस्परांत सदिच्छा, स्नेह व विश्वास निर्माण झाला तर हे तुकडे जोडले जाऊं शकतील. पण सामाजिक आणि आर्थिक विषमतेमुळें हृदयाचे पडलेले तुकडे जर आम्ही जोडले नाहींत तर याचा स्पष्ट अर्थ असा आहे कीं आम्ही आपला देश संकटाच्या खाईंत लोटीत आहोंत. शिंपी कपडे कापतो, पण ते पुन्हां एकत्र शिवण्यासाठीं. योग्य मेहनतीनें जमिनीचें लहान क्षेत्रहि भरपूर उत्पादन देऊं शकतें ही गोष्ट नियोजन मंडळानेंहि मान्य केली आहे. आणि मोठ्या प्रमाणावर फार्म्स बनविण्यानें उत्पादन वाढतेंच असाहि अनुभव नाहीं, उलट एका नव्या गुलामगिरीचा मात्र जन्म ह्या फारमदारी पद्धतीनें होणार आहे ! भूदानांत मिळालेल्या लहान तुकड्यांची अदलाबदल करून किमान निर्वाहक्षेत्राएवढा जमिनीचा तुकडा बनावा असा प्रयत्न केला जाईल. आणि जर हें शक्य झालें नाहीं तर अशा लहान तुकड्यांचा उपयोग गांवांतील सार्वजनिक उपयोगासाठीं केला जाईल. ''

सहकारी शेती करण्याबाबतहि कांहीं लोक प्रश्न विचारीत. त्याबाबत विनोबांचें म्हणणें असें : '' मला असा पूर्ण विश्वास वाटतो कीं सहकारी पद्धतीचा प्रयोग हमखास यशस्वी होईल. पण युक्तीयुक्तीनें आणि हिशोबानें तें करावें लागेल. सहकारी शेतीशिवाय भारताचें चालणार नाहीं, असेंच मी मानतों. परंतु ज्यांना जमिनीची मालकी ही काय

चीज आहे हें माहीत नाहीं, सहकारी पद्धत आणि हिशेब यांचें ज्यांना ज्ञान नाहीं, त्यांच्यावर सहकारी पद्धत लादणें इष्ट होणार नाहीं." विनोबांचे हे उद्गार यथार्थ आहेत. आज ज्या सहकारी संस्था चालतात त्यांच्या कारभाराकडे पाहिलें म्हणजे असें वाटतें कीं सहकारी शेतीसाठीं अजून योग्य काळ यायचा आहे. आज सहकारी संस्थांचें चाललेलें काम पाहिलें कीं हिंदुस्थानांतील शेती सहकारी पद्धतीनें आजच कसणें किती अवघड आहे याची कल्पना येते.

जमिनीचें वांटप हा भूदानाचा अंतिम उद्देश नव्हे. तें पहिलें पाऊल आहे. शेवटीं जमिनीवर कोणाचेंहि स्वामित्व नाहीं, ही गोष्ट सिद्ध करायची आहे. 'जमिनीचे आपण मालक' ही लोकांच्या मनांत घट्ट बसलेली भावना नाहींशी झाली म्हणजे आपोआपच सहकारी पद्धतीचा मार्ग मोकळा होतो.

● ● ●

जमिनीच्या फेरवांटपासाठीं कायदा किंवा दान यांच्यापेक्षां सत्याग्रह केला तर हा प्रश्न लौकर सुटेल अशा कल्पनेनें कांहीं मंडळी सत्याग्रहाचीहि मागणी करतात. लोकशाही यथार्थ होण्याच्या दृष्टीनें प्रसंगीं प्रतिकारात्मक सत्याग्रह केला जाऊं शकतो, असेंच विनोबाजी मानतात. परंतु गांधीजींनीं दाखविलें तेंच सत्याग्रहाचें अंतिम रूप असें ते मानीत नाहींत. सत्याग्रहांत अनंत सुप्त सामर्थ्य आहे आणि साधकानें सतत संशोधन व प्रयोग करून हें सामर्थ्य अवगत करून घ्यावें, असें विनोबा म्हणतात. अंतःप्रेरणा जसजशी तीव्र होत जाईल तसतसा सत्याग्रहाचा आविष्कार अधिकाधिक सौम्य होत जाईल असें ते सांगतात. त्यांना एकदां सत्याग्रहाबाबत विचारलें असतां ते म्हणाले: "माझी जी कांहीं थोडीथोडकी प्रतिष्ठा आहे ती सत्याग्रही म्हणूनच आहे. आज मी जें कांहीं करीत आहे तोहि सत्याग्रहच आहे. वेळ आली तर प्रतिकारात्मक सत्याग्रहहि हातीं घेतला जाऊं शकेल. परंतु सध्यां एकच पाऊल मी पुरेसें मानतों. प्रेम हा आमच्या चळवळीचा आधार आहे. जर प्रेमानें आमचें काम झालें तर प्रश्नच मिटला. पण जर प्रेमानें झालें नाहीं तर झगडाहि करावा लागेल पण तो झगडाहि प्रेमाचाच होईल. तसें पाहिलें तर सरकार या कल्पनेलाच आमचा विरोध आहे आणि जगांतल्या सगळ्याच सरकारांशीं आमचा एक प्रकारचा झगडा आहेच!"

कत्तल, कानून कीं करुणा असा मानवापुढें प्रश्न आहे. कत्तलीनें कोठलाहि प्रश्न सुटत नाहीं असा आजवरचा जगाचा अनुभव आहे. कायदा करुणेवांचून निष्प्रभ आणि

अमानुष बनतो. करुणेशिवाय कायदाहि उपकारक ठरूं शकत नाहीं. शेवटीं कणव–करुणा हाच मानवजातीला शोभेसा मार्ग होऊं शकतो आणि विनोबांचा प्रयत्न तोच आहे.

• • •

आज समाजांत अशी समजूत रूढ होऊन बसली आहे कीं, मजूर, श्रमिक म्हणजे शहरांतील कारखानदारींत राबणारा मजूर. वास्तविक कारखानदारी मजुरांची आर्थिक स्थिति थोडी फार बरी आहे. कारखानदारी मजूर एका ठिकाणीं आयते सांपडतात, त्यामुळें संघटित होऊन ते आपले प्रश्न त्वरेनें सोडवूं शकतात. पण सर्वांत जास्त नागविला जाणारा मजूर वर्ग शेतांत काम करणारांचा. त्यांच्यासाठीं कोणी झगडत नाहीं, त्यांची बाजू घेऊन भांडत नाहीं. विनोबा म्हणतात : “ माझें हें आंदोलन मजुरांचें आहे. अशा मजुरांचें कीं जे सर्वांत कमजोर आहेत. बेजमीन, बेजबान आहेत. शहरी मजुरांचीं आंदोलनें थोडीं फार झालीं आहेत; पण खेड्यांत पसरलेल्या ह्या भूमिहीन मजुरांकडे कोणीं लक्ष दिलें आहे ? ह्या उपेक्षित व सर्वांत दलित अशा मजुरांचा प्रश्न मीं हातीं घेतला आहे. माझ्या आयुष्यांतील ऐन उमेदींचीं ३२ वर्षें मी मजुरी करण्यांत घालविलीं आहेत. समाज जीं कामें हीन मानतो मजुरींचीं तीं कामेंहि मीं केलीं आहेत. माझें हें आंदोलन मजुरांचें आंदोलन आहे. ह्या कामांतून जमिनीचा प्रश्न सुटूं शकेल, उत्पादनाची वाढ होऊं शकेल, समाजांतला न्याय वाढेल, गांवांत एकजुटीची भावना व उच्च जीवनाची प्रेरणा निर्माण होईल. राजकारणांत आज जें दूषित वातावरण दिसतें तें नाहींसें होण्याला मदत होईल. समाजांतील धर्मभावना वाढेल. देण्याची वृत्ति निर्माण होईल. मोठी मजूर चळवळ निर्माण होईल. ”

विनोबा गरीब शेतकऱ्यांकडूनहि जमिनीची मागणी करतात. कांहीं लोक यामुळें नाराज होतात. कोणी म्हणतातः गरिबांना असें लुटणें बरें नाहीं. विनोबा असा आक्षेप घेणारांना सांगतात : “ मोठ्या जमीन मालकांकडून तर मी जमीन घेणारच आहे. पण माझी इच्छा मात्र अशी आहे कीं दान प्रत्येकानें करावें. याचा अर्थ मी सर्वांकडून सारखेंच दान मागतों असा मात्र नाहीं. आपल्या सर्वसामान्य गरजा भागण्याइतकी जमीन ठेवून बाकीची सर्वच्या सर्व जमीन जमीनदारांनीं द्यावी असें मी सांगतों. गरीबांकडून मी केवळ प्रतीक म्हणून थोडीशी मागतो. गरीबांकडूनहि जमीन मी घेतों, त्याचीं चार कारणें आहेत ( १ ) आज समाजांत सर्वांत दलित भूहीन शेतकरी आहे. त्याच्या मानानें थोडी जमीन जवळ असलेला शेतकरीहि बरा म्हणतां येईल. समाजांतील जो सर्वांत अधिक

दलित, दुःखी त्याला कणवेनें सर्वांनीच दिलें पाहिजे. ( २ ) जमिनीवर कोणाची मालकी नाहीं. हें साऱ्या समाजाला मी शिकवूं पाहातों. श्रीमंतांप्रमाणें थोडी जमीनवालेहि स्वतःला जमिनीचे मालक समजतात. दोघांच्याहि स्वामित्वभावनेचें निरसन करावयाचें आहे. ( ३ ) श्रीमंतांकडून जमीन मागायची तर त्यांच्यावर कांहींतरी नैतिक दडपण पडलें पाहिजे. हजारों गोरगरिबांच्यां दानांमुळे असें नैतिक बळ निर्माण होत असतें. ( ४ ) गरीब दाते हे दान देऊन जणुं आपलीं नांवें आमच्या अहिंसक सेनेंत नोंदवितात. माझ्या या सेनेचें सामर्थ्य इतकें अतुल असेल कीं कदाचित् प्रत्यक्ष लढा करण्याची पाळीच येणार नाहीं. ‘ हुंकारणैव धनुषः ’ केवळ धनुष्याच्या टणत्कारानेंच काम होऊन जाईल. ”

● ● ●

भूदानाच्या चळवळीला विनोबा आंदोलन म्हणत नाहींत, आरोहण म्हणतात. आरोहण म्हणजे वर चढणें. या कामाचें एकेक पाऊल पुढें पडत जाईल तसतसा समाजाला एकेक पायरी वर चढल्याचाहि अनुभव आला पाहिजे. केवळ पाऊल पुढें पडलें ही समाधानाची गोष्ट होऊं शकत नाहीं, पातळीहि वाढली पाहिजे. जमिनीचा सहावा हिस्सा हें पहिलें पाऊल झालें. संपत्तिदान, साधनदान, श्रमदान, अशीं पुढचीं पावलें आहेत. अखेर सारा समाज एका कुटुंबासारखा प्रेममय व विषमतारहित बनवायचा आहे.

विनोबा ह्या कार्याला धर्मचक्र प्रवर्तन असें संबोधतात. भगवान् बुद्धांनीं दिलेला संदेश दोन हजार वर्षांपूर्वी जसा साऱ्या जगभर पसरला व एक सांस्कृतिक नवरचना घडून आली, त्याप्रमाणें भूदानाचा संदेश जगभर पसरून नवें विश्व निर्माण होईल, असा विश्वास विनोबांना वाटतो. अहिंसेनें राजकीय स्वातंत्र्य मिळूं शकतें, हा विश्वास गांधीजींच्या कार्यामुळें जगांतील दलितपीडित राष्ट्रांत निर्माण झाला आहे. अहिंसक साधनानें आर्थिक विषमतेचाहि निरास करतां येतो, हें भूदान आरोहणांतून दिसलें पाहिजे. विनोबा म्हणतात : “ जें काम भगवान् बुद्धांकडून ईश्वरानें करवून घेतलें तेंच आज तो माझ्या ह्या दुबळ्या हातांकडून करवून घेऊं चाहतो आहे. हें माझें कामहि धर्मचक्र-प्रवर्तनाचेंच आहे. बुद्धाच्या पावलावर पावलें टाकीत हें धर्मचक्र–प्रवर्तनाचें कार्य पुढें चालविण्याची माझी नम्र आकांक्षा आहे. ”

★ ★ ★

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे. स्थळप्रत.
अनुक्रम ............ वि: ............
क्रमांक ............ नों. दि. ............

# क्रांतिकारी आंदोलन

सुरुवातीला विनोबांचें व्यक्तिमत्त्व मोठें भेदक व करारी होतें. त्यांच्याजवळ जायलाहि लोकांना भीति वाटे; परंतु आंबा पिकून जसा मधुर व्हावा तसें त्यांचें व्यक्तिमत्त्व दिवसेंदिवस मधुरतर होत आहे. सर्वांशीं त्यांची वागणूक अत्यंत स्नेहप्रेमाची असते. त्यामुळें देशांतील सर्व पुरोगामी लोकशाही शक्तींनीं त्यांच्या भूदान यज्ञ आंदोलनाला सक्रिय पाठिंबा दिला आहे.

गांवाची सबंधच्या सबंध जमीन मिळण्याचीं उदाहरणें घडलीं. नित्य सहस्र दानपत्रें मिळण्याचा उच्चांक प्रस्थापित झाला. एकेका दिवशीं लाख एकरांचें दानहि मिळण्याचे प्रसंग घडले. संपत्तिदान यज्ञ व श्रमदान यज्ञ ह्यांचे पूरक कार्यक्रम सुरू झाले. विनोबाजींची आतां अशी अपेक्षा आहे कीं, समाजांतील एकहि व्यक्ति ह्या आंदोलनाचा स्पर्श न होतां कोरडी राहतां कामा नये. खरी क्रांति करावयाची तर समाजाच्या सर्व थरांतील व्यक्तींना तिचा स्पर्श झाला पाहिजे. या दृष्टीनें विनोबांनीं भूदान यज्ञाचा एक दहा कलमी कार्यक्रम कार्यकर्त्यांसाठीं निर्देशिला आहे.

१—प्रत्येक गांवांतील सर्व भूमिहीन शेतकऱ्यांसाठीं जमीन मिळवावयाची आहे.

२—भूदान यज्ञांत प्रत्येक लहानमोठ्या जमीनदाराचा तसाच शेतकऱ्याचा हविर्भाग आपण मिळविला पाहिजे.

३—गांवची सर्वच्या सर्व जमीन मिळूं शकत असेल तर तसा प्रयत्न करावा. त्यामुळें ग्रामराज्यांची मुहूर्तमेढ रोवतां येईल.

४—अक्षय संपत्तिदान मिळविण्याचा प्रयत्न केला जावा. त्यांतून गरीब भूमिहीनांना जमिनीशिवाय इतर गरजेच्या वस्तु देतां येतील.

५—ग्रामोद्योग, ग्रामसफाई व व्यसनमुक्ति ह्यांबद्दलचे विचार समजून सांगितले जावेत.

६—सामाजिक कार्यासाठीं स्त्रियांनाहि उद्युक्त केलें जावें.

७—शिक्षक व विद्यार्थी यांच्या द्वारां व्यापक जनसंपर्क साधला जावा.

८—पक्षभेद, जातिभेद, धर्मभेद इत्यादि सर्व प्रकारच्या भेदांपासून निर्लिप्त राहून काम करण्याची वृत्ति निर्माण केली जावी.

९—नवविचार पसरविण्यासाठीं आवश्यक त्या साहित्याचा प्रचार खेडोपाडीं व्हावा.

१०—जेथें शक्य असेल तेथें समग्र ग्रामसेवेसाठीं सर्व सेवा संघ स्थापन केले जावेत.

भूदान यज्ञाच्या कार्यक्रमाबद्दल अजूनहि कांहीं लोकांच्या मनांत शंका आहेत. त्यासाठीं विनोबांचें साहित्य त्यांनीं अभ्यासावें हें उत्तम. दान मिळालेल्या जमिनींची खातरजमा करून योग्य ते कायदेशीर कागदपत्र तयार करून घेतले जातात. मिळालेल्या जमिनींच्या वांटपाबद्दलहि निश्चित धोरण ठरलेलें आहे.

## भूमिवितरणाचे नियम

भूदान यज्ञांत मिळालेली जमीन वांटण्यासाठीं आधीं एक दिवस निश्चित ठरवावा. जेथें वितरण व्हावयाचें तेथील लोकांना आठ दिवस आधीं दौंडी देऊन कळवावें. आदल्या दिवशींहि पुन्हां दौंडी द्यावी.

गांवांतील सर्व लोकांना जाहीर सभा भरवून एकत्र बोलवावें व त्यांच्या समक्ष भूमिहीन कोण, याचा तपास करावा. वितरणाचें कार्यहि जाहीर सभेंतच करण्यांत यावें.

वितरणाचें काम शक्यतों सर्वांच्या संमतीनें व्हावें. जर तें शक्य न झालें तर भूमिहीनांच्या मतानें निर्णय घ्यावा. त्यांतूनहि निर्णय ठरविणें कठिण झालें तर अखेर चिठ्ठया टाकून निर्णय घ्यावा. या कामीं गांवांतील सज्जन व महाजन यांचें सहकार्य घ्यावें. कारण त्यामुळें नंतर भूमिहीनांना अडीअडचणींत ते मदत करतील.

मिळालेल्या जमिनीचा निदान तिसरा हिस्सा शक्यतों हरिजनांना वांटावा. ज्या गांवांतील जमीन त्याच गांवांतील भूमिहीनांना शक्यतों द्यावी. त्यांना वांटून उरल्यास



शेजारच्या गांवांतल्या भूमिहीनांना द्यावी. फार मोठ्या प्रमाणावर जमीन असेल तर नवीं गांवें वसवावींत.

ज्यांना दुसरा धंदा नाहीं अशा भूमिहीनांनाच प्रथम जमीन देण्यांत यावी.

पांच माणसांच्या कुटुंबाला एक एकर पाण्याखालची किंवा २॥ ते ५ एकर कोरडवाहू अशी जमीन सामान्यतः द्यावी. स्थानिक परिस्थिति लक्षांत घेऊन जरूरीप्रमाणें ५ एकरांवरहि जमीन दिली जाऊं शकेल.

जमीनवांटपाच्या दृष्टीनें मिळालेल्या लहान तुकड्यांची अदलाबदल करावी लागल्यास ती गांवांतल्या गांवांतच करावी. जमिनीचे लहान लहान तुकडे मिळाले असतील व लहान असल्यानें ते भूमिहीनांना वाटतां येणार नसतील तर ज्यांच्याजवळ थोडी जमीन आहे अशांना ते देण्यांत यावेत. जर हें शक्य नसेल तर ही जमीन कंपोस्ट, संडास इत्यादि गांवच्या सार्वजनिक कामांसाठीं वापरण्यांत यावी.

ज्यांना भूदान यज्ञांतील जमीन मिळेल त्यांना दहा वर्षे ती विकतां येणार नाहीं.

जमीन घेतांना जर तिची मशागत झालेली असेल तर तिचा सारा जमीन घेणारांनीं भरावा.

दान मिळालेली जमीन जर दोन वर्षांत वहितीखालीं न आली तर ती ताब्यांत घेऊन दुसऱ्या बेजमीन किसानाला देण्याचा अधिकार सरकारला असेल.

जमिनीचें वांटप करतांना आणखी भूमिदान मिळवून गांवांतील राहिलेल्या भूमिहीनांना वांटण्याचा प्रयत्न करावा.

पडित जमीन मिळाली असेल तर ती वहतीखालीं आणण्याला तीन वर्षांची मुदत असावी.

• • •

महाराष्ट्रांतील शेतकरी कामकरी पक्षानें भूदान यज्ञाला विरोध करणारा एक मोघम ठराव पास केला होता. विनोबांनीं त्या ठरावाला अत्यंत नम्र पण समर्पक उत्तर दिलें आहे. बहुसंख्य आक्षेपांना त्यांत उत्तर आहे म्हणून विनोबांचें तें उत्तर सारांशानें पुढें दिलें आहे:

शेतकरी कामकरी पक्षाच्या भूदान यज्ञाच्या विरोधाचा अर्थ काय करायचा? आज सर्वांची वृत्ति संचयाची, ती जर संविभागाकडे—सम्यक विभजनाकडे वळली तर त्यांत नुकसान कोठलें? अहंकारानें कोणी दान देऊं नये असें म्हटलें जाऊं शकेल, पण मीहि तर तसें म्हणत आहेच.

मिळणारी जमीन भूमिहीनांनीं घेऊं नये, असा याचा अर्थ आहे कीं काय? पण त्यांत भूमिहीनांचा फायदा काय? त्यांनीं दीन बनून जमीन घेऊं नये असें फार तर म्हणतां येईल, तें तर मीहि सांगत आहेच. भूदान यज्ञाच्या पहिल्या दिवसापासून मी म्हणत आलों आहे कीं भूमि देऊन आम्ही भूमिहीनांवर कांहीं उपकार करीत नसून फक्त त्यांचा अधिकार तेवढा त्यांना देत आहोंत.

दोनशें एकरांच्या मालकानें जर एकदोन एकर जमीन दिली तर ती घेऊं नये असा याचा अर्थ आहे का? जर तसा अर्थ असेल तर तो मला मंजूरच आहे. आणि मी तसें करीतहि आलों आहें. आतां तर मी सहावा हिस्सा मागतों. दहा हजार एकरांच्या मालकानें नऊशें एकर देऊं केले तरी मी नाकारले आहेत. अशीं कितीतरी उदाहरणें आहेत. सहावा हिस्साहि सर्वसामान्य लोकांकडूनच मीं घेतला आहे. जर मोठ्या जमीन-मालकांनीं सहावा हिस्सा दिला तर तो फार तर पहिला हप्ता असेल, असें मी जाहीर केलें आहे.

Ce27

आमच्या चळवळीमुळें सरकारकडून पुरोगामी कायदा होण्यांत अडचण येईल, असें त्यांना सुचवायचें आहे कीं काय ? पण मी तर कोणाचे हात धरले नाहींत. उलट भूदान यज्ञामुळें आज जें वातावरण निर्माण होईल त्यामुळें पुरोगामी कायदा होण्याला मदतच होईल.

भूदान यज्ञामुळें अन्यायविरोधाची धार कमी होण्याची भीति कोणाला वाटते कीं काय ? पण माझें तर याच्या अगदीं उलट मत आहे.

मी गरिबांकडून भूदान कां घेतों, असें लोक मला विचारतात. याचीं मी अनेक कारणें सांगितलीं आहेत. त्यांत एक मी असेंहि सांगितलें आहे : ‘ मला माझी सेना तयार करावयाची आहे. स्वतः गरीब असून जे लोक या यज्ञांत भाग घेत आहेत ते तर आमच्या अहिंसक सेनेचे सैनिक बनत आहेत.’ वर्षानुवर्षें जमीन कसणाऱ्या शेतकऱ्यांना जमिनीवरून जेथें बेदखल करण्यांत येत आहे तेथल्या किसानांनीं आपल्या जमिनी सोडूं नयेत, अहिंसक मार्गांनीं त्याला विरोध करावा, असें मी माझ्या भाषणांत सांगत आलों आहे. उत्तर प्रदेशांत त्याचा इष्ट परिणामहि झाला आहे. किसानांत धैर्य संचारलें आहे. किसानांचें रक्षण करण्याच्या सूचना सरकारनेंहि आपल्या अधिकाऱ्यांना दिल्या आहेत.

अशा स्थितींत शेतकरी कामकरी पक्षाचा ठराव मला अगदीं निरर्थक वाटतो. मला ठाऊक आहे कीं, त्याहि पक्षांत अनेक आस्थेवाईक लोक आहेत. त्यांना मी हें सुचवूं इच्छितों कीं जर त्यांना भूमिहीनांचें उत्थान हवें असेल तर त्यांनीं आपल्या साऱ्या शंका सोडून भूदान यज्ञाच्या कामांत मदत करावी. या उप्परहि जर त्यांना कांहीं शंका राहिल्याच तर त्यांनीं मजकडे येऊन त्यांचें निवारण करून घ्यावें किंवा आपलें म्हणणें मजकडून मंजूर करून घ्यावें. मी त्यांचा मित्र आहे. कोणताहि विचार समजून घ्यावयाला व समजून द्यावयाला मी सदैव तयार असतों.

• • •

गीतेनें भक्ताचीं जीं लक्षणें सांगितलीं आहेत त्यांत ‘ अद्वेष्टा सर्वभूतानाम् ’ असें पहिलें पद घातलें आहे. विनोबांची स्थिति आज तशी आहे असें वाटतें. सेवकाची ‘ मस्ती ’ त्यांच्यांत आहे. त्यामुळें अनेकांना सेवेची स्फूर्ति मिळत आहे. भूदान यज्ञ यात्रा सुरूं झाल्यापासून एक नित्य नवें महाभारत रचलें जात आहे. असंख्य पात्रें आणि चरित्रें त्यांत गुंफिलीं जात आहेत. सुदाम्याचे पोहे आणि शबरींचीं बोरें यांची आठवण करून देणाऱ्या कितीतरी घटना घडत आहेत. भूदान यज्ञाएवढ्या व्यापक प्रमाणावर समाजाला कार्यप्रवृत्त करणारी दुसरी सामाजिक व आर्थिक चळवळ या देशांत अजून झालेली नाहीं.

भूदान यज्ञाच्या मार्गानें जर विश्वस्त वृत्ति रुजवून शोषणरहित समाजरचना स्थापन करण्यांत हिंदुस्थानला यश मिळालें, जर अहिंसक मार्गानें ही क्रांति यशस्वी झाली तर येथले विचार सर्वत्र पसरतील व नव्या जगाचा पाया घालणें शक्य होईल. आज सारें जग मोठ्या उत्सुकतेनें या आंदोलनाकडे पाहात आहे. जपानपासून अमेरिकेपर्यंत नाना देशांतील लोक या आंदोलनाचें प्रत्यक्ष अवलोकन करून जात आहेत. जगांतल्या देशोदेशींच्या वर्तमानपत्रांतून या विषयाची चर्चा होत आहे.

पंडित जवाहरलाल नेहरू म्हणतात : " मी भूदान यज्ञाला सर्वांत जास्त महत्त्व देतों. हें आंदोलन नीट रीतीनें समजून घेणें व तें सफल करण्यासाठीं सर्व प्रकारें सहकार्य देणें हें आमचें कर्तव्य आहे. हें आंदोलन कुठल्याहि एका पक्षाचें आंदोलन नाहीं; आणि आपल्या पक्षीय फायद्याचा विचार न करतां सर्वांनीं या कामांत भाग घेतला पाहिजे. हें एक महान् क्रांतिकारी आंदोलन आहे. ह्यामुळें देशाचें जें थोर हित साधलें जात आहे त्याच्याबाबत मला यत्किंचितहि शंका नाहीं. या आंदोलनामुळें असें वातावरण निर्माण होत आहे कीं भारताच्या यक्षप्रश्नाची शांततामय मार्गानें उकल होईल असा विश्वास जनतेंत वाढत आहे. जमीन हा भारतवर्षाच्या पहिल्या क्रमांकाचा प्रश्न आहे. गेलीं तीन दशकें या प्रश्नानें कॉंग्रेसचें व देशाचें लक्ष वेधून घेतलें आहे. जमिनीचा प्रश्न सुटणें अत्यंत महत्त्वाचें व आवश्यक आहे. आचार्य विनोबांचें आंदोलन हा या गुंतागुंतीच्या प्रश्नाची उकल करण्याचा एक असाधारण मार्ग आहे, यांत शंका नाहीं. त्यांचें आंदोलन क्रांतिकारी स्वरूपाचें आहे. हिंसात्मक व ध्वंसात्मक कार्यानें युक्त या अर्थानें क्रांतिकारी नव्हे तर त्यामुळें समाजांत मूलभूत परिवर्तन घडून येत आहे म्हणून क्रांतिकारी. "

• • •

आर्थिक क्रांति करणाऱ्या वामनानें टाकलेलें पहिलें पाऊल भूदान यज्ञाचें पडलें, दुसरें पाऊल संपत्तिदानाचें आणि तिसरें श्रमदानाचें. या तीन पावलात सारें विश्व जिंकण्याची शक्ति आहे. या आर्थिक क्रांतीचा स्पर्श न होतां आतां कोण राहूं शकेल? ज्यांच्याजवळ जमीन आहे त्यांनीं जमीन द्यावी, ज्यांच्याजवळ दौलत आहे त्यांनीं ती द्यावी व ज्यांच्याजवळ केवळ आपलें शरीरबळ आहे तेंहि त्यांनीं समाजसेवेंत अर्पण करावें. " कांचनमोहमुक्ति व शरीरश्रम ह्यांतच भारताचा उद्धार आहे. त्यांतच गांधीविचाराचें सार आहे. साम्यवादाशीं त्याचा मेळ आहे आणि त्यांतच साम्यवाद व भांडवलशाही यांना उत्तरहि आहे " असें विनोबाजी म्हणतात. ते आज हा कार्यक्रम देशभर पसरवीत आहेत.

बुद्धादींच्या काळीं व्यक्तीपुरती मर्यादित असलेली अहिंसा गांधीजींनीं व्यापक प्रमाणावर उपयोगांत आणली व व्यक्तिगत समजल्या जाणाऱ्या गुणांचा सामाजिक विनियोग करून दाखविला. गांधीजींनीं समाजांतील विषमतेवर विश्वस्त वृत्तीचा तोडगा सुचविला आहे आणि आर्थिक विषमता नष्ट करण्यासाठीं अपरिग्रह आणि अस्तेय यांचा उपाय सांगितला आहे. गांधींच्या हयातींत जमनालाल बजाजांसारख्या एकाद्याच व्यक्तीनें हा विश्वस्त सिद्धान्त पाळला. विनोबा आज ह्या विश्वस्त वृत्तीची दीक्षा साऱ्या समाजाला देऊं पहात आहेत. जी स्थावर वा जंगम संपत्ति मजजवळ आहे ती माझी नसून समाजाची माझ्याजवळ असलेली पवित्र ठेव आहे व समाजाच्या हितार्थच ती मला खर्च केली पाहिजे, ही भावना ते वाढवीत आहेत. शेवटीं ही भावना समाजाच्या हाडींमाशीं खिळल्यावांचून शोषणरहित समाजरचना होणार नाहीं. स्थावर व जंगम संपत्तीप्रमाणेंच श्रम करण्याची शक्ति हीहि एक संपत्तिच असून तिचाहि उपयोग विश्वस्त भावनेनें केला जावा यासाठीं श्रमदान यज्ञाचें आंदोलनहि विनोबांनीं सुरू केलें आहे. ' संपत्ति सब रघुपतिकी आहे '—सर्व संपत्ति अखेर ईश्वराची असल्यानें समाजकल्याणार्थच तिचा सार्वत्रिक विनियोग व्हावा. तसें झालें तरच व्यक्तिगत, समाजाच्या व विश्वाच्या जीवनांतील संघर्ष लोप पावून सहकार्य व शांति नांदूं शकेल. हेंच कार्य विनोबाजी आज भूदान यज्ञाच्या निमित्तानें देशभर करूं इच्छित आहेत. विश्वस्त वृत्तीच्या विकासांतून सामाजिक विषमतेचा व शोषणाचा अंत करण्याची कल्पना गांधीजींनीं मांडली होती. ही समाजशास्त्रांत गांधीजींनीं घातलेली मोलाची भर आहे. तीच कल्पना आज विनोबा व्यापक प्रमाणावर व्यवहारांत उतरविण्याचा प्रयत्न करीत आहेत.

★ ★ ★

*अहिंसा हिंसेला असें सांगूं शकत नाहीं कीं प्रश्न सुटो न सुटो, तूं आपली जा कशी. जेव्हां अहिंसा जगांतले मोठमोठे प्रश्न सोडवून दाखवील तेव्हां ती हिंसेला हक्कानें सांगेल कीं बाई, आतां तूं जा. तुझें कांहीं काम आतां उरलें नाहीं.*

# आरोहण

भूदान यज्ञांतून तीन परिणाम अपेक्षित आहेत. ( १ ) श्रीमंताकडून सरळ जमीन घेऊन ती गरिबांना द्यावयाची असल्यानें गरीब–श्रीमंत यांच्यामध्यें आज जी प्रचंड भिंत आहे तिला खिंडार पडणार आहे.( २ ) उत्पादनाच्या साधनांवर प्रत्यक्ष कष्ट न करणाराची मालकी असल्यामुळें मजुरांची पिळवणूक होते व त्यांच्यांत उत्पादन वाढविण्याचा उत्साह राहात नाहीं. मालकी विसर्जित होतांच उत्पादनवाढीला उत्तेजन मिळेल. ( ३ ) अहिंसक मार्गानें आर्थिक व सामाजिक क्रांति होऊं शकते हा विश्वास जगांतील लोकांत या चळवळीच्या साह्यानें निर्माण होऊं शकेल.

कांहीं लोकांना अशा धास्तीनें घेरलें कीं विनोबांच्या ह्या चळवळीमुळें गरीब जनता खवळून तर उठणार नाहीं ना ? विनोबा एका प्रवचनांत म्हणालेहि कीं, लोक जमिनीसाठीं तडफडत असावे आणि मी हात बांधून तें सगळें पहात रहावें हें शक्य नाहीं. ते म्हणतात : " अहिंसा म्हणजे कांहींतरी दळूबाई कार्यक्रम असें समजूं नका. होईल धीरे धीरे, असें अहिंसक मनुष्य म्हणूं शकत नाहीं. तांतडीनें विषमता न घालविणें, म्हणजे हिंसेला आमंत्रण देणेंच होईल. मी लोकांना अनुचित मार्गांपासून दूर ठेवूं इच्छितों, म्हणूनच त्यांना उचित मार्ग मला दाखविला पाहिजे. तसें करावयाचें तर मला तांतडी केली पाहिजे. मला शांतता हवी आहे, पण स्मशानांतली नव्हे. मी क्रांति रोखूं इच्छित नाहीं, शांततेच्या मार्गानें क्रांति करूं इच्छितों. कांहीं लोक म्हणतात : ' विनोबा फार धोकेबाज प्राणी आहे ' आणि हें त्यांचें म्हणणें कांहीं खोटें नाहीं. ज्यांना आजची परिस्थिति कायम रहावी असें वाटतें, त्याच्या दृष्टीनें मी धोकेबाज आहेच. लोकांना भीति वाटते कीं माझ्या चळवळीमुळें गरीब जागे होतील, त्यांच्यांतला असंतोष वाढेल आणि तो काबूंत ठेवतां न आल्यानें



लोक हिंसाचार करतील, पण लोक हिंसेला प्रवृत्त होऊं नयेत, एवढ्याचसाठीं तर भूदान आरोहण आहे. ज्यांना हिंसा टळावी असें वाटतें त्यांनीं ह्या चळवळींत सामील झालें पाहिजे. मला हिंसा तर नकोच आहे, पण आजची परिस्थितिहि मी उघड्या डोळ्यांनीं अशीच चालूं राहिलेली पाहूं शकत नाहीं. "

हृदयपरिवर्तन वगैरे शब्दांनीं कांहीं लोक बुजतात. विनोबा त्यांना सांगतात : " आपल्या भुकेल्या शेतकऱ्याची काळजी आपल्याला असली पाहिजे. आपल्या आजूबाजूला भूक, अज्ञान, दारिद्र्य, रोगराई यांचा बुजबुजाट पाहून ज्याच्याजवळ संपत्ति, बुद्धि वा शक्ति आहे तो सहजच बेचैन होईल. त्याला जेवणखाण, आराम गोड लागणार नाहीं. त्याच्यांत तळमळ निर्माण होईल. समाजांतील भूक, अज्ञान, दारिद्र्य, रोगराई नाहींशी करण्यासाठीं त्यांचे हात शिवशिवूं लागतील. याला मी हृदयपरिवर्तन म्हणतों. प्रत्येक माणसाच्या हृदयांत ईश्वरी अंश आहे व तो जागृत व प्रभावी होऊं शकतो असा आपला विश्वास असला पाहिजे. समाजांत अशी जागृति निर्माण झाली पाहिजे कीं समानतेसाठीं

कांहीं केल्याशिवाय माणसाला चैन पडूं नये. ज्याप्रमाणें पक्षी दोन पंखांवरच उडूं शकतो त्याप्रमाणें लोकजागृति व बाह्य परिस्थितींत तदनुकूल परिवर्तन या दोन पंखांनीं क्रांतिविहग अस्मानांत भराऱ्या मारूं शकतो. "

• • •

कोणी विनोबांना सांगतात, हें काय तुमचें चाललें आहे ? भारताच्या सरहद्दीवर काय घडत आहे तें जरा डोळे उघडून पहा. चीन–रशिया यांत घडलेल्या घटनांचें विस्मरण नका होऊं देऊं. हें आज विज्ञानाचें युग आहे. देशादेशांत कोठल्याहि प्रकारच्या भिंती आज उभ्या राहूं शकत नाहींत. विनोबा अशा मंडळींना सांगतात : " तुमचें हें म्हणणें खरें आहे कीं आज देशाभोंवतीं असे कोट उभारतां येणार नाहींत कीं जे विचारांनाहि अडवूं शकतील. जगांतल्या दुसऱ्या देशांतून विचार येथें आल्याशिवाय रहाणार नाहींत हेंहि खरें. आणि मीहि तेंच म्हणतों. विचारांना अडविणाऱ्या भिंती आज कोणी निर्माण करूं शकणार नाहीं. भारतांतूनहि जगाच्या इतर देशांत विचार जाणार आहेत आणि इतर देशहि त्यांना थांबवूं शकणार नाहींत. येथें जे विचार प्रभाव दाखवतील त्यांचा परिणाम साऱ्या जगावर झाल्यावांचून राहाणार नाहीं. "

परिस्थिति माणसाला बनविते कीं माणूस परिस्थितीला आकार देतो, हा सनातन प्रश्न कोणी विनोबांसमोर मांडतो. विनोबा या प्रश्नाचा उल्लेख करून एकदां म्हणाले : " एक मनुष्य एकदां मला सांगूं लागला कीं त्याच्या मुलाच्या जन्मपत्रिकेंत मंगळ आहे आणि त्याचा परिणाम त्याच्या मुलाच्या आयुष्यावर होणार आहे ! तेव्हां मी त्याला म्हणालों : मंगळाचा जेवढा परिणाम त्या मुलाच्या जीवनावर होणार आहे त्याच्या शतपट अधिक परिणाम त्या मुलाचा मंगळावर होणार आहे ! कारण शेवटीं तो मुलगा चैतन्यमय आहे आणि मंगळ जड आहे. एकदां मी मजेंत म्हणालों, हिमालय हिमालय काय म्हणतां, मनांत आलें तर मी त्याला उत्तरेकडून दक्षिणेकडे फेंकून देईन ! लोक म्हणाले अजबच आहे तुमचें हें बोलणें ! तुम्ही हें कसें करणार ? मी त्यांना म्हणालों, "मी जर तिबेटांत गेलों तर बिचारा हिमालय काय करील ? मुकाट माझ्या दक्षिणेला येऊन बसेल ! मी चैतन्यमय आहे आणि हिमालय कितीहि मोठा असला तरी शेवटीं जडच ! ! चेतनाची सत्ता जडावर चालेल कीं जडाची चेतनावर ? "

भूदान यज्ञाच्या यशापयशाची चर्चा निघाली तेव्हां एकदां विनोबाजी म्हणाले : " स्वराज्य मिळून पांच सात वर्षें झालीं. लोक आतां म्हणतात, सरकारनें हें केलें नाहीं;

तें केलें नाहीं. मी त्यांना विचारतों : बाबांनो, तुम्ही गुलाम आहांत कीं स्वतंत्र ? तुम्ही जर स्वतंत्र असाल तर लहानसहान गोष्टींसाठीं सरकारवर कशाला विसंबून रहातां ? जें काम प्रत्यक्ष परमेश्वर करूं शकत नाहीं तें हें सरकार बिचारें काय करणार ? परमेश्वर पाऊस पाडतो, पण तेवढ्यानें कांहीं धान्य पैदा होत नाहीं. त्यासाठीं आपल्यालाच शेत नांगरावें लागतें, बीं पेरावें लागतें, कापणीमळणी करावी लागते. सरकार, सरकार म्हणजे तरी शेवटीं काय ? सरकार हें लोकांच्या शक्तीमुळेंच सामर्थ्यवान् आहे. शक्तीचा झरा दिल्ली–पाटण्यांत नाहीं तो तुमच्या आमच्या अंतःकरणांतच दडलेला आहे. एकदां या शक्तीचें भान झालें कीं मग आम्हांला अडविणार कोण ? धन आणि धरती समतेनें वांटली जाण्यांत भलें आहे असें एकदां पटलें कीं मग आपल्याला कोण थांबवूं शकणार आहे ? ''

भूदानाची चळवळ केवळ धनधरतीचें फेरवांटप करण्यासाठीं नाहीं. ती एक जीवनव्यापी चळवळ आहे. ज्याप्रमाणें आपलें सारें शरीर एकजीव आहे त्याप्रमाणें सारा समाज एकजीव व्हावा यासाठीं ही चळवळ आहे. शरीराच्या ज्या भागाला दुःख त्याच्याकडे सारीं इंद्रियें आपापल्या शक्ति घेऊन धांवतात, तसें समाजाचें झालें पाहिजे. पायांत कुसळ गेलें तर डोळ्याला पाणी येतें, हात तें काढायला धावतात, असे एकजीव संबंध दरेक गांवांत निर्माण झाले पाहिजेत.

● ● ●

भारतीय विचाराचें हें वैशिष्ट्य आहे कीं त्यांत जीवन एक आणि अखंड मानलें आहे. जीवनाच्या एका अंगांत सद्वृत्तीचा प्रवेश झाला तरी ती जीवनव्यापी बनते. सायकलच्या चाकांत हवा भरण्यासाठीं एकच भोंक असतें. त्या एकाच भोंकांतून हवा प्रवेश करीत असली तरी सर्व दूर चाकभर समान रूपानें व्याप्त होते, त्याप्रमाणें जमिनीची विषम वांटणी नष्ट करण्यासाठीं जरी ही चळवळ सुरूं झाली असली तरी ती सर्व जीवनांत व्याप्त होणारी आहे. सर्व समाजाच्या भाग्याशीं आपलें भाग्य जोडण्याची वृत्ति माणसांत निर्माण करणें हा भूदानाचा उद्देश आहे. आज विज्ञानामुळें जग इतकें परस्परांजवळ आलें आहे कीं स्वतःचें नुकसान करून घेतल्याशिवाय आपण दुसऱ्याचें नुकसान करूं शकत नाहीं आणि इतरांचा फायदा केल्याशिवाय आपल्याला स्वतःचा फायदा करतां येत नाहीं. जनतेला हें शिकविणें हा भूदानाचा उद्देश आहे. मजजवळ जें कांहीं वैभव आहे : मग तें धनाचें असो, बुद्धीचें असो कीं बळाचें, तें समाजाच्या साह्यानेंच मला मिळालेलें आहे, ह्याची जाणीव ठेवून समाजकल्याणार्थ त्याचा वापर करण्याची वृत्ति समाजांत वाढली

तरच खरी समानता निर्माण होणार आहे. समानता म्हणजे सगळे एका छापाचे गणपति नव्हेत. समानता म्हणजे विविधता राखूनहि विषमता निर्माण होऊं न देणें. ह्यासाठीं समाजाच्या सर्व घटकांत विश्वस्त वृत्ति असली पाहिजे.

• • •

विश्वस्त वृत्ति म्हणजे ईशावास्य वृत्ति. भूदानाचा आधार ईशावास्य उपनिषदांतील तीन श्लोकांवर आहे.

ईशावास्यमिदं सर्व यत्किंच जगत्यां जगत्
तेन त्यक्तेन भुंजीथाः मा गृधः कस्यस्विद्धनम् ।

जगांत जें कांहीं जीवन आहे, तें सर्व ईश्वरानें वसविलेलें आहे. म्हणून परमेश्वराच्या नांवानें त्याग करून, जें प्राप्त होईल तें भोगीत जा. कोणाच्याहि धनाची वासना राखूं नकोस.

यस्तु सर्वाणि भूतानि, आत्मन्येवानुपश्यति
सर्वभूतेषु चात्मानं, ततो न विजुगुप्सते ॥

जो सर्वांत आत्मा आणि आत्म्यांत सर्व भूतें आहेत असें पाहातो तो कोणालाहि आणि कशालाहि कंटाळत नाहीं.

यस्मिन् सर्वाणि भूतानि, आत्मैवाभूद्विजानतः
तत्र को मोहः कः शोकः एकत्वमनुपश्यतः ॥

ज्याच्या दृष्टीनें आत्माच सर्व भूतें झाला त्या निरंतर एकत्व पाहाणाऱ्या विज्ञानी पुरुषाला मोह किंवा शोक कुठला ?

सर्व संपत्ति समाजाची आहे हें मान्य केलें जाईल अशी ही नवी सृष्टि भूदानांतून निर्माण करावयाची आहे. कोणीहि स्वतःला धनाचा वा धरतीचा मालक समजणार नाहीं. आपल्या सर्व शक्तींचें मूळ समाजांत आहे हें ओळखून समाजासाठीं आपल्या शक्ति वापरील. अशा समाजांत कामांत आणि माणसांत उच्चनीचता राहाणार नाहीं, कोणाला कोणी कंटाळणार नाहीं. हीं सगळीं भगवन्ताचींच रूपें आहेत हें भान झाल्यामुळें मोहाला कोणी वश होणार नाहीं. सर्वत्र आनंदच आनंद.

• • •

असा हा नवसमाज कसा निर्माण करायचा ? हा समाज निर्माण करायचें साधन भूदान, संपत्तिदान, श्रमदान, बुद्धिदान इत्यादि दानें. दान म्हणजे परोपकार नव्हे; दान

म्हणजे समान वांटणी करण्याची स्वयंप्रेरित अहिंसक योजना. घेण्याची वृत्ति घालवून देण्याची वृत्ति समाजांत वाढवायची आहे. दानाची व्याप्ति किती ? दातृत्वाला मर्यादा असूंच शकत नाहीं. सर्वस्व दान करण्यापर्यंत माणूस उडी घेऊं शकतो. जयप्रकाशजींनीं जीवनदानाचा संकल्प जाहीर करून देशांतील हजारों नरनारींना सर्वस्वदानाची प्रेरणा दिली आहे. हें सर्व दान कशासाठीं याची विनोबांनीं मोठी मार्मिक व्याख्या त्यावेळीं केली होती. ' भूदानमूलक, ग्रामोद्योगप्रधान, अहिंसक समाजरचना ' निर्माण करण्यासाठीं हें आंदोलन आहे. आणि हें भव्य ध्येय, साठी गांठलेल्या विनोबांना उन्हा-पावसांत, थंडी-वाऱ्यांत सूर्याच्या नियमितपणानें घुमवीत आहे. प्राचीन ऋषींनीं म्हणून ठेवलें आहे कीं, जो बसला त्याचें भाग्य बसलें, जो उठला त्याचें भाग्य उठलें, जो चालूं लागला त्याचें भाग्य चालूं लागलें. विनोबांच्या रूपानें आज भारताचें व जगाचें भाग्य चालूं लागलें आहे.

★ ★ ★

*नवा विचार निर्माण होतो तेव्हां तो स्वस्थ बसूं देत नाहीं. नवा विचार मिळाला तेव्हां येशूचे शिष्य स्वस्थ बसले नाहींत. नवा विचार मिळाल्यावर महंमद पैगंबरांचें अनुयायी बसून राहिले नाहींत. नवा विचार मिळाल्यावर महावीर स्वामींचे साथी बसून राहिले नाहीत. भगवान बुद्धांचे शिष्य जगभर पसरले. नवा विचार निर्माण झाला कीं तो लोकांना बसूं देत नाहीं, फिरायला भाग पाडतो.*

# नवसमाजाचा पाया

समाज जोंवर लोभभयाचा त्याग करूं शकत नाहीं तोंवर विषमतेचा अंत करूं शकणार नाहीं. लोभांतून भांडवलशाही व भयांतून शस्त्रास्त्रें निर्माण झालीं आणि आज सारें जग आत्मनाशाच्या कड्यावर येऊन ठेपलें आहे. लोभावर अपरिग्रहाचा तोडगा आहे, भयावर अहिंसेचा. अपरिग्रह म्हणजे संपत्तीचा नाश नव्हे; अपरिग्रह म्हणजे संपत्तीवरील व्यक्तिगत मालकीची भावना सोडून देणें. कबीरसाहेबांनीं म्हटलें आहे : " नावेंत पाणी वाढलें आणि घरांत संग्रह वाढला म्हणजे शहाणीं माणसें दोन्ही हातांनीं तें उपसून टाकतात. " पाणी नावेंत असलें तर ती बुडेल, पण तेंच जर नावे-बाहेर असेल तर डौलानें विहार करूं शकेल. त्याप्रमाणें संपत्ति समाजांत असली म्हणजे विषमता निर्माण न होतां वैभव वाढेल. भयाचा त्याग करावयाचा म्हणजे प्रेमभाव वाढविला पाहिजे. साऱ्या समाजाविषयीं प्रेम असलें पाहिजे. प्रेम हें निष्क्रिय राहूं शकत नाहीं. तें सेवेची प्रेरणा देतें. भीति वाटते कारण परिचय नसतो. परिचय झाला म्हणजे भय जातें.

लोभभयमुक्त समाज हाच जगाचा आदर्श. त्याशिवाय जगाची धडगत नाहीं. लोभमुक्तीसाठीं केंद्रीकरणाची वृत्ति सोडली पाहिजे. उत्पादनाचें भांडवलशाही तंत्र सोडून अल्पप्रमाण यंत्रें निर्माण केलीं पाहिजेत कीं जीं माणसाला गुलाम बनविणार नाहींत, त्याच्या हातांत शोभून दिसतील. भयमुक्तीसाठीं विज्ञान हवें; पण हें विज्ञान अहिंसेनें, प्रेमानें नियंत्रित झालें पाहिजे. विज्ञान अहिंसेच्या नियंत्रणाखालीं आलें कीं जगांतील विषमता निवारण करण्याला समर्थ होईल.



परंतु हें विश्वरूप दर्शन आहे. अर्जुनासारख्या भक्तालाहि त्याची ओढ लागली तरी तें पेलणें कठिण. गीतेंत म्हटलें आहे :

मज मानव रूपांत तुच्छत्वें मूढ देखती
नेणूनि थोरलें रूप जें माझें विश्वचालक ।

जे मूढ आहेत ते मानवरूपांत जो साक्षात् परमेश्वर आहे त्याची अवहेलना करतात आणि विश्वचालक रूपाचा ध्यास धरतात. विश्वरूप पेलत नाहीं, मानवरूप पटत नाहीं, ही करंटेपणाची स्थिति आहे; ती बदलली पाहिजे. विनोबा म्हणतात : " विश्वाचें कुटुंब करायचें आहे. पण साक्षात् तर आपलें गांवच आहे. त्या गांवाचेंच एक कुटुंब

करूं. गांव जर एका कुटुंबाप्रमाणें वागूं लागलें तर वैर आणि विषमता नाहींशी होईल. जें प्रत्यक्ष आहे तें भव्य नसलें तरी उपयुक्त आहे. त्या उपयुक्त प्रत्यक्षांतूनच भव्यतेचें ओझरतें दर्शन घेतां येतें. जमिनीचा अमूक हिस्सा दिला एवढ्यानें सर्व साधलें असें नाहीं. तें पहिलें पाऊल झालें. पण एक पाऊल टाकल्यानें गति साधत नाहीं. एकामागून एक पावलें पडलीं पाहिजेत. बाळानें पहिलें पाऊल टाकलें तर माता उत्सव साजरा करील, पण तेवढें एक पाऊल टाकूनच बाळ थांबला तर तिचा उत्साह मावळेल, ती खट्टू होईल. पहिलें पाऊल पडलें आनंद झाला; आतां एकामागून एक पुढें पावलें पडलीं पाहिजेत."

• • •

हैद्राबाद राज्यांतील पोचमपल्ली गांवाला भूदानाच्या कल्पनेचा जन्म झाला. जमीन मिळूं लागली. हजारों एकर जमीन मिळाली. पहिलें पाऊल तर पडलें. पण पुढें काय? विनोबांना तेवढ्यानें संतोष नव्हता. सगळा गांव एका कुटुंबासारखा झाला पाहिजे. पण हें कसें होणार, कोण करणार?

हेंहि दुसरें पाऊल एका गांवानें टाकलें. उत्तर प्रदेशांत मंगरोठ नांवाचें एक गांव आहे. श्री. रामचंद्र रेड्डींच्याप्रमाणें दिवाण शत्रुघ्नसिंह यांच्या हृदयांतून पुढचा बोल उमटला. थोडी थोडी जमीन न देतां या गांवांतील सर्व लोकांनीं आपली सर्वच्या सर्व जमीन भूदानांत अर्पण केली. सगळें गांव जमिनीचे मालक झाले, सगळे मालक मजूर झाले. समतेचें हें दुसरें पाऊल. विनोबा उत्तर प्रदेशांतून बिहारमध्यें गेले. केवळ जनशक्तीच्या जोरावर एखाद्या जिल्ह्यांतील भूमीची समस्या सोडवून दाखवावी ह्या हिरीरीनें ते कामाला लागले. "या तो गया जिलेका भूमिका मसला हल होगा, या मेरी हड्डियाँ यहाँ गिरेंगी— एक तर गया जिल्ह्याचा जमिनीचा प्रश्न तरी सुटेल नाहीं तर त्या कामांत माझीं हाडें येथें पडतील" अशी संकल्पवाणी त्यांनीं उच्चारली. प्रायः त्या जिल्ह्याचा प्रश्न त्यांनीं सोडविला. लाखों एकर जमीन भूदानांत मिळाली. संपत्तिदानाची चळवळ सुरूं झाली. 'सब भूमि गोपालकी' हें पहिलें पाऊल; 'संपत्ति सब रघुपतिकी आहे' हें क्रांतीचें दुसरें पाऊल. क्रांति चालूं लागली. बिहारमधून बंगालमार्गें विनोबा ओरिसांत आले. कोरापुट जिल्हा आदिवासींचा. आदिवासींना भूमिदानाच्या मंत्रांतील सामर्थ्य आकळलें. गांवेच्या गांवें दान मिळूं लागलीं. शेंकडों गांवांनीं आपली सर्व जमीन भूदानांत अर्पण केली. हें क्रांतीचें तिसरें पाऊल पडलें आहे. समग्र ग्रामदानाशिवाय विनोबांचा आत्मा समाधान पावत नाहीं. हिंदुस्थानसारख्या कृषिप्रधान देशांत जमीन हेंच उत्पादनाचें

प्रमुख साधन आहे. त्यावरील व्यक्तिगत मालकी उडाली कीं इतर उत्पादन—साधनांवरचीहि मालकी उडाल्यावांचून राहणार नाहीं.

● ● ●

जेथें जमिनीचें ग्रामीकरण झालें तेथें नवें गांव निर्माण करावयाचें आहे. विनोबांनीं आपल्या कल्पनेंतील नवें गांव कसें असेल तें पुढीलप्रमाणें सांगितलें आहे :

सारी भूमि भगवन्ताची
घराघरांतुनि चालो चरखा ।
गांव असावा स्वच्छ सुमंगल
नकोत व्यसनें, नको भांडणें ॥
गांव बनावें कुटुंब एकचि
रामनाम मुखिं सदा असावें ।
सर्वां शिक्षण, सर्वां रक्षण
कर्मामध्यें हात रमावे ॥

विनोबांची ही कल्पना ओरिसांतील कोरापुट जिल्ह्यांत साकार करण्यासाठीं श्री. अण्णासाहेब सहस्रबुद्धे यांच्या नेतृत्वाखालीं कार्यकर्ते प्रयत्नांची पराकाष्ठा करीत आहेत.

● ● ●

विनोबा गतिहीन कर्मठपणाचा तिरस्कार करतात पण धर्माच्या कडव्या उपासकांप्रमाणें त्यांच्यांत कट्टरता नाहीं. गतिमान विश्वांत एकादें तत्त्वज्ञान स्थिर व अखेरचें समजून व तें कवटाळून जड बनण्याची त्यांची वृत्ति नाहीं. त्या त्या धर्माचे अनुयायी असें मानतात कीं त्यांचा धर्मसंस्थापक हा अखेरचा युगपुरुष! विनोबा इतके नास्तिक नाहींत. ते असें मानतात कीं हें विश्व विकासप्रवण आहे. त्याचा कस अजून इतका कमी झालेला नाहीं कीं आतां यापुढें नवें कांहीं पैदा होऊं नये. तत्त्वविकासाच्या बाबतींत पूर्णविराम नाहीं. मागील विकास जेथें थांबला तेथून नवा विकास सुरू झाला. गांधीजींविषयीं विनोबांना अपार प्रेमादर आहे. पण गांधीजींनीं सत्य—अहिंसेचें अखेरचें वचन सांगितलें, असें ते मानीत नाहींत. सत्य—अहिंसेंत अपार सामर्थ्य आहे. चिंतन आणि प्रयोग यांच्याद्वारें तें अधिकाधिक प्रकट करणें हें आपलें जीवितकार्य आहे, असें ते मानतात. प्रयोगानें निष्कर्ष पडताळून पाहणें आणि त्या निष्कर्षाचें चिंतन करून प्रयोग अधिक पुढें नेणें, हा त्यांचा

विकासक्रम आहे. ल्हान यशांतून मोठ्या यशाकडे जाण्याचा त्यांचा प्रयत्न आहे. त्यामुळें त्यांच्या प्रत्येक पावलाबरोबर भूदान आरोहणाचें पाऊल पुढें पडत आहे, यशाचा एकेक पुढचा टप्पा गांठला जात आहे.

• • •

११ सप्टेंबर १९५५ ला विनोबांनीं वयाचीं साठ वर्षें पूर्ण केलीं. त्यांच्या मित्रांनीं व चाहत्यांनीं मोठा समारंभ करण्याचा घाट घातला. गौरवग्रंथ प्रसिद्ध करण्याचें ठरलें. प्रत्येक दिवशीं गौरवाचें एकेक पान इतिहासांत जो लिहीत आहे त्याचा मर्यादित पानांत कोण आणि कसा गौरव करणार ? पण माणसाला निर्गुणानें संतोष होत नाहीं. निर्गुणापेक्षां सगुणाची ही मर्यादा माणसाला अधिक पेलवते ! निर्गुण साकार झालें कीं मर्यादा आलीच.

विनोबांनीं या उत्साही मित्रांना सांगितलें : " १९५७ पर्यंत आपली सर्व शक्ति भूदान कार्याला लावा असें मी सर्वांना आवाहन करीत असतांना माझा गौरवग्रंथ तयार करण्यासाठीं वेळ खर्च करण्याला मी संमति कशी देणार ? " त्यामुळें ती कल्पना मागें पडली. परंतु त्यांच्या आयुष्याचीं साठ वर्षें पूर्ण झालीं त्या दिवशीं जवळच्या मित्रांनीं छोटासा कार्यक्रम केला.

ता. ११ सप्टेंबर १९५५. ओरिसांत विनोबाजींची पदयात्रा चालू होती. विनोबाजी नित्याप्रमाणें २॥ वाजतां ब्राह्ममुहूर्तावर उठले. भजन-स्तोत्रें नेहमींप्रमाणें गुणगुणूं लागले. त्यांच्या कंठांतून निरव वातावरणांत मंजुळ मधुर स्वर बाहेर पडत आहेत. त्या सौम्य स्वरांतहि जागृति आणण्याचें केवढें सामर्थ्य ! सारखें ऐकत रहावेसें वाटतें. शब्दांचा अर्थ माहीत नसला तरी ती वाणी बोधदायिनी होते. आसपासच्या वातावरणांत मांगल्य दरवळूं लागतें. विनोबाजींच्या तोंडून निघणारे ते प्रातःकालीन सूर ज्याच्या हृदयाकाशांत एकदां पोंचले त्याच्या हृदयांत ते सतत निनादत राहातात. तासाभराचा हा विनोबांचा स्वाध्याय.

साडेतीन वाजतां प्रार्थनेसाठीं सर्व लोक जमले. उडिया भाषेंत नेहमींप्रमाणें ईशावास्योपनिषदाचा पाठ झाला. नंतर एक बंगाली व सूरदासाचें एक हिंदी पद म्हणण्यांत आले. प्रार्थना संपली. बरोबर ५॥। वाजतां ' राधारमण गोविंद हर ' चा घोष करीत विनोबांची पदयात्रा सुरू झाली. पावसाची रिमझिम पडून गेली होती. रस्त्यांत चिखलच चिखल होता. विनोबा जवळच्या लोकांशीं हास्य—विनोद करीत झपाट्यानें चालत होते. चिखलानें सहयात्रींचे पाय भरत होते. घोट्यापर्यंत कोणाचे पाय चिखलानें भरले. विनोबा

हंसून म्हणाले : “ चिखलांत चालण्यानें तीन फायदे होतात : पहिला फायदा अधिक व्यायाम होतो, दुसरा मालीश होतें आणि तिसरा निसर्गोपचार. मातीची पट्टी बांधल्याचा फायदा सहजच मिळून जातो. ” यात्रीदल हंसत खेळत पुढें चाललें होतें. विक्रमपूरवर आज मोर्चा होता.

• • •

विक्रमपूर तीनएक मैल असेल नसेल तों एका पुलावर जयप्रकाशजी व प्रभावती देवी वाट पहात असलेल्या दिसल्या. दृष्टादृष्ट होतांच दोघांनीं विनोबांना प्रणाम करून अभीष्टचिंतन केलें. विक्रमपूरला पोंचतांच विनोबांनीं आंघोळ व न्याहारी आटोपली. बरोबर साडेआठ वाजतां कार्यक्रमाला सुरुवात झाली. विनोबाजींना एका पीठावर बसविण्यांत आलें. त्यांच्या समोर मंगलकलश ठेवला होता. परातींत फळें सजवून ठेवलीं होतीं. प्रार्थना झाली. नंतर ओरिसांतील थोर कार्यकर्ते गोपबंधु चौधरी यांच्या पत्नीनें विनोबांच्या भाळीं टिळा लावला. गोपबाबूंच्या चेहऱ्यावर हास्य झळकत होतें. ते म्हणाले : “ ओरिसांतील कोरापुट जिल्ह्याच्या ह्या घनदाट अरण्यांत एका थोर सन्ताचा वाढदिवस साजरा करण्याचें भाग्य आम्हांला लाभत आहे. ह्या घनदाट अरण्यांत ऐनपावसाळ्यांतहि विनोबा संचार करीत होते. ह्या भागांत शेकडों गांवांनीं सर्वस्वदान केलें. विनोबांच्या आशीर्वादानें येथें सर्वोदय समाज निर्माण करण्याचा आम्ही प्रयत्न करूं....पण खरेंच, एक विसरलों. विनोबांपेक्षां वर्षानें मी वडील. त्यांना आशीर्वाद द्यायचा मला हक्क आहे. मी त्यांना आशीर्वाद देतों कीं उपनिषदांतील प्रार्थनेप्रमाणें ते शतायुषी होवोत. समाजांत क्रांति साक्षात् झालेली पाहण्याची त्यांची इच्छा पूर्ण होवो !

त्यांच्यानंतर जयप्रकाशजी उभे राहिले. शतभावनांनीं ते ओथंबले होते. त्यांच्या तोंडून शब्द फुटत नव्हते. आळेबळें बोलले. म्हणाले : “ अशा प्रसंगीं माझें हृदय आणि मेंदू ठिकाणीं राहात नाहीं. बोलायची इच्छा होत नाहीं. बोलण्याची आवश्यकताहि तशी नसते, माझा तसा अधिकारहि नाहीं. पण माझ्या हृदयांतून मंगल आशांचे बुडबुडे फुटत आहेत........भारत हा एक परम भाग्यवान् देश आहे. येथें संतांची अखंड परंपरा आहे. एक संत जातो कीं दुसरा लगेच येतो. गांधीजींनीं सत्य–अहिंसेचा एक प्रयोग केला. ते गेले आणि आमच्या भाग्यानें विनोबा पुढें आले. जीवनपरिवर्तनांतून समाजपरिवर्तन घडविण्याचा एक क्रांतिकारी मार्ग त्यांनीं आमच्यापुढें ठेवला आहे. त्यांच्या

मार्गदर्शनाचा लाभ आम्हांला सतत मिळत राहो. विनोबांना दीर्घायुरारोग्य लाभो हीच या प्रसंगीं प्रार्थना. "

जयप्रकाशजींनंतर विनोबा बोलले. म्हणाले : " आज माझ्या ह्या शरीराचीं साठ वर्षें पूर्ण झालीं. त्यानिमित्त मित्रांनीं आपला स्नेह व्यक्त केला. आमच्या श्रुती तर म्हणतात कीं माणसाला सामान्यतः शंभर वर्षांचें आयुष्य आहे. मी १०० वर्षांच्या आयुष्याला १०० गुण धरले आहेत. पण वयाच्या प्रत्येक वर्षाला सारखेच गुण माझ्या गणितांत नाहींत. आयुष्याच्या पहिल्या पन्नास वर्षांत प्रत्येक वर्षाला अर्धा गुण. पन्नास ते पंचाहत्तर या वयांतल्या प्रत्येक वर्षाला एक गुण आणि राहिलेल्या पंचवीस वर्षांतल्या प्रत्येक वर्षामागें दोन गुण. ह्या हिशेबानें पहिल्या साठ वर्षांना पसतीस गुण पडतात. ह्याचा अर्थ असा कीं साठ वर्षें गांठणारा जेमतेम कांठावर पास झाला ! कांठावर पास होण्याबद्दल कोणाचा कसला सत्कार ?

" आयुष्याचीं इतकीं वर्षें झालीं, पण त्याचा कधीं मला भार वाटला नाहीं. आमच्या या देशांत असे कितीतरी वृद्ध आहेत कीं जे उत्साहाच्या बाबतींत तरुणांना हार जाणार नाहींत. पण मला ना वृद्धापकाळचा अनुभव, ना जवानीचा. मला तर वाटतें कीं माझें बाळपणच अजून संपलें नाहीं. त्यामुळें हा सारा समारंभ मला एक प्रकारें विचित्र वाटतो !

" मनुष्य साठ वर्षांचा झाला याचा अर्थ इतकाच कीं जगावें कसें तें त्याला ठाऊक झालें. त्याला मग विश्वास वाटूं लागतो कीं आपण आतां जगूं शकूं. पण त्याच वेळीं जर लोक समजायला लागले कीं हा आतां म्हातारा झाला आहे, तर मोठा बांका प्रसंग येतो. तरुणांचा कांहीं भरवसा नसतो, बिचारे केव्हां पटकन् हातावर तुरी देऊन निघून जातात कळतदेखील नाहीं. पण कांहीं ठराविक वयोमर्यादा गांठली कीं शरीर कसें नीट ठेवावें तें समजतें. खरें म्हणजे याच वयांत वास्तविक जीवनाची सुरवात होते. ह्याहि दृष्टीनें विचार करतां माझ्या जीवनाचा आरंभच होतो आहे असें म्हणावें लागेल. "

• • •

विनोबा हा आधुनिक काळांतील एक लोकविलक्षण पुरुष आहे. त्यांचें बुद्धिवैभव जितकें प्रखर तितकेंच भाववैभवहि सर्वव्यापि आहे. त्यांच्या बुद्धिवैभवानें माणसें चकित होतात, तर भाववैभवानें माणसें जिंकलीं जातात. तसें पाहिलें तर त्यांच्या जीवनांत बुद्धि आणि भावना यांचें संपूर्ण अद्वैत पहायला मिळतें. केवळ बुद्धिवाद्यांचा शुष्कपणा त्यांच्यांत

नाहीं आणि केवळ भावनाशीलांचा भोंगळपणाहि नाहीं. बुद्धि भावनेमुळें कार्यवती झाली आहे आणि भावना बुद्धीमुळें डोळस बनली आहे. त्यांच्याच भाषेंत सांगायचें तर बुद्धि घोटून घोटून भावना बनली आहे. बुद्धीचा पूर्ण वापर करून झाल्यानंतरच भावनेचें क्षेत्र सुरू होतें. विनोबा बुद्धिवादांत कोणाला हार जाणार नाहींत आणि भावनेंतहि उणें भरणार नाहींत. गणित आणि विज्ञान यांच्या साह्यानें त्यांच्या बुद्धीचा सर्व विषयांत अप्रतिहत संचार होतो आणि भावनेच्या साह्यानें ही बुद्धि सुनियंत्रित राहाते. विज्ञानाला अहिंसेचें नियंत्रण लावायची त्यांची इच्छा आहे आणि अहिंसेला विज्ञानाचा आधार देण्याची अपरिहार्यता त्यांना मंजूर आहे.

संगम- समन्वय हें त्यांच्या जीवनाचें सूत्र आहे. सांप्रदायिकांप्रमाणें वैचारिक जडता आणि भावडी भक्ति त्यांच्यांत नाहीं. त्यांचें मन बालकासारखें निरागस आहे, शरीर तरुणांच्या तारक शक्तीनें मुसमुसून कार्यप्रवण आहे, आणि बुद्धि वृद्धांप्रमाणें अनुभवाच्या कसोट्यांना उतरून परिष्कृत झाली आहे. त्यामुळें बालकांशीं ते समरस होऊं शकतात, तरुणांच्या पुरुषार्थशक्तीला आव्हान देतात आणि वृद्धांच्या युक्तिवादांना हार जात नाहींत. विनोबांच्या भोंवतींच्या मेळाव्यांत समाजांतल्या सर्व थरांतील लोक आढळतात याचें रहस्य हेंच आहे. समाजसेवेंत रत असणाऱ्या माणसाची वात्सल्यभावना क्षणोक्षणीं वाढत गेली पाहिजे. संवर्धनाची शक्ति मातृभावनेवांचून लाभत नाहीं. समाजांतील सद्‌गुणांचें संवर्धन करावयाचें तर मातृभावनेचा प्रकर्ष गांठावा लागतो. ज्याच्यांत वात्सल्य नाहीं तो तोंडानें कांहींहि म्हणाला तरी दंडशक्तीचाच उपासक असतो. विनोबांना दंडविहीन आणि शोषणरहित समाजरचना हवी आहे. त्यांना दंडाच्या जागीं स्वयंशासन आणि शोषणाच्या जागीं पोषणशक्ति समाजांत रुजवायची आहे. भूदान हा त्या त्या कार्याचा मंगल आरंभ आहे, पण त्यांचें जीवनदर्शन विशाल आहे.

• • •

त्यांना राजकारणांत शुचिता, अर्थकारणांत साम्य आणि समाजकारणांत प्रेम निर्माण करायचें आहे. आज राजकारण गुंडांच्या आहारीं जाऊन कलुषित झालेलें दिसतें, अर्थकारण लोभ्यांच्या हातीं जाऊन शोषक बनलें आहे, आणि समाजकारण संकुचित वृत्तीच्या लोकांच्या हातीं पडून द्वेषमत्सरानें बुजबुजलें आहे. विनोबा समग्र समूळ क्रांति चाहतात. राजकारणाचा ढंग त्यांना बदलायचा आहे. निष्पक्ष लोकशाहीची त्यांची कल्पना आहे. बहुमत, अल्पमताच्या जागीं सर्वमत त्यांना इष्ट वाटतें. अर्थांतील लोभ आणि शोषण

नाहींसें करण्यासाठीं मोठ्या धंद्यांचें राष्ट्रीयीकरण, मध्यम धंद्यांचें समाजीकरण आणि छोट्या धंद्यांचें विकेंद्रीकरण त्यांना हवें आहे. त्यांना समृद्धि हवी आहे, उत्पादनवाढ हवी आहे, पण उत्पादन विस्तृत प्रमाणावर व्हावें असा त्यांचा आग्रह आहे. त्यांना परस्परावलंबन हवें आहे, पण स्वावलंबनाच्या पायावरच तें शोषणरहित होऊं शकतें असें त्यांचें मत आहे. वैष्णव धर्माचा उपासक असलेला हा देश भेदभावानें बुजबुजाटलेला आहे याची त्यांना खंत आहे. त्यांना जुनें नको आहे, पण जुन्यांतलें सत्त्व नव्यांत समाविष्ट करून घ्यायला त्यांची तयारी आहे.

समन्वय हें एकच त्यांच्या जीवनांतील सूत्र आहे. सत्यनिष्ठ, निराग्रही, नम्र आणि आचारसंपन्न मनुष्यच समन्वय धर्माची उपासना करूं शकतो. पूर्वपश्चिमेचा संगम, प्राचीन नवीनाचा संगम, सर्वांचा संगम त्यांना हवा आहे. संगमाच्या ठिकाणीं अधिक पावित्र्य, अधिक वैभव, अधिक उदारता असते. विनोबांच्या जीवनांत हेंच सांपडतें. विनोबा हें एक मानवतीर्थ आहे. ज्ञानगंगेची धवलता, कर्मयमुनेची श्यामलता आणि भावसरस्वतीची सखोल विलुप्तता त्यांच्या ठिकाणीं आहे. विनोबांचें जीवन हें आधुनिक काळांतील मानवी तीर्थराज प्रयाग आहे.

# दानमहिमा

लेबेनॉनमध्यें खलील गिब्रान या नांवाचा एक थोर द्रष्टा आणि कवि होऊन गेला. ' प्रॉफेट ' नांवाचें त्याचें पुस्तक अति प्रसिद्ध आहे. त्या पुस्तकांत दानमहिम्या-विषयीं त्यानें अनुपम असे उद्‌गार काढले आहेत. व्यक्तीव्यक्तीपुरती दानप्रक्रिया मर्यादित होती. विनोबांनीं दानप्रक्रियेला सामाजिक अधिष्ठान मिळवून दिलें आणि तिला क्रांतीचें साधन बनविलें. सर्वत्र आपल्याच पोळीवर तूप ओढण्याची अहमहमिका सुरू आहे. प्रत्येकानें आपापला स्वार्थ पाहिला व त्याचें दक्षतेनें रक्षण केलें तर जगांत आपोआपच न्याय प्रस्थापित होईल असें एक घातक तत्त्वज्ञान आज शिक्षित समजलें जाणाऱ्यांतहि रूढ होऊं पहात आहे. विनोबांना दातृत्वशक्ति जागवायची आहे. ही दातृत्वशक्तिहि पुण्याकांक्षेनें वा मरणोत्तर लोभानें कलंकित होऊं नये असें त्यांना वाटतें. खलील गिब्राननें फार सुंदर काव्यमय साज चढवून विनोबांना अभिप्रेत असलेले विचार अक्षरबद्ध करून ठेवले आहेत.

त्या प्रॉफेटकडे—द्रष्ट्याकडे श्रीमंत येऊन विचारतात : मग आम्हांला आतां दानाविषयीं कांहीं सांगा. तो द्रष्टा म्हणतो—

जवळ सांठविलेल्यापैकीं जेव्हां तुम्ही कांहीं देतां तेव्हां तुम्ही अत्यंत अल्प देता. जेव्हां तुम्ही स्वतःच्यांतील कांहीं देतां तेव्हांच तुम्ही खऱ्या अर्थानें कांहीं दिलें असें म्हणतां येईल. तुमच्याजवळचे जिन्नस म्हणजे उद्याच्या काल्पनिक भीतिपायीं केलेला सांठाच नसतो काय ?

आणि उद्यांची भीति म्हणजे तरी काय ? तुमची विहीर तुडुंब भरली असतांनाहि जर तुम्ही तृष्णेनें कासावीस होत असाल तर तुमची ती तहान कधींहि तृप्त न होण्यासारखी दुर्दमनीय आहे, असाच त्याचा अर्थ नाहीं काय ?

आणि कांहीं असें असतात कीं, आपल्याजवळच्या विपुलांतून ते थोडेसें देतात. ते मानमान्यतेसाठीं देत असतात आणि त्यांची ही सुप्त महत्त्वाकांक्षा त्या दानाला कलंकित करते. आणि दुसरें कांहीं असे असतात कीं, त्यांच्याजवळ असतें थोडेंच पण तें सर्वच्या सर्व ते देऊन टाकतात. ह्या लोकांचा जीवनावर आणि जीवनाच्या वैपुल्यावर गाढ विश्वास असतो. त्यांचा खजिना कधींच रिता होत नाहीं.

आणि कांहीं असे असतात कीं जें आनंदानें देतात तो आनंद हेंच त्यांना पारि-तोषिक वाटतें. आणि कांहीं देतांना थोडे कष्टी असतात आणि ते कष्ट हीच त्यांची दीक्षा असते.

आणि कांहीं असे असतात कीं देतांना त्यांना कष्टहि होत नाहींत, दातृत्वाच्या

अनुक्रम.......... दि: ..........
नों. दि: ..........



आनंदाच्या भुकेनेंहि ते देत नाहींत, किंवा सद्गुणांचें प्रदर्शन करण्याचीहि भावना त्या मागें नसते.

जंगलांतल्या एकाकी पुष्पानें परिमळून आपला सुवास सर्वत्र उधळण्यासाठीं वाऱ्याला सहज अर्पण करावा तसें त्यांचें तें देणें असतें. अशा लोकांच्या हातांतून भगवत्-वाणी प्रकट होत असते आणि अशांच्या डोळ्यांतून ईश्वरी प्रसन्नता धरणीवर बरसत असते.

आणि तुम्ही राखूं म्हटलेत तरी किती आणि काय राखणार ? एक दिवस सगळेंच दिलें जाणार आहे म्हणून आतां या क्षणींच द्या. तुम्ही काळाची हांक ओळखलीत असा त्याचा अर्थ होईल. हा क्षण गेला तर दातृत्वाच्या संधीलाहि तुम्ही आंचवाल.

तुम्ही म्हणतां, मी देईन पण सत्पात्र शोधून.

तुमच्या बागेंतलीं तीं फळझाडें असें नाहीं म्हणत. आणि तुमच्या गोठ्यांतल्या गाई त्याहि अशी अट घालीत नाहींत. तीं देतात कारण देणें म्हणजे जगणें, राखणें म्हणजे कोमेजणें.

आणि पात्रापात्रतेचा विचार करणारे तरी तुम्ही कोण ? जो जीवनाच्या दानाला ईश्वराकडून पात्र समजला गेला त्याची पात्रापात्रता तुम्ही कशी ठरवणार ! ज्याला जीवनाच्या कलशांतून अमृताचें पान करतां आलें त्याला तुमच्यामधील पेलाभर घेण्याची लायकी खासच आहे.

आणि तुम्ही देणारे तरी असे कोण महान् लागून गेलात कीं लोकांनीं आपला स्वाभिमान, आपलें स्वत्व गुंडाळून तुमच्यापुढें लाचारी पत्करावी. आधीं दान करण्याला, दातृत्वाचें साधन बनण्याला आपण योग्य आहोंत कां हें तपासून बघा कारण शेवटीं जीवनच जीवनाला देत असतें. दाता केवळ एक निमित्तमात्र, साक्षी असतो.

आणि हें दान घेणारांनो—आणि तुम्ही सारेच दान घेणारे आहांत—तुम्ही दान हा भार समजूं नका. तसें समजाल तर देणारा आणि घेणारा या दोघांनाहि तें दान बंधनकारक ठरेल.

दात्याच्या ऋणाची सतत जाणीव राखणें म्हणजे त्याच्या दातृत्वाचा अपमानच होय. ज्याला ही बहुरत्ना वसुंधरा माता म्हणून लाभली आणि सृष्टिकर्ता परमेश्वर हा पेता लाभला त्याच्या दातृत्वाला काय उणें पडेल ? भूतकालांतील दानाचा निर्देश म्हणजे वानकाळीं दातृत्वशक्ति आटल्याचा प्रत्यक्ष पुरावाच होय.

* * *

नों. दि: ..........

REFBK-0008921